सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर रविवार, दि. ०६ जुलै २०२५ वर्ष - तिसरे अंक ९४ पाने : ८ किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# ...आणि आम्हाला दोघांना फडणवीसांनी एकत्र आणलं - राज ठाकरे

## कोणत्याही वादापेक्षा आणि कुठच्याही भांडणापेक्षा महाराष्ट्र मोठा!

मुंबई, ५ जुलै (हिं.स.) – कोणत्याही वादापेक्षा आणि कुठच्याही भांडणापेक्षा महाराष्ट्र मोठा आहे. आजचा हा मेळावा आणि मोर्चालाही तीच घोषणा होती. आताही तीच आहे. कोणताही झेंडा नाही. मराठी हाच अजेंडा. माझ्या मराठीकडे, महाराष्ट्राकडे वेड्यावाकड्या नजरेने कुणी पाहायचं नाही. खरंतर हा प्रश्नच अनाठायी होता. गरज नव्हती. कुठून हिंदीचं आलं, ते कळलं नाही. हिंदी, कशासाठी हिंदी? कुणासाठी हिंदी. जे माननीय बाळासाहेबांना जमलं नाही, जे अनेकांना जमलं नाही.. आम्हाला दोघांना एकत्र आणण्याचं.. ते देवेंद्र फडणवीसांना जमलं, असा टोला मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी लगावला.

प्राथमिक शाळांमधील हिंदी भाषेची सक्ती आणि त्रिभाषा सूत्र लागू करण्याचे दोन्ही शासकीय आदेश रद्द करण्याच्या महायुती सरकारच्या निर्णयावर जल्लोष करण्यासाठी शिवसेना (उबाठा) व मनसेच्या वतीने आज मुंबईतील एनएससीआय डोम येथे विजयी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याला राज ठाकरेंनी संबोधित केले. यावेळी व्यासपीठावर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे उपस्थित होते. मोर्चा निघायला पाहिजे होता. मराठी माणूस कसा एकवटतो, ह्याचं चित्र उभं राहील असतं. नुसत्या मोर्चाच्या चर्चेनं माघार घ्यावी लागली. आजचा मेळावा शिवतीर्थावर व्हायला हवा होता. मैदान ओसंडून वाहिलं असतं. मात्र, पाऊस असल्यामुळे अशा जागा कार्यक्रमासाठी घेता येत नाहीत. हे सभागृह अपुरं आहे, त्यामुळे हजारो लोक बाहेर उभे आहेत. मी बाहेर उभ्या लोकांची दिलगिरी व्यक्त करतो. कारण त्यांना आत येता आलं नाही.

राज ठाकरे पुढे म्हणाले की, काहीही अंगावर लादायचा प्रयत्न करतात, आता माघार घेतली तर काय



करायचं. वेगळ्या ठिकाणी प्रयत्न करून पाहिले. ठाकरेंची मुलं इंग्रजी शाळेत शिकली मग काय झालं? देवेंद्र फडणवीस इंग्रजी शाळेत शिकले, दादा भुसे मराठी शाळेत शिकून मंत्री झाले. कुणाची मुले कुठे शिकतात याची लिस्ट आहे आमच्याकडे. कुणाला न विचारता निर्णय लादला. तुमच्याकडे सत्ता आहे विधान भवनात आणि आमच्याकडे सत्ता आहे रस्त्यावर. दादासाहेब भुसे आले होते म्हणाले, मी काय बोलतो ते ऐकून घ्या. मी म्हणालो ऐकून घेईल पण ऐकून घेणार नाही. मला म्हणाले, केंद्राच्या शिक्षण धोरणात हिंदी मुद्दा आहे. महाराष्ट्रात यांनी प्रयत्न करून पाहिला. दक्षिणेतील राज्य यांना विचारत पण नाही, त्याशिवाय का यांनी माघार घेतली. उत्तर प्रदेश, बिहार, राजस्थान कोणता विषय तिसरा घेणार आहेत. मराठीच तिसरा विषय घ्यायला हवा. एक भाषा उभी करायला प्रचंड ताकद लागते. भाषा अशाच उभ्या राहत नसतात. अमित शाह म्हणतात, ज्याला इंग्रजी येतं त्याला लाज वाटेल इंग्रजी येते म्हणवून. पण तुम्हाला येतं कुठे?

आम्ही मराठी मीडियात शिकलो, हो शिकलो. आमची मुलं इंग्रजी मीडियममध्ये शिकली. होय. मग यांना मराठीचा पुळका कसा? बाळासाहेब ठाकरे आणि श्रीकांत ठाकरे हे इंग्रजी मीडियममध्ये शिकलेले आहेत. या दोघांवर मराठीबाबत शंका घेऊ शकता का? लालकृष्ण आडवाणी सेंट पॅट्रीक हायस्कूल ख्रिश्चन मिशनरी स्कूलमध्ये शिकले. हिंदुत्वावर शंका घेऊ का त्यांच्या? कॉन्व्हेंटमध्ये शिकले. उद्या हिब्रू भाषेत शिकेल आणि मराठीचा कडवट अभिमान बाळगेल. काय अडचण आहे?, असा सवाल ठाकरेंनी केला.

या हिंद प्रांतात सव्वाशे वर्षे आम्ही राज्य केलं. आम्ही मराठी लादली? गुजरात, पंजाब, मध्यप्रदेश टोकापर्यंत आम्ही पोहोचलो. आम्ही लादली? हिंदी भाषा २०० वर्षांपूर्वीची भाषा आहे. महाराजांच्या काळातही नव्हती. कशासाठी आणि कोणासाठी? यांनी फक्त चाचपडून पाहिलं. मुंबई स्वतंत्र करता येते का यासाठी भाषेला डिवचून बघू. महाराष्ट्र शांत राहिला तर पुढे ते पाऊल टाकू. कुणाची माय व्यालीय त्यांनी महाराष्ट्राला हात घालून दाखवा. मुंबईला हात घालून दाखवा. मजाक वाटला का? आम्ही शांत आहोत याचा अर्थ गांडू नाही आहोत, असं राज ठाकरे म्हणाले.

महाराष्ट्र ज्यावेळी पेटून उठतं, त्यावेळी काय घडतं हे आज राज्यकर्त्यांना समजलं असेल. त्याशिवाय का माघार घेतली? विनाकारण आणलेला विषय होता. हिंदीभाषिक राज्ये आर्थिकदृष्ट्या मागास आहेत, हिंदी न बोलणारी राज्ये आहेत ती आर्थिकदृष्ट्या प्रगत.. आणि वर आम्ही हिंदी शिकायचं. यांना राज्यांचा विकास करता आला नाही. कोणसाठी हिंदी शिकायचं? पाचवीनंतर पोरगा हिंदी चित्रपटसृष्टीत जाणार का, असं राज म्हणाले.

## दोन बंधूंना एकत्र आणल्यामुळे बाळासाहेबांचे आशीर्वाद मलाच मिळतील - फडणवीस

सोलापूर, ५ जुलै : मुंबईत झालेल्या विजयी मेळाव्यात मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आम्हाला एकत्र आणणं बाळासाहेबांना जमलं नाही, जे इतर कोणालाही जमलं नाही, ते देवेंद्र फडणवीस यांना जमलं, असं म्हणाले. यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रत्युत्तर देताना म्हटले की, राज ठाकरेंचे आभार मानतो, दोन बंधू एकत्र येण्याचे श्रेय त्यांनी मला दिले. त्यामुळे बाळासाहेबांचे आशीर्वाद आता मलाच मिळत असतील.

राज्यात हिंदी भाषा सक्ती करण्याचा जीआर रद्द केल्याबद्दल मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि ठाकरे शिवसेनेचे पक्ष प्रमुख व माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचा संयुक्त विजयी मेळावा आज वरळी येथील एनएससीआय डोम येथे झाला. या मेळाव्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पंढरपूर येथे पत्रकारांशी बोलताना प्रतिक्रिया दिली आहे. सुमारे २० वर्षांनी उद्धव आणि मी एकत्र येत आहे. आम्हाला एकत्र आणणं बाळासाहेबांना जमलं नाही, जे इतर कोणालाही जमलं नाही, ते देवेंद्र फडणवीस यांना जमलं, अशा शब्दांत राज ठाकरे यांनी चिमटा काढला. यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रत्युत्तर देताना म्हटले की, राज ठाकरेंचे आभार मानतो, दोन बंधू एकत्र येण्याचे श्रेय त्यांनी मला दिले. त्यामुळे बाळासाहेबांचे आशीर्वाद आता मलाच मिळत असतील, असा टोला त्यांनी लगावला.

यावेळी फडणवीस यांची उद्धव ठाकरे यांच्या टीकेचा खरपूस समाचार घेतला. ते म्हणाले की, मराठीबद्दल एक शब्द न बोलता, आमचं सरकार गेलं, आमचं सरकार पाडलं, आम्हाला निवडून द्या, हा मराठीचा विजय उत्सव नव्हता. त्यांना असूया आहे की, २५ वर्षे त्यांच्याकडे महानगरपालिकेची सत्ता असताना दाखविणे सारखे काहीच काम नाही. पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली आम्ही ज्या प्रकारे मुंबईचा चेहरा बदलला आहे. परंतु उद्धव ठाकरे यांच्या काळामध्ये मराठी माणूस मुंबईतून हद्दपार झाला आहे. आम्ही बीडीडी आणि

# शाळेच्या गेटवर विद्यार्थ्याचा वडिलांच्या मांडीवर मृत्यू

बाराबंकी : शाळेच्या गेटवर विद्यार्थ्याचा वडिलांच्या मांडीवर मृत्यू झाला. ही दुर्दैवी घटना उत्तर प्रदेशमधील बाराबंकी येथे घडली. सातवीत शिकत असलेला मुलगा वडिलांसोबत कारमधून शाळेत आला. शाळेत जाण्यासाठी मुलगा कारमधून उतरला. पण त्याचवेळी त्याची तब्येत बिघडली आणि तो जमिनीवर कोसळला. बेशुद्ध पडला. हा प्रकार बघून घाबरलेल्या वडिलांनी मुलाला उचलून घेतले. ते जवळच असलेल्या बेंचवर बसले. मुलाला मांडीवर व्यवस्थित ठेवले. नंतर वडील मुलाला शुद्धीत आणण्याचा प्रयत्न करू लागले. घटनास्थळी उपस्थित असलेली काही जण त्यांच्या मदतीला पुढे आले. सर्व जण मुलाला शुद्धीत आणण्याचे प्रयत्न करू लागले. पण मुलाकडून प्रतिसाद मिळाला नाही. अखेर वडिलांनी मुलाला जवळच्या रुग्णालयात नेले. डॉक्टरांनी तपासणी करुन मुलाचा मृत्यू झाला असल्याचे जाहीर केले.



सातवीत शिकणाऱ्या मुलाचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना उत्तर प्रदेशमधील बाराबंकीतल्या फतेहपूर तहसील क्षेत्रात घडली. व्यवसायाने वकील असलेल्या जितेंद्र यांच्या मुलाचा शाळेच्या गेटजवळ मृत्यू झाला. जितेंद्र यांच्या मुलाला कोणताही आजार नव्हता. यामुळे मुलाचा आकस्मिक मृत्यू कसा झाला हा प्रश्न जितेंद्र यांना सतावत आहे. जितेंद्र यांच्या पत्नीला पोटच्या मुलाच्या मृत्यूने धक्का बसला आहे. मुलगा या जगातून कायमचा गेला आहे यावर त्यांचा अद्याप विश्वास बसलेला नाही. मुलाच्या मृत्यानंतर नातलगांनी पोस्टमॉर्टेम न करताच मृतदेह अंत्यसंस्कारासाठी घेऊन जाण्याचा निर्णय घेतला. यामुळे मृत्यूचे नेमके कारण समजले नाही.


## जळगावात तरुणाची गोळ्या घालून हत्या

जळगाव, ५ जुलै – पाचोरा शहरातून एक खळबळजनक घटना समोर आलीय. अज्ञात मारेकऱ्यांनी २६ वर्षीय तरुणावर गोळीबार केलं त्याचा जागीच मृत्यू झाला. आकाश कैलास मोरे (वय २६, रा. छत्रपती शिवाजी नगर, पाचोरा) असं गोळीबारात मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव असून या घटनेनं शहरात एकच खळबळ उडाली. दरम्यान मारेकरी घटनास्थळावरून फरार झाले असून पोलीस मारेकऱ्यांचा शोध घेत आहे. पाचोरा शहरात असलेल्या बस स्थानक परिसरात आज संध्याकाळी दोन संशयित मारेकरी दुचाकीवरून आले आणि त्यांनी आकाश मोरेवर सिनेस्टाईल गोळ्या झाडल्या. नंतर मारेकरी घटनास्थळावरून फरार झाले. यावेळेला नागरिकांची धावपळ उडाली. पाचोरा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन घटनेची माहिती घेऊन जागा सील केली. त्यांनी तात्काळ पंचनामा करून आकाश मोरेला पाचोरा ग्रामीण रुग्णालयात हलवलं.

# उठण्याची भाषा करणाऱ्यांनी आधी मनगटात जोर आणावा : एकनाथ शिंदे

ठाणे, ५ जुलै : उद्धव ठाकरे आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यातील वाद चांगलाच रंगताना दिसतोय. 'उठेगा नहीं साला' या पुष्पा चित्रपटातील डायलॉगचा वापर करून उद्धव ठाकरे यांनी शिंदेंवर टीका केली होती. त्यावर प्रत्युत्तर देताना शिंदेंनीही तोच रोख कायम ठेवत, तितक्याच धारदार शब्दांत पलटवार केला. उठण्याची भाषा कोण करतंय? त्यासाठी मनगटात जोर लागतो. केवळ तोंडाच्या वाफा सोडून उपयोग होत नाही, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी ठाकरे यांच्यावर निशाणा साधला. ठाकरे बंधूंच्या विजयी मेळाव्याच्या पार्श्वभूमीवर ते ठाण्यात माध्यमांशी बोलत होते.

आज तीन वर्ष झालीत. त्या वेळी उठाव केला, तेव्हा फक्त दाढीवरून अर्धा हात फिरवला होता. त्यातून ते आडवे झाले



आणि अजूनही सावरलेले नाहीत. आता पुन्हा एकदा उठण्याचा प्रयत्न करतायत, तोही कुणाच्या तरी हाताची मदत घेऊन! अशी उपरोधिक टीकाही शिंदेंनी केली.

शिंदेंचा स्पष्ट आरोप होता की, एका नेत्याने मराठीबद्दल असलेली तळमळ बोलून दाखवली, तर दुसऱ्याने मात्र सत्तेसाठीची मळमळ उघड केली. आम्ही ठरवलं होतं की कोणताही पक्षाचा झेंडा आणि अजेंडा नको – पण ते फक्त आम्ही पाळलं. दुसऱ्याने मात्र स्वार्थाचाच अजेंडा राबवला.

दरम्यान, शिवसेना (शिंदे गट)च्या अधिकृत एक्स हँडलवरून उद्धव ठाकरे यांना लक्ष्य करत एक तुलना मांडण्यात आली. या पोस्टमधून त्यांनी अप्रत्यक्षपणे उद्धव ठाकरे यांना स्वार्थी, खुर्चीप्रेमी ठरवण्याचा प्रयत्न केला.

एक प्रबोधक, दुसरा प्रक्षोभक एक उजवा, दुसरा डावा एक धाकला असून थोरला, दुसरा थोरला असून धाकला एक मराठीप्रेमी, दुसरा खुर्चीप्रेमी एकाच्या मुखी आसूड, दुसऱ्याच्या तोंडी सूड एक मराठीचा पुरस्कर्ता, दुसरा तिरस्कर्ता एक प्रगल्भ, दुसरा वेडापिसा एकाचा मराठीचा वसा, दुसरा भरतोय खिसा एकाचा स्वतंत्र सवतासुभा, दुसरा नुसताच आयतोबा!

एकूणच, आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ठाकरे आणि शिंदे यांच्यातील शाब्दिक संघर्ष अधिकच तीव्र होणार हे स्पष्ट आहे. भाषणं, पोस्ट्स आणि टोलेबाजी यांमधून दोघेही आपापल्या भूमिकांना धार देत आहेत.

## धोरणात हिंदी, भाषणात मराठी, ठाकरे गटाचा दुटप्पीपणा जनतेला मान्य नाही - बावनकुळे

मुंबई, ५ जुलै – मराठीच्या गोंडस नावाखाली आज उद्धव ठाकरे यांनी वरळीत सत्ता गेल्याचं शोकगीत गायलं. पण मुख्यमंत्री असताना २०२२ मध्ये पहिलीपासून हिंदी सक्तीचा अहवाल का स्वीकारला, याचं उत्तर त्यांनी दिलंच नाही. 'मराठी भाषा' ही केवळ भावनांमध्ये उभी राहणारी अस्मिता नाहीतर ती धोरणात दिसली पाहिजे. पण तुम्ही मुंबईत सत्तेत असताना मराठी माणसाला हद्दपार केलं. आणि आता सत्ता मिळवण्यासाठी पुन्हा मराठीवर बेगडी प्रेम करत आहात.

उद्धव ठाकरेंच्या भाषणातून स्पष्ट होतंय की, त्यांचा खरा अजेंडा 'म' म्हणजे 'मराठी' नाही, तर 'म' म्हणजे 'महापालिका' आहे! यांचं मराठीप्रेम म्हणजे निवडणुका जवळ आल्या की आठवण येणारी राजकीय नौटंकी आहे. जनतेनं आता हा दुटप्पीपणा ओळखला आहे.

## प्रधानमंत्री सुर्य घर- मोफत वीज योजनेची प्रभावी अंमलबजावणी करा - संजय शिरसाट

मुंबई, ५ जुलै : प्रत्येक घरात मोफत वीज पोहोचविण्यासाठी प्रधानमंत्री सुर्य घर- मोफत वीज योजना राबविण्यात येत आहे. शासनामार्फत सुरू असलेल्या या योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यासाठी ऊर्जा विभागाशी समन्वय साधून, सकारात्मक कार्यवाही करण्याचे निर्देश सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी दिले.

सामाजिक न्याय विभागांतर्गत विविध योजना राबविण्यात येतात. प्रधानमंत्री सुर्य घर- मोफत वीज योजनेच्या अंमलबजावणीसंदर्भात विधानभवन येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राज्यमंत्री ड. आशिष जयस्वाल, प्रधान सचिव हर्षदिप कांबळे, आयुक्त सुरेंद्र पवार आदिसह अधिकारी उपस्थित होते.

मंत्री श्री. शिरसाट म्हणाले की, सामाजिक न्याय विभागामार्फत सुरू असलेल्या वैयक्तिक लाभाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी. ऊर्जा विभागाशी समन्वय साधून प्रधानमंत्री सुर्य घर- मोफत वीज योजना राबवावी. तसेच, पात्र लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळत असल्याची खात्री करण्यासाठी आयुक्तालयामार्फत यंत्रणा राबवावी. प्रत्येक लाभार्थ्याच्या घरावर सौर पॅनल उभारल्यास त्यांना ३०० मेगावॅट वीज मोफत मिळणार असून, वीजेची बचतही होणार आहे. याचा लाभ त्यांच्या सामाजिक आणि आर्थिक उन्नतीसाठी होणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

# मी आणखी ३०-४० वर्षे जगण्याची आशा - दलाई लामा

### उत्तराधिकारीच्या चर्चेला पूर्णविराम

धर्मशाळा, ५ जुलै : तिबेटी बौद्ध धर्माचे सर्वोच्च गुरू १४ वे दलाई लामा तेनजिन ग्योत्सो यांच्या ९० व्या वाढदिवसानिमित्त मॅक्लिओड गंज येथे दोन दिवसांचा विशेष धार्मिक कार्यक्रम आजपासून सुरू झाला. या कार्यक्रमात त्यांनी आपल्या उत्तराधिकारी संदर्भातील चर्चेला पूर्णविराम देत स्पष्ट संदेश दिला – माझ्यासोबत अवलोकितेश्वरांचे आशीर्वाद आहेत. मी माझे सर्वोत्तम प्रयत्न केले असून, आणखी ३०-४० वर्षे जगण्याची आशा आहे.

दलाई लामा म्हणाले, आपण आपला देश गमावला असला तरी भारतात निर्वासित जीवन जगताना मी अनेक लोकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवू शकलो. धर्मशाळेत शक्य तितक्या लोकांची सेवा करण्याचा माझा मानस आहे.



या कार्यक्रमासाठी देश-विदेशातून हजारो अनुयायी उपस्थित झाले आहेत. ४८ देशांतील बौद्ध अनुयायांनी धर्मशाळेत येऊन सहभाग नोंदवला आहे. मुख्य तिबेटी मंदिर त्सुगलागखांग येथे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे, जेथे दलाई लामांचे निवासस्थानही आहे. दलाई लामा यांचा अधिकृत वाढदिवस रविवार, ६ जुलै रोजी साजरा केला जाणार आहे. सुरक्षा यंत्रणा पूर्णपणे सतर्क असून मॅक्लिओड गंज मंदिर परिसर भव्य पद्धतीने सजवण्यात आले आहे.

या कार्यक्रमात केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू, अरुणाचल प्रदेशचे मुख्यमंत्री पेमा खांडू, तसेच हॉलिवूड अभिनेता रिचर्ड गेरे आदी मान्यवर उपस्थित होते. रिजिजू म्हणाले, दलाई लामा यांच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना केली असून, त्यांच्या उपस्थितीत सहभागी होणं हे गौरवचं आहे.

दरम्यान, चीनने दलाई लामा यांच्या उत्तराधिकारीविषयी वक्तव्यावर तीव्र प्रतिक्रिया दिली होती आणि भारताला तिबेट विषयावर 'सावधगिरी' बाळगण्याचा इशारा दिला होता. या पार्श्वभूमीवर रिजिजू यांचा दौरा आणि उपस्थिती विशेष महत्त्वाची मानली जात आहे.

## अमरनाथ यात्रा मार्गावर अपघात; पाच बस एकमेकांवर आदळल्या; ३६ यात्रेकरू जखमी

जम्मू, ५ जुलै : रामबन जिल्ह्यात ५ बसची टक्कर होऊन सुमारे ३६ अमरनाथ यात्रेकरू जखमी झाले आहेत. या बस जम्मू भगवती नगरहून दक्षिण काश्मीरमधील पहलगाम बेस कॅम्पला जाणाऱ्या ताफ्याचा भाग होत्या. अधिकाऱ्यांनी सांगितले की, सकाळी ८ वाजता जम्मू-



श्रीनगर राष्ट्रीय महामार्गावरील चंद्रकूटजवळ हा अपघात झाला. ताफ्यातील एका बसचा ब्रेक निकामी झाल्यामुळे ही टक्कर झाली. रामबनचे उपायुक्त मोहम्मद अल्यास खान म्हणाले, पहलगामच्या ताफ्यातील शेवटच्या वाहनाने नियंत्रण गमावले आणि ते चंद्रकोट लंगर स्थळी अडकलेल्या वाहनांना धडकले. ज्यामुळे चार वाहनांचे नुकसान झाले आणि ३६ प्रवासी जखमी झाले. घटनास्थळी आधीच उपस्थित असलेल्या सरकारी अधिकाऱ्यांनी जखमींना रामबन जिल्हा रुग्णालयात दाखल केलेअसे त्यांनी सांगितले. जम्मू आणि काश्मीर जिल्हा रुग्णालयातील रामबनचे प्रभारी वैद्यकीय अधीक्षक डॉ. मोहम्मद रफी म्हणाले, 'अमरनाथ यात्रेला जाणाऱ्या यात्रेकरूंना घेऊन जाणाऱ्या एका बसची दुसऱ्या बसशी टक्कर झाली.

# बाबासाहेब पाटीलांनी फेडले लातूरमधील शेतकरी दांम्पत्याचे कर्ज

लातूर, ५ जुलै : अहमदपूर तालुक्यातील हाडोळती येथील वृद्ध शेतकरी अंबादास पवार हे त्यांच्या शेतात स्वत: नांगर ओढतानाचे छायाचित्र व्हायरल झाले होते. यानंतर राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी तातडीने या शेतकऱ्याशी संपर्क साधून त्यांच्या समस्या जाणून घेत, त्यांचे पीककर्ज फेडण्याचा शब्द दिला होता. त्यानुसार सहकार मंत्र्यांनी आज हाडोळती येथे या पवार यांच्या घरी भेट देवून त्यांच्यावर असलेले सर्व कर्ज भरले. तसेच शासन सदैव शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी सकारात्मक असल्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

याप्रसंगी आमदार विक्रम काळे,



अहमदपूरच्या उपविभागीय अधिकारी मंजुषा लटपटे, अहमदपूरच्या तहसीलदार उज्वला पांगरकर, तालुका कृषी अधिकारी सचिन बागवे, सहाय्यक निबंधक पालवे, गटविकास अधिकारी पंकज शेळके, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मंचकराव पाटील आदी उपस्थित होते.शेतकरी अंबादास पवार यांच्याकडे थकीत असलेले हाडोळती विविध कार्यकारी सहकारी सेवा सोसायटीचे थकीत कर्ज व त्यावरील व्याजाची परतफेड करण्यासाठी सहकार मंत्री पाटील यांनी सोसायटीच्या पदाधिकारी, अधिकारी यांच्याकडे सुमारे ४२५०० रुपये सुपूर्द केले. तसेच या रक्कमेचा भरणा करून त्याबाबतचे प्रमाणपत्र पवार यांना सुपूर्द करण्याच्या सूचना संबंधितांना दिल्या. राज्य शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर उपाययोजना करण्यासाठी शासन सकारात्मक असून शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत, असे सहकार मंत्री पाटील यावेळी म्हणाले.



लातूर
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# माऊली शैक्षणिक संकुलात आषाढी दिंडी संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ५ जुलै -** येथील अंबेजोगाई रोडवरील उपक्रमशील शैक्षणिक केंद्र म्हणून परिचित असलेल्या माऊली विद्यार्थी विकास केंद्र, माऊली बालक मंदिर , माऊली इंटरनॅशनल मॉडेल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी आषाढी दिंडी काढली.

पंढरपूरचा विठोबा म्हणजे महाराष्ट्राचे आराध्य दैवत होय. त्या परंपरेची संस्काराची जाणीव व महत्व बालवयापासूनच होण्यासाठी दरवर्षी विद्यालयात आषाढी दिंडीचे आयोजन करण्यात येते. या दिंडीत वारकऱ्यांच्या वेशभूषेत चिमुकले विद्यार्थी पालकांसमवेत सहभागी झाले होते.

'विठ्ठल विठ्ठल.. जय हरी.. विठ्ठल' चा जयघोष प्रत्येकाच्या मुखी होता. टाळ मृदुंगांची मंजुळ ध्वनी सर्वांच्या कानावर पडत होती. या दिंडीमध्ये सर्वजण मंत्रमुग्ध होऊन चालत होते. या नयनरम्य सोहळ्यामध्ये बसपुरे स्वामी साईदर्शन व आरडले आरूषी यांनी विठ्ठल रुक्मिणीची तर मदने क्रिश व कराड तेजस यांनी संत तुकाराम व संत ज्ञानेश्वराच्या वेशभूषा साकारल्या होत्या.

घरापुढे दिंडी आल्यानंतर महिला भाविकांनी विठ्ठल रुक्मिणीची भक्ती भावाने पूजा करून पालखीचे दर्शन घेतले. संगीत शिक्षक वाघ यांनी 'कानडा राजा पंढरीचा' या भक्तिमय गीताने सर्वांना मंत्रमुग्ध केले. दिंडीची सांगता वारकरी भजनी मंडळाच्या हस्ते विठ्ठलाच्या आरतीने करण्यात आली व त्यानंतर सर्व उपस्थितांना प्रसाद वाटपही करण्यात आले.

या दिंडीमध्ये संस्थासचिव गंगाधर आरडले, कोषाध्यक्ष तानाजी बेवनाळे पाटील, व्यंकटराव आरडले, प्राचार्या कविता आरडले, उपप्राचार्या काळे भाग्यश्री यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीततेसाठी व्यवस्थापक गोपाळ करडिले व सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.



## संक्षिप्त वृत्त...

### गळफास लावून तरुणीची आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.५ जुलै -** येथील एका खासगी दुकानात कामाला असलेल्या १९ वर्षीय तरुणीने गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना शहराच्या म्हाडा कॉलनीत गुरुवारी उघडकीस आली असून, याप्रकरणी विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

वैष्णवी विनोद लादे (वय १९, रा. म्हाडा कॉलनी, बाभळगाव रोड, लातूर) असे गळफास घेऊन मृत्यू पावलेल्या तरुणीचे नाव आहे. मयत वैष्णवी हिच्या घरी गुरुवारी सर्वजण होते. सकाळच्यावेळी तिने घरात कोणी नसल्याने आतून घराची कडी लावली. छताला दोरीने गळफास लावून आत्महत्या केली. थोड्या वेळानंतर घरातील सदस्य आले तेव्हा घर आतून बंद होते. त्यावेळी वैष्णवी हिला आवाज दिला तरी तिने कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे कुटुंबीयांनी व शेजाऱ्यांनी घराचे दार तोडून पाहिले तर आतमध्ये वैष्णवीचे शरीर लटकत असल्याचे दिसून आले. तत्काळ विवेकानंद चौक पोलिसांना याची माहिती देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून पंचनामा केला. मयत तरुणीचे प्रेत शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आले. सायंकाळच्या सुमारास तिच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. दरम्यान, एक तरुण मयत तरुणीला त्रास देत असल्याचा नातेवाईकांचा आरोप आहे. मात्र, तक्रार न आल्याने याप्रकरणी रात्री उशिरा विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. अधिक तपास पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांच्या मार्गदर्शनात सहायक पोलीस उपनिरीक्षक मनीष आंधळे हे करीत आहेत.

### मुरुडमध्ये सव्वा लाखाची चोरी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.५ जुलै -** तालुक्यातील मुरुड येथील येथे सोमवारी मध्यरात्रीच्या सुमारास चोरट्यांनी घरमालकासह भाडेकरूंचेही घर फोडून सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम असा १ लाख २१ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना घडली.

मुरुड येथील शिवाजीनगर भागात राहणारे संदीप दिगंबर हिंगमिरे हे भाड्याच्या घरात राहतात. ते कामानिमित्त बाहेरगावी गेले होते. घरात कुणीही नसल्याचा गैरफायदा घेत चोरट्यांनी त्यांचे घर फोडले. आतील रोख २० हजार रुपये व हिंगमिरे यांच्या घरमालकाचे घर फोडून त्यातून २५ हजार रुपये रोख व सोन्या-चांदीचे दागिने ७६ हजार ६०० रुपये असा एकूण १ लाख २१ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. चोरी झाल्याची माहिती हिंगमिरे यांना फोनवरून समजली. ते बाहेरगावाहून आल्यानंतर त्यांच्या फिर्यादीवरून मुरुड पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

### 'सीपीआर'च्या प्रशिक्षणाद्वारे मृत्यूच्या प्रमाणात घट शक्य

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.५ जुलै -** कार्डियाक अरेस्टच्या रुग्णांना काही मिनिटांच्या आत 'सीपीआर'चे योग्य पध्दतीने उपचार मिळाल्यास मृत्यू टाळले जाऊ शकते. परंतु, यासाठी वैज्ञानिक पध्दतीनेच 'सीपीआर' देणे आवश्यक आहे. यातून मृत्यूदर कमी होण्यास मदत होईल, असे प्रतिपादन हृदयरोगतज्ज्ञ डॉ. हमीद चौधरी यांनी केले.

येथील अतिदक्षताच्यावतीने डॉक्टर्स-डे निमित्त 'सीपीआर' उपचार पध्दतीवर डॉ. भालचंद्र ब्लड बँकेच्या सभागृहात पत्रकारांसाठी प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले. या शिबिराचे उद्‌घाटन प्रभारी जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी 'आयएमए'चे अध्यक्ष डॉ. अभय कदम, माजी अध्यक्ष डॉ. परमेश्वर सूर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी करमरकर म्हणाल्या, डॉ. चौधरी यांनी सुरू केलेल्या 'सीपीआर' प्रशिक्षणाचा उपक्रम कौतुकास्पद आहे. समाजातील सर्वच क्षेत्रातील सर्वसामान्य नागरिकांना 'सीपीआर' प्रशिक्षण आवश्यक असून, यावर जनजागृती होणे आवश्यक आहे.

कार्डियाक अरेस्टचे ५० टक्के रुग्ण घरी किंवा रुग्णालयात दाखल होण्यापूर्वीच दगावतात. अशावेळी प्रशिक्षित व्यक्ती रुग्णास 'सीपीआर' देऊन प्राण वाचवू शकते. कार्डियाक अरेस्ट झाल्यास रुग्ण बेशुध्द पडतो, श्वास बंद पडतो किंवा श्वासाची गती कमी होते, असेही डॉ. चौधरी म्हणाले. या कार्यक्रमास लातूर शहरातील अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महिला, विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेसाठी आता दामिनी पथक पूर्ण वेळ कार्यान्वित

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.५ जुलै -** लातूर पोलीस दलात पूर्वी एकच दामिनी पथक कार्यान्वित होते. आता महिला आणि विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेसाठी दामिनी पथक पूर्ण वेळ कार्यान्वित करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय नूतन पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी घेतला आहे. कोणत्याही ठिकाणी टवाळखोर व संशयित व्यक्ती आढल्यास किंवा तक्रार असल्यास तत्काळ मदतीसाठी ८८३०११५४०९ हा मोबाइल क्रमांक अथवा ११२ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस अधीक्षक तांबे यांनी केले आहे.



लातूर ही शिक्षणाची पंढरी म्हणून ओळखली जाते. राज्यासह देशभरातील विद्यार्थी व विद्यार्थिनी शिक्षणासाठी लातुरात येतात. ट्युशन एरियात शिक्षण घेऊन त्या परिसरातील वसतिगृहात अथवा भाड्याच्या खोलीत या विद्यार्थिनी राहतात. मागील काही दिवसांपासून या परिसरात टवाळखोरांकडून विद्यार्थिनींसोबत गैरवर्तनाचे प्रमाण वाढले आहे. तसेच शहरात महिलांच्याही छेडछाडीच्या प्रमाणात वाढ झाली आहे. यामुळे संताप व्यक्त करण्यात येत आहे.

नूतन पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी याची दखल घेऊन दामिनी पथक पूर्णवेळ कार्यान्वित करण्याचा निर्णय घेतला आहे. लातूर पोलीस दलात यापूर्वी केवळ एकच दामिनी पथक कार्यान्वित होते. आता दामिनी पथक अधिक सक्षम बनवून ते सकाळी ६ ते दुपारी २ आणि दुपारी २ ते रात्री १० अशा दोन सत्रांमध्ये कार्यान्वित असणार आहे. दामिनी पथक हे लातूर शहरातील ट्युशन एरिया, शाळा व महाविद्यालये आणि ज्या ठिकाणी गर्दी होते अशा महत्त्वाच्या ठिकाणी दोन्ही सत्रांत पूर्ण वेळ गस्तीवर असणार आहे. शाळा व महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी, महिला, सजग नागरिकांनी आपणास कोणत्याही ठिकाणी टवाळखोर व इतर संशयित व्यक्ती आढळल्यास तसेच कोणतीही तक्रार असल्यास तत्काळ मदतीसाठी ८८३०११५४०९ हा मोबाइल क्रमांक किंवा ११२ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क करून दामिनी पथकास मदतकामी बोलावून घ्यावे. दामिनी पथक आपणास तत्काळ प्रतिसाद देऊन घटनास्थळी येऊन कारवाई करेल. 'चला आपण सुरक्षित व सक्षम लातूर बनवण्यासाठी एक पाऊल पुढे टाकूया', असे आवाहन पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी केले आहे.

# 'त्या' वृध्द शेतकऱ्याला केली ४० हजारांची मदत

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.५ जुलै -** तालुक्यातील कामखेडा येथील राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते दिग्विजय पाटील यांनी अहमदपूर तालुक्यातील हडोळती येथील अंबादास पवार या वृध्द शेतकऱ्यास कर्जफेडीसाठी ४० हजार रुपयांची मदत दिली.

अहमदपूर तालुक्यातील हडोळती येथील अंबादास गोविंद पवार व त्यांच्या पत्नी मुक्ताबाई पवार या वृध्द शेतकरी दाम्पत्याने शेतीच्या मशागतीसाठी बैल परवड नसल्याने बैलांऐवजी स्वतःलाच नांगराला जुंपले होते. याचा हृदयद्रावक व्हिडीओ समाजमाध्यमावर व्हायरल झाला. मंत्री, सिनेअभिनेते आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी शेतकरी अंबादास पवार यांना मदतीचा हात



दिला. दरम्यान, गुरुवारी राष्ट्रवादीचे कार्यकर्ते दिग्विजय पाटील यांनी प्रत्यक्ष शेतकऱ्याची भेट घेत त्यांना कर्जफेडीसाठी ४० हजारांची आर्थिक मदत दिली. यावेळी नेहरू देशमुख, दत्ता आवाड, जयराम पवार आदी उपस्थित होते.

# लातुरात सुब्रोतो मुखर्जी फुटबॉल कप स्पर्धेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.५ जुलै -** जिल्हास्तर आणि महानगरपालिकास्तर सुब्रोतो मुखर्जी फुटबॉल कप क्रीडा स्पर्धा २०२५-२६ चे आयोजन लातूर येथील वर्ल्ड पीस स्कूल, साई रोड येथे करण्यात आले आहे. जिल्हास्तरीय स्पर्धा ८ ते ९ जुलै २०२५ रोजी तर महानगरपालिकास्तरीय स्पर्धा १० ते ११ जुलै दरम्यान होणार आहेत.

या स्पर्धा १५ वर्षांखालील मुले आणि १७ वर्षांखालील मुले-मुली या वयोगटांसाठी खेळवल्या जाणार आहेत. १५ वर्षांखालील मुलांची जन्म तारीख १ जानेवारी २०११ किंवा त्यानंतरची तर १७वर्षांखालील मुले-मुलींची जन्म तारीख १ जानेवारी २००९ किंवा त्यानंतरची असावी. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी सर्व संघांनी संकेतस्थळावर खेळाडू आणि संघाची नोंदणी करणे बंधनकारक आहे. तसेच प्रत्येक संघाने दिलेल्या संकेतस्थळावर २ हजार रूपये प्रवेश शुल्क भरावे, त्यानंतर डीएसओलातूर या संकेतस्थळावर ७ जुलै २०२५ पर्यंत संघाची प्रवेशिका सादर करणे अनिवार्य आहे. जास्तीत जास्त संघानी स्पर्धेत सहभाग नोंदवावा, असे आवाहन क्रीडा विभागाने केले आहे.

# अहमदपुरात अवैध वाळूसह २५ लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.५ जुलै -** स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अहमदपूर पोलीस ठाण्याच्या परिसरात वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्या हायवा टिप्परसह २५ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी अहमदपूर पोलीस ठाण्यात दोघांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून, एका आरोपीस अटक करण्यात आली आहे.

जिल्ह्यातील अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी पोलीस अधीक्षक अमोल तांबे आणि अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांच्या मार्गदर्शनात कारवाई करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने



स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळालेल्या माहितीवरून गुरुवारी रात्री अहमदपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रोडवर सापळा लावून गौण खनिज वाळूची अवैध वाहतूक करीत असलेल्या वाळूने भरलेला हायवा टिप्पर आणि विनापरवाना वाळू असा एकूण २५ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

या प्रकरणी अहमदपूर पोलीस ठाण्यात आरोपी पिराजी समृत हाके (रा. हुलेवाडी, पो. सावरगाव, ता. लोहा, जि. नांदेड) आणि विकास काशिनाथ क्षीरसागर (रा. आडगाव, ता. लोहा, जि. नांदेड) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपी पिराजी हाके यास अटक करण्यात आली आहे. या कारवाईत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पोलीस अंमलदार साहेबराव हाके, रियाज सौदागर, सचिन धारेकर, मनोज खोसे, चंद्रकांत डांगे यांनी सेवा बजावली.

# मोबाइल टॉवरच्या नेटवर्क मशीन चोरणारे तिघे जेरबंद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.५ जुलै -** अहमदपूर तालुक्यातील किनगाव पोलीस ठाणे हद्दीत मोबाइल टॉवरच्या नेटवर्क मशीन चोरणाऱ्या तीन आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने लातूर शहरातील मळवटी रोड परिसरातून अटक करून ३ मशीन जप्त केल्या आहेत.

लातूर जिल्ह्यातील गुन्ह्यांचा आढावा घेऊन गुन्ह्यांचा तपास करण्याबाबत पोलीस अधीक्षक अमोल तांबे व अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांनी आदेशित केले आहे. दरम्यान, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथकाला मिळालेल्या माहितीच्या आधारे किनगाव पोलीस



ठाण्यात दाखल असलेल्या मोबाइल टॉवरच्या नेटवर्क मशीन चोरीच्या गुन्ह्यातील आरोपी अमोल राम भोसले (वय २२, रा. महादेवनगर, लातूर), संदीप राजेंद्र गिरी (वय २३, रा. कुंभारवाडी, ता. रेणापूर) आणि दत्तात्रेय कांतीलाल केकान (वय ३२, रा. केकानवाडी, ता. केज, जि. बीड) यांना गुरुवारी मध्यरात्री लातूर शहरातील मळवटी रोड परिसरातून ताब्यात घेऊन त्यांची कसून चौकशी केली असता, त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. आरोपींकडून मोबाइल टावरच्या नेटवर्क मशीनसह इतर दोन मोबाइल नेटवर्किंग मशीन जप्त करण्यात आल्या. पुढील तपास किनगाव पोलीस करीत आहेत.

पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या पथकातील पोलीस उपनिरीक्षक राजाभाऊ घाडगे, पोलीस अंमलदार युवराज गिरी, राहुल सोनकांबळे, सिध्देश्वर मदने, राहुल कांबळे, जमीर शेख, राजेश कंचे, गणेश साठे, शैलेश सुडे, अझहर शेख यांनी ही सेवा बजावली.

# कर्मचारी ड्रेस कोड सक्तीसाठी पालिकेत झाडावर चढून आंदोलन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.५ जुलै -** महापालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांना त्यांच्या दर्जानुसार ड्रेस कोड सक्तीचा करावा व त्यांच्या गळ्यात ओळखपत्र बंधनकारक करावे, या मागणीसाठी शुक्रवारी लातूर शहर पूर्व भाग नागरी हक्क कृती समितीच्या एका पदाधिकाऱ्याने महापालिका कार्यालयाच्या आवारात असलेल्या झाडावर चढून आंदोलन केले. दरम्यान, महापालिका प्रशासनाने ओळखपत्राच्या बाबतीत प्रत्येकाला सक्ती व चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना ड्रेस कोड सक्ती केल्याचे पत्र दिले. अग्निशामक दलाच्या जवानांनी या आंदोलनकर्त्यास अनेक प्रयत्नानंतर खाली उतरविले.



लातूर शहर पूर्व भाग नागरी हक्क कृती समितीच्यावतीने महापालिका प्रशासनाला महापालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांना त्यांच्या दर्जानुसार ड्रेस कोड तसेच गळ्यामध्ये ओळखपत्र सक्तीचे करावे अन्यथा ४ जुलै रोजी आंदोलन करण्याचा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला होता.

शुक्रवारी कृती समितीचे सचिव बाबासाहेब बनसोडे हे अचानक पालिका आवारात असलेल्या झाडावर चढून बसले. ड्रेस कोड सक्तीच्या बाबतीत अनेकवेळा पालिका प्रशासनाकडे तगादा लावूनही याकडे प्रशासन लक्ष देत नाही म्हणून आपण हे आंदोलन करीत आहोत, असे त्यांनी सांगितले. दरम्यान, काही अधिकारी, कर्मचारी, अग्निशामक दलाचे जवान, पोलीस कर्मचारी तिथे आले. अनेकवेळा विनंती करूनही ते झाडावरून उतरण्यास तयार नव्हते. अग्निशामक दलाच्या जवानांनी सुरक्षीतपणे त्यांना खाली उतरविले. दरम्यान, महापालिका प्रशासनातर्फे बनसोडे यांना अधिकाऱ्यांना ओळखपत्र गळ्यात अडकविण्यास बंधनकारक केले आहे. तसेच ड्रेस कोडही बंधनकारक केले आहे, असे पत्र दिल्यानंतर बनसोडे यांनी आंदोलन मागे घेतले.

# तुळजाभवानी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी काढली दिंडी



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.५ जुलै -** आषाढी वारीचे औचित्य साधून येथील संत ज्ञानेश्वरनगरातील तुळजाभवानी शैक्षणिक संकुलाच्या विद्यार्थ्यांनी शुक्रवारी आषाढी वारकरी दिंडी काढली. यावेळी हातात भगव्या पताका घेऊन 'झाडे लावा, झाडे जगवा', वृक्ष संवर्धनाचा संदेश दिला. यावेळी विद्यार्थ्यांच्या विठ्ठल रुक्मिणीच्या वेशभूषेने सर्वांचे लक्ष वेधले.

या दिंडीचे उद्‌घाटन के. ए. जायभाये यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डी. एन. केंद्रे होते.

यावेळी प्राचार्य जी. आर. मुंडे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, एस. बी. शिंदे, सी. एस. मोठे, ए. बी. मुळे, आर. ए. एडके, व्ही. डी. पेठे, एस. ए. जाधव, व्ही. जी. जानवळकर, ए. एस. पाचेगावकर, व्ही. व्ही. लोहारे, व्ही. जी. स्वामी यांची उपस्थिती होती.

या दिंडीत वारकऱ्यांच्या वेशभूषेत विद्यार्थी पालकांसमवेत सहभागी होते. 'विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल'चा जयघोष प्रत्येकाच्या मुखी होता. टाळ मृदृंगांची मंजुळ ध्वनी सर्वांच्या कानावर पडत होती. यावेळी वारकरी वेशात टाळ, मृदंग, वीणा, पताका, डोक्यावर तुळस घेऊन पालखी सोहळ्यात उत्साहात सहभाग दर्शविल्यामुळे विद्यार्थ्यांची ही वारी जणू पंढरपुरी निघाल्याचा प्रत्यय आला. ही दिंडी शाळेपासून निघून वसंतराव नाईक चौक, रिंग रोड, रुद्रेश्वर हनुमान मंदिर, एलआयसी कॉलनी मार्गे या दिंडीचा शाळेत समारोप करण्यात आला.

# डॉ. राहुल कराड एक्सलन्स अवॉर्डने सन्मानित

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.५ जुलै -** लोकशाही, सुशासन आणि शांततेच्या क्षेत्रात अनुकरणीय कार्य केल्याबद्दल महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिल आणि पुणे बार असोसिएशनच्यावतीने एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कार्याध्यक्ष डॉ. राहुल कराड यांना 'एक्सलन्स अवार्ड'ने सन्मानीत करण्यात आले.



बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र व गोव्याचे अध्यक्ष ॲड. विठ्ठल कोंडे-देशमुख आणि पुणे बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. हेमंत झंजड यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलने पुणे बार असोसिएशनच्या सहकार्याने सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश अभय ओक यांच्या सन्मानार्थ कोथरुड येथील एमआयटी डब्ल्यूपीयूच्या स्वामी विवेकानंद सभागृहात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी डॉ. राहुल कराड यांना सन्मानीत करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती उज्ज्वल भुयान, न्यायाधीश महेश सोनक, न्यायाधीश संदीप मारणे, न्यायाधीश आरिफ एस. डॉक्टर, मुंबई उच्च न्यायालयच्या न्यायाधीश रेवती मोहिते-डेरे व अतिरिक्त सॉलिसिटर जनरल ऑफ इंडियाचे अनिल सिंह उपस्थित होते.

सत्काराला उत्तर देताना डॉ. राहुल कराड म्हणाले, राजकारणात सुशिक्षित नागरिकांनी येणे गरजेचे आहे. कास्टिझम, करप्शन आणि कम्यूनिझम या सारख्या गोष्टींना तिलांजली देऊन लोकशाही बलशाली करण्यासाठी देशातील हजारो लॉ मेकर्स कार्य करीत आहेत. गव्हर्नस आणि राजकीय पार्ट्यांमध्ये कसे अनुकलनीय बदल घडविता येईल यावर विचार विमर्श होणे गरजचे आहे. यासाठी एमआयटी डब्ल्यूपीयूच्या पुढाकाराने देशात प्रथमच १८०० पेक्षा अधिक आमदारांच्या संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.

न्यायमूर्ती उज्ज्वल भुयान म्हणाले, लोकशाहीचा पाया म्हणजे कायद्याचे राज्य असते. त्यासाठी राजकीय हस्तक्षेपापासून स्वतंत्र निर्णय घेऊ शकतील अशा न्यायाधीशांसह स्वतंत्र न्यायव्यवस्था गरजेची आहे. लोकशाहीमध्ये न्यायिक पारदर्शकता व न्यायालयीन जबाबदारी महत्त्वाची आहे, असे ते म्हणाले. यावेळी अन्य मान्यवरांचीही समयोचित भाषणे झाली.

## जागतिक हॉस्पिटॅलिटी चळवळीमागील सर्जनशील शक्ति

पुणे : आज जिथे हॉस्पिटॅलिटी अनेकदा ठरावीक लक्झरीच्या चौकटीत अडकलेली दिसते, तिथे ऐट्मस्फिर कोर चे सह-संस्थापक आणि ग्रुप मॅनेजिंग डायरेक्टर सलिल पाणिग्रही एक वेगळा दृष्टिकोन सादर करत आहेत - डिझाइन, सांस्कृतिक सूक्ष्मता आणि ग्राहक-केंद्रित नवकल्पना यांच्या मिश्रणावर आधारित. मालदीवमधील ओझेन रिसर्व्ह बोलीफुशी आणि ओब्लू सिलेक्ट लोबिगिली सारख्या पुरस्कार विजेत्या रिसॉर्ट्सची निर्मिती करून त्यांनी आपल्या कंपनीला एक जागतिक हॉस्पिटॅलिटी ब्रँडमध्ये रूपांतरित केले आहे, जो आता भारत, नेपाळ आणि श्रीलंका यामध्ये विस्तारलेला आहे आणि आता युरोप व आफ्रिकेकडे लक्ष देत आहे.

## एनसीएपी अंतर्गत ५-स्टार सुरक्षा रेटिंग प्राप्त

छत्रपती संभाजीनगर: सुरक्षिततेबाबत कोणतीही तडजोड न करता वाहननिर्मिती करण्याच्या टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) च्या वचनबद्धतेचा महत्त्वपूर्ण पुरावा म्हणून, लोकप्रिय इनोव्हा हायक्रॉसला भारतातील सर्वसमावेशक वाहन सुरक्षा मूल्यांकन प्रणाली - भारत न्यू कार असेसमेंट प्रोग्राम (भारत एनसीएपी) अंतर्गत ५-स्टार सुरक्षा रेटिंग प्राप्त झाले आहे. हा महत्त्वपूर्ण टप्पा ग्राहकांना सुरक्षित आणि विश्वसनीय प्रवासाच्या सुविधा देण्याच्या कंपनीच्या सातत्यपूर्ण आणि मूलभूत दृष्टिकोनाचे प्रतीक आहे. प्रौढ आणि बाल प्रवाशांच्या संरक्षणासाठी हायक्रॉसला ५-स्टार सुरक्षा रेटिंग प्राप्त झाले आहे. आज सकाळी नवी दिल्ली येथे केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री माननीय श्री. नितीन गडकरी यांच्या हस्ते हे प्रमाणपत्र श्री. विक्रम गुलाटी (कंट्री हेड आणि ईव्हीपी - कॉर्पोरेट अफेयर्स आणि गव्हर्नन्स) आणि श्री. सुदीप दळवी (सीसीओ, एसव्हीपी आणि हेड स्टेट अफेयर्स) यांना देण्यात आले.

## आईकू नेआईकू १३ ची विशेष आवृत्ती, एस ग्रीन सादर

पुणे: उच्च-कार्यक्षमता स्मार्टफोन ब्रँड असलेल्या आयक्यूने त्यांच्या प्रमुख आयक्यू १३ स्मार्टफोनचा एक नवीन प्रकार - एस ग्रीन सादर केला आहे. त्याची विक्री १२ जुलै रोजी दुपारी १२:०० वाजल्यापासून आईकूई-स्टोअर आणि ऐमेज़ॉन.इन वर सुरू होईल. एस ग्रीन रंग संयम, अचूकता आणि दबावाखाली कामगिरी या थीम्सपासून प्रेरित आहे. हे अशा लोकांच्या मानसिकतेचे प्रतिबिंबित करण्यासाठी डिझाइन केले आहे जे शांत आत्मविश्वासाने आणि तीक्ष्ण लक्ष केंद्रित करून नेतृत्व करतात.आईकू १३ ऐस ग्रीन व्हेरिएंटची किंमत १२जीबी+२५६जीबी व्हेरिएंटसाठी ५४,९९९ रुपये (प्रभावी किंमत: ५२,९९९ रुपये) आणि १६जीबी+५१२जीबी व्हेरिएंटसाठी ५९,९९९ रुपये (प्रभावी किंमत: ५७,९९९ रुपये) आहे. ही विशेष आवृत्ती १२ जुलै २०२५ पासून आईकूई-स्टोअर आणि ऐमेज़ॉन.इन वर पहिल्यांदाच विक्रीसाठी उपलब्ध होईल. याव्यतिरिक्त, हा स्मार्टफोन आणखी दोन रंगांमध्ये उपलब्ध आहे - लेजेंड आणि नार्डो ग्रे.भारतातील उद्योगातील आघाडीच्या स्नॅपड्रॅगन ८ एलिट प्रोसेसरद्वारे समर्थित,आईकू१३ या स्मार्टफोनने ३ दशलक्ष पेक्षा जास्त ऐनटूटू स्कोअर मिळवला आहे.

## नथिंग भारतातसादर करत आहेत त्यांचा पहिलावहिला फ्लॅगशीप नथिंग फ़ोन (३) आणि हेडफोन (१)

छत्रपती संभाजीनगर - नथिंग या लंडनस्थित तंत्रज्ञान कंपनीने आज भारतात त्यांची अशी दोन उत्पादनेसादर केली ज्यामुळे संबंधित विभागातील मापदंड नव्याने रचले जातील. नथिंग फ़ोन (३) हा त्यांचा खऱ्या अर्थाने पहिला फ्लॅगशीप स्मार्टफोन आणि नथिंग हेडफोन(१)हे पहिले ओव्हर इअर ऑडिओ उत्पादन सादर करण्यात आले. विचारपूर्वक डिझाइन आणि वैशिष्ट्यपूर्णनाविन्यतेसह ग्राहकोपयोगी तंत्रज्ञानाला नवे स्वरूप देण्याचा नथिंग चा दृष्टिकोन यादोन्ही उत्पादनांतून प्रतित होत आहे.नथिंग फ़ोन (३) नथिंग फ़ोन (३) मुळे स्मार्टफोनचापरफॉर्मन्स आणि अभिव्यक्तीचे एक नवे पर्व सुरू झाले आहे. तंत्रज्ञान पुन्हा एकदा आपलेसेवाटावे यासाठी खास तयार करण्यात आलेल्या या स्मार्टफोनमध्ये कमी प्रकाशातही सुंदर फोटोकाढता यावेत यासाठी या क्षेत्रातील सर्वोत्तम अशा १/१.३ मेन सेन्सरसह प्रो ग्रेड ट्रिपल कॅमेरा प्रणाली, लॉसलेसऑप्टिकल झूम आणि पूर्ण ऑप्टिकल इमेज स्टॅबिलायझेशनसह सर्व लेन्सेसमध्ये सिनेमॅटिक ४के ६० एफपीएस व्हिडीओची सोय आहे.

## डॉल्बी सिनेमाचे पदार्पण

छत्रपती संभाजीनगर - डॉल्बी लॅबोरेटरीज, इन्क. (एनवायएसई: डीएलबी) या सर्वोत्तम मनोरंजन अनुभव देणाऱ्या जागतिक अग्रणी कंपनीने आज सिटी प्राइड, खराडी, पुणे येथे भारतातील पहिले डॉल्बी सिनेमाएँ लाँच करत ऐतिहासिक क्षण रचला.हे अत्याधुनिक ऑडिटोरियम ३१०-आसनी डॉल्बी सिनेमा आहे, जे प्रीमियम चित्रपट पाहण्याचा अनुभव देण्यासाठी उद्देशसहित डिझाइन करण्यात आले आहे, ज्यामध्ये डॉल्बी व्हिजनएँ चे उल्लेखनीय व्हिज्युअल्स आणि डॉल्बी ॲटमॉसएँ च्या सर्वोत्तम साऊंडचे संयोजन आहे. फक्त डॉल्बी सिनेमाकडे डॉल्बी व्हिजन ड्युअल ४के लेझर प्रोजेक्शन सिस्टमचा दोन्ही दर्जा आहे, जी ब्राइटनेस, सुस्पष्टता व तपशील वाढवण्यासह स्टुडिओ ग्रेड डॉल्बी ॲटमॉस आणि प्रेरणादायी डॉल्बी सिनेमा डिझाइन देते, ज्यामधून सिनेमागृहामधील प्रत्येक आसनावर वास्तविक अनुभव मिळतो. २डी व ३डी चित्रपटांची पिक्चर क्वॉलिटी व तपशील वास्तविक आहेत, ज्यामुळे सीनमधील दृश्य प्रत्यक्ष घडत आहे असे वाटते.

## ऑगस्ट २०२५ पासून ६0+ देशांमध्ये जगातील सर्वात मोठी वृक्षारोपण मोहीम

नाशिक- अहमदाबाद येथील गिफ्ट सिटी क्लबमध्ये आयोजित एका ऐतिहासिक आणि अभूतपूर्व कार्यक्रमात सेव्ह अर्थ मिशन - जगातील सर्वात वेगाने वाढणारी पर्यावरणीय चळवळ ने आपल्या 'ग्लोबल विझनाच्या' मोहिमेचे औपचारिक अनावरण केले. या विझनचा (दृष्टिकोनाचा) केंद्रबिंदू आहे, ऑगस्ट २०२५ पासून सुरू होणारी ६०+ देशांमध्ये एकाच वेळी राबवली जाणारी आतापर्यंतची सर्वात मोठी वृक्षारोपण मोहीम. या घोषणेची माहिती सेव्ह अर्थ मिशनच्या प्रमुख 'जागतिक विझन अनविलिंग' कार्यक्रमादरम्यान देण्यात आली, जिथे जागतिक हवामान नेते, सरकारी प्रतिनिधी, विद्यार्थी, नवप्रवर्तक आणि पर्यावरणवादी एकत्र जमले. या बहुराष्ट्रीय मोहिमेचा उद्देश आहे कोट्यवधी लोकांना तातडीच्या हवामान कृतीसाठी एकत्र आणणे, झाडे लावणे, पर्यावरणीय परिसंस्था पुनर्जनन करणे आणि नेट झिरो भविष्यासाठी पाया घालणे.

## टोयोटा किर्लोस्कर मोटरचा नवीन सिटी ऑफिसचा शुभारंभ

०५ जुलै २०२५: टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) यांनी आज महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर (सीएसएन) येथे त्यांच्या नवीन सिटी ऑफिसचे उद्घाटन केल्याची घोषणा केली. महाराष्ट्रातील उपस्थिती बळकट करण्याच्या दिशेने हा एक महत्त्वपूर्ण टप्पा असून, भारताच्या ऑटोमोबाईल उद्योगात योगदान देण्याच्या कंपनीच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार यातून होतो.जुलै २०२४ मध्ये टीकेएम आणि महाराष्ट्र शासन यांच्यात झालेल्या सामंजस्य करारानंतर ही विकास प्रक्रिया सुरू झाली. या कराराचा उद्देश या भागात एक ग्रीनफिल्ड उत्पादन सुविधा उभारण्याचा आहे.


पंजाब एण्ड सिंध बैंक
PUNJAB & SIND BANK
(A Government of India Undertaking)
MUMBAI ZONE

जागेची आवश्यकता

शाखा उघडणे / स्थलांतरित करण्यासाठी निम्न परिसरात तळमजल्यावरील जागा किमान १५ वर्षांसाठी भाडेपट्टीवर घेण्यास बँक इच्छुक आहे.

| अ. क्र | शाखेचे नाव व परिसर | चटई क्षेत्र चौ.फूट |
|---|---|---|
| १. | धाराशिव शहर, जिल्हा धाराशिव, महाराष्ट्र (प्राधान्य क्षेत्र: डीआयसी रोड, सेंट्रल बिल्डिंग, समता कॉलनी) | १२०० चौरस फूट पर्यंत |
| २. | बीड शहर, जिल्हा बीड, महाराष्ट्र | १२०० चौरस फूट पर्यंत |
| ३. | लातूर शहर, जिल्हा लातूर, महाराष्ट्र | १२०० चौरस फूट पर्यंत |

इच्छुक पक्षांकडून दोन वेगवेगळ्या लिफाफ्यांमध्ये निर्धारित नमून्यात तांत्रिक व आर्थिक बोलीच्या निविदा मागविण्यात येत आहेत. दोन वेगवेगळ्या लिफाफ्यांमध्ये मोहोरबंद निविदा जमा करण्याची अंतिम तारीख २८ जुलै २०२५ आहे. अधिक तपशीलाकरिता बँकेच्या वेबसाइट www.punjabandsindbank.co.in ला भेट द्या.

आंचलिक प्रबंधक
मुंबई


# वरखेडी बृ तांडा येथील ग्रामस्थ यांची तीन महिन्यांपासून पाण्यासाठी भटकंती



तभा वृत्तसेवा
फर्दापूर दि ५

वरखेडी (बुद्रुक) ता.सोयगाव येथे गेल्या ३ महिन्यांपासून पाणीपुरवठा होत नसल्याने येथील ग्रामस्थांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. पिण्याच्या पाण्याची मोठी समस्या निर्माण झाल्याने वारंवार सांगूनही ग्रामपंचायत दुर्लक्ष करत असल्याने गावकऱ्यांनी थेट ग्रा.पंचायत गाठत प्रशासनाविरोधात हल्लाबोल केला. वरखेडी (बुद्रुक) येथे ग्रामपंचायत अंतर्गत पाणी पुरवठा केला जातो.मात्र,येथील वार्ड क्र.२ मधील रामदेवबाबा वाडीत गेल्या ३ महिन्यांपासून पाणीपुरवठा होत नसल्याने महिलांना पाण्यासाठी वणवण फिरावे लागत आहे. पाणीपुरवठा योजना असूनही या भागात पाणी सोडल्या जात नसल्याने संतप्त गावकऱ्यांनी शनिवारी सकाळी ११ वाजता ग्रामपंचायत कार्यालय गाठले.मात्र ग्रा.कार्यालय बंद असल्याने आक्रमक गावकऱ्यांनी ग्रामपंचायत विरोधात हल्लाबोल केला.यावेळी सरपंच,उपसरपंच व ग्रामविकास अधिकारी हजर नव्हते. गेल्या ३ महिन्यापासून पाण्याची समस्या सरपंचांना सांगून सुद्धा ते आमच्या समस्येकडे दुर्लक्ष करत असतात. गांभीर्याने आमची दखल घेतली जात नसल्याचे गावकऱ्यांनी सांगितले. मुक्ताबाई चव्हाण, सगुणाबाई जाधव, बौलीबाई राठोड,अर्जुन राठोड,समाधान जाधव आदी गावकऱ्यांनी ग्रामपंचायत विरोधात आपल्या भावना व्यक्त केला.येथील कार्यरत ग्रामसेवक सतत गैरहजर राहिल्याने गावकऱ्यांना कागदोपत्रीसाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो आहे.दुसऱ्या वार्डमध्ये फिल्टर न करता दूषित पाणीपुरवठा केला जात असल्याने गावकऱ्यांचा आरोग्याचा प्रश्न उपस्थित झाला आहे. अर्जुन राठोड त्रस्त ग्रामस्थ वरखेडी बृ आमच्या गावात ग्रामसेवक फक्त एक वेळा आले त्या दिवसापासून आजपर्यंत आले नाही सर्व कारभार छत्रपती संभाजीनगर येथून चालतात त्यामुळे आम्ही ग्रामस्थ पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे.

# आपण रुग्णाची तर मी शहराची सर्जरी करतो : आयुक्त जी. श्रीकांत

## एमजीएम रुग्णालयात इंडोसर्ज राष्ट्रीय कार्यशाळेचे उद्घाटन संपन्न



छत्रपती संभाजीनगर, दि. ५ : आज आपल्या सर्वांना असा प्रश्न पडला असेल की, एक प्रशासकीय अधिकारी डॉक्टरांच्या कार्यशाळेत काय करतोय? मात्र, याचे असे आहे की, मी एक प्रकरचा सर्जन असून आपण सर्व डॉक्टर्स रुग्णावर सर्जरी करता आणि एक प्रशासक म्हणून मी शहरावर सर्जरी करतो, असे प्रतिपादन छत्रपती संभाजीनगर महानगर पालिकचे आयुक्त जी. श्रीकांत यांनी यावेळी केले.

महात्मा गांधी मिशन वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय आणि असोशिएशन ऑफ सर्जन्स ऑफ इंडिया यांच्या वतीने आयोजित इंडोस्कोपी या विषयावरील 'इंडोसर्ज' या तिसऱ्या राष्ट्रीय कार्यशाळेचे उद्घाटन एमजीएम द्योतन सभागृहात मान्यवरांच्या प्रमुख उपस्थतीत संपन्न झाले. यावेळी, आयुक्त जी. श्रीकांत यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

यावेळी, एमजीएमचे उपाध्यक्ष डॉ. पी. एम. जाधव, सचिव अंकुशराव कदम, असोशिएशन ऑफ सर्जन्स ऑफ इंडियाचे अध्यक्ष डॉ.प्रविण सूर्यवंशी, अधिष्ठाता. डॉ.राजेंद्र बोहरा, डॉ. सत्यजीत पाथ्रीकर, डॉ.भास्कर मुसांडे, डॉ.आर.एम.शिंदे, डॉ. नवीन कासलीवाल, देशभरातून आलेले डॉक्टर्स व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना आयुक्त जी. श्रीकांत म्हणाले, आपले शहर चांगले, अपघातमुक्त व्हावे म्हणून आम्हालाही शहराची सर्जरी करणे गजेचे असते.

पाठीमागील ७ दिवसात शहरातील ५५०० अनधिकृत स्ट्रक्चर आम्ही पाडले. ही कारवाई भविष्यकाळत शहराच्या आतही आम्ही करणार आहोत. राज्याच्या या पर्यटन राजधानीस सुरक्षित आणि चांगले बनविण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. आज या डॉक्टरांच्या कार्यशाळेत येऊन मनापासून आनंद झाला असून या कार्यशाळेस माझ्या शुभेच्छा आहेत.

असोशिएशन ऑफ सर्जन्स ऑफ इंडियाच्या माध्यमातून प्रवीण सूर्यवंशी यांच्या पुढाकाराने अशा प्रकारचे वेगवगेळे उपक्रम सातत्यपूर्णपणे राबवले जात आहेत. आज एमजीएम रुग्णालयाकडून सर्व प्रकारच्या सुविधा रुग्णांसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तंत्रज्ञान बदलत असून या कार्यशाळेत शिकवले जाणारे तंत्रज्ञान डॉक्टर्स यांना आपल्याला भागामध्ये रुग्णांसाठी वापरता येईल, असे एमजीएमचे उपाध्यक्ष डॉ. पी. एम. जाधव यांनी यावेळी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.प्रविण सूर्यवंशी यांनी केले. ही दोन दिवसीय कार्यशाळा देशभरातील १२० पेक्षा अधिक वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दाखविण्यात येत आहे. या दोन दिवसीय कार्यशाळेत ३५ इंडोस्कोपीक प्रोसीजर प्रात्यक्षिक करत शिकवल्या जाणार आहेत. पहिल्यांदाच अशा प्रकारचे थेट प्रसारण संपूर्ण भारतभर करण्यात येत आहे.

# आय एम ए तर्फे बाफना अंध विद्यालयात मोफत आरोग्य तपासणी



छत्रपती संभाजीनगर - आय एम ए कनेक्ट हा इंडियन मेडिकल असोसिएशन, छत्रपती संभाजीनगर शाखेचा एक आगळावेगळा सामाजिक प्रकल्प असून, विविध कारणांमुळे डॉक्टरांकडे येऊ न शकणाऱ्या गरजू नागरिकांपर्यंत वैद्यकीय सेवा पोहोचवण्याचा उद्देश त्यामागे आहे.

या उपक्रमांतर्गत आतापर्यंत मातोश्री वृद्धाश्रम, भगवानबाबा अनाथाश्रम, गतिमंद मुलांचे निवासस्थाने याठिकाणी आरोग्यसेवा पोचवण्यात आली असून, याच मालिकेतील चौथा उपक्रम म्हणून बाफना अंध मुलांच्या शाळेत हे सेवा कार्य पार पडले. या मध्ये दृष्टिहीन विद्यार्थ्यांची मोफत वैद्यकीय तपासणी आणि औषधोपचार करण्यात आले. दृष्टिहीन असूनही यशाच्या शिखरावर पोहोचलेल्या बाबासाहेब ठोंबरे (ऋद्धढ विभागातील राज्य कर निरीक्षक) यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. आपण कोणत्या परिस्थितीतून आलो यापेक्षा, आपण कुठे पोहोचू शकतो याचे स्वप्न मोठं असायला हवं हा संदेश त्यांनी मुलांच्या मनात रुजवला. या कार्यक्रमात डॉक्टरांनी त्यांच्या घरी जाऊन तपासणी करण्याच्या पद्धतीने समाजाच्या दुर्लक्षित घटकांपर्यंत वैद्यकीय सेवा पोहोचवण्याचा संदेश दिला. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून दीपक अग्रवाल हे होते तर निरूपमा बाफना आय एम ए अध्यक्ष डॉ. अनुपम टाकळकर, सचिव डॉ. योगेश लक्कस, डॉ. यशवंत गाडे, डॉ. दत्ता कदम, डॉ. अंजली गाडे, डॉ. आसावरी टाकळकर, डॉ. गौरव साळवे (संयोजक), डॉ. प्रतिमा भाले, डॉ. राहुल बडे, डॉ. संजय खंडागळे, डॉ. गितेश दळवी, डॉ. संभाजी चिंतले, डॉ. अमोल उबाळे, डॉ. रुपाली लक्कस, डॉ. रश्मी दळवी,बाफना ब्लाइंड स्कूल, छत्रपती संभाजीनगर प्राचार्य श्री. निकम आदी उपस्थित होते. डॉ. गौरव साळवे यांनी सूत्रसंचालन केले तर आभारप्रदर्शन डॉ. योगेश लक्कस यांनी केले.

## 'रिस्पाईन १००० स्टेप्स टू स्ट्रेन्थ' कार्यक्रमात १००० यशस्वी शस्त्रक्रियांचा गौरव

### आ.प्रदीप जैस्वाल यांची प्रमुख उपस्थिती



कमलनयन बजाज हॉस्पिटलतर्फे आयोजित 'रिस्पाईन १००० स्टेप्स टू स्ट्रेन्थ' या विशेष कार्यक्रमाद्वारे डॉ.अनुज भारूका यांनी पार पाडलेल्या १००० हून अधिक यशस्वी पाठीच्या शस्त्रक्रियांच्या प्रवासाचा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून छत्रपती संभाजीनगरच्या मध्य विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रदीप जैस्वाल साहेब उपस्थित होते. त्यांच्यासोबत सिव्हिल सर्जन डॉ.कमलाकर मुदखेडकर आणि बजाज हॉस्पिटलचे उएज डॉ.जॉर्ज नोएल फर्नांडिस यांनीही विशेष उपस्थिती दर्शवली. कार्यक्रमात डॉ.अनुज भारूका यांच्या कौशल्यपूर्ण वैद्यकीय सेवेला दाद देण्यात आली आणि पाठीच्या समस्यांवर त्यांनी दिलेल्या उपचारांच्या यशस्वी उदाहरणांचे कौतुक करण्यात आले. यावेळी आमदार प्रदीप जैस्वाल यांनी डॉ.अनुज भारूका यांच्या कार्याबद्दल गौरव व्यक्त करत, समर्पित भावनेने आणि सेवाभावी दृष्टिकोनातून रुग्णसेवा करणारे डॉक्टर्स हे समाजाचे खरे आधारस्तंभ आहेत. डॉ.भारूका यांचे योगदान प्रेरणादायक आहे, असे प्रतिपादन केले.

## हिरडपुरी जि.प शाळेत शालेय साहित्य वाटप



पैठण दि ०५ : पैठण विधानसभेचे लोकप्रिय आमदार विलास बाप्पू भुमरे यांच्या वाढदिवसानिमित्त हिरडपुरी हनुमान नगर येथे जिल्हा परिषद शाळेतील समस्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले.

यावेळी ग्रामपंचायत सदस्य इस्लाम पटेल, रामेश्वर गांधले,सुरेश गांगले, परमेश्वर शेळके, भिवा भंडारे, सदाशिव मोरे,रामनाथ घाडगे, संदिप मोरे, मुख्याध्यापक प्रल्हाद घायतडक, गोरख मोरे सह ग्रामस्थ उपस्थित होते.

**मा. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर सोयगांव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

## जाहीर प्रगटन

किरकोळ दिवाणी अर्ज क.: २०७/२०२५

अर्जदारः १. सुमनबाई युवराज पाटील (बावस्कर), वय-८० वर्षे, धंदा रा. घोसला, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर. २. मिनाबाई संजय चौधरी, वय ५० वर्षे, धंदा निरंक, घरकाम, रा. काळेनगर, सोयगांव, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर. ३. अर्चना पांडूरंग पाटील, वय ३० वर्षे, धंदा घरकाम, रा. गोद्री, ता. जामनेर, जि. जळगांव. ४. भगवान युवराज पाटील, वय ३० वर्षे, धंदा घरकाम, रा. घोसला, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर.

विरुध्द

गैरअर्जदार : अनिताबाई एकनाथ पाटील, वय ४५ वर्षे, धंदा घरकाम, रा. घोसला, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर.

प्रकरण : वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. आर. ए. गिरी, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. मयत युवराज कडूबा पाटील (बावस्कर) हे दि. १६/१२/२०२१ रोजी घोसला, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर येथे त्यांचा मृत्यू झालेला असून त्यांच्या पश्चात वरील अर्जदार व गैरअर्जदार हे वारस आहे. असा अर्ज न्यायालयात वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार व गैरअर्जदार हे मयत युवराज कडूबा पाटील (बावस्कर) यांचे वारस असुन त्यांना शासकीय व निम शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनद्वारे प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्री सह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख १३/०८/२०२५.

आज दि. ०३/०७/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरुन

विभागीय लिपीक — सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर सोयगांव

## जाहीर प्रगटन

**मा. व्ही. डी. पाटील साहेब, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, कन्नड यांचे न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांकः ३१६/२०२५

पु.ता.- ०२/८/२५

अर्जदार :- १- परीगाबाई साहेबराव मालकर, वय ६४ वर्षे, धंदा घरकाम, रा. अंधानेर, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर २- बाळु साहेबराव मालकर, वय ४६ वर्षे, धंदा शेती व खाजगी नौकरी, रा. अंधानेर, ता. कन्नड, ह.मु. पारीजात नगर, म्हाडा तिसगांव, जिल्हा छ. संभाजीनगर ३- मंगल रविंद्र जाधव, वय ४३ वर्षे, धंदा घरकाम, रा. बहिरगांव, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर ४- शिवराम साहेबराव मालकर, वय ४१ वर्षे, धंदा शेती, रा. अंधानेर, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर

- विरुध्द -

गैरअर्जदार - निरंक

अर्ज : मुंबई रेग्युलेशन ॲक्ट अन्वये वारसाचं प्रमाण पत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थो अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ ॲड. एम. एम. भारुका यांच्या मार्फत मा. न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार १ चे पती व अर्जदार २ ते ४ चे वडील नामे साहेबराव शेकुबा मालकर यांचा दिनांक १८/०१/२०२५ रोजी अंधानेर, ता. कन्नड येथे मृत्यु झालेला असून त्यांच्या पश्चात अर्जदार १ ते ४ हेच केवळ वारस असून अर्जदारां व्यतीरिक्त मयतास ईतर कोणतेही वारस नाही. अर्जदारांना वरील प्रमाणे मयत साहेबराव शंकुबा मालकर यांच्या मृत्यु पश्चात वारसा हक्काने मिळणारे सर्व हक्क व अधिकार तसेच शासकीय व निमशासकीय फायदे व अभिलेखात नोंदी घेण्या करीता वारस प्रमाण पत्र आवश्यक आहे. सदरील शासकीय कामकाजात सक्षम न्यायालयाच्या वारसा प्रमाण पत्रा शिवाय अर्जदाराचे हक्क व अधिकार बजावण्या करीता अडचण निर्माण झालेली असल्यामुळे प्रस्तुतच्या अर्जास दिनांक ११/०६/२०२५ रोजी कारण घडले आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर, आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर, आक्षेप सादर करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास, अर्जदारांचे हक्कात वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.

सबब हे जाहीर प्रगटन.

दिनांक - ४/७/२०२५

आदेशावरुन

क. लिपिक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय, क. स्तर, कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा. डी. एस. तांबे मॅडम सहदिवाणी न्यायाधिश, कनिष्ठ स्तर, कन्नड यांचे न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक २८२/२०२५

पु.ता. - २५/७/२०२५

अर्जदार : १- तुळसाबाई पोपट शिंदे, वय ८५ वर्षे, धंदा घरकाम, रा. शिवराई, ता. कन्नड, जिल्हा संभाजीनगर २- विष्णु पोपटराव शिंदे, वय ४८ वर्षे, धंदा शेती, रा. शिवराई, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर ह.मु. फतीयाबाद पो. माळीवाडा, जि. छ. संभाजीनगर ३- साहेबराव पोपटराव शिंदे, वय ४८ वर्षे, धंदा मजुरी, रा. शिवराई, ता. कन्नड, जि. छ. संभाजीनगर ह.मु. नोबेल डी. एड. कॉलेज जवळ, ग्रीन व्हेली पार्क, पडेगांव, जिल्हा छ. संभाजीनगर ४- दत्तु पोपटराव शिंदे, वय ३५ वर्षे, धंदा शेती, रा. शिवराई, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर ५- संतोष पोपट शिंदे, वय ३५ वर्षे, धंदा शेती, रा. शिवराई, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर

- विरुध्द -

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन, मार्फत - जिल्हाधिकारी संभाजीनगर जिल्हा संभाजीनगर

अर्ज :-मुंबई रेग्युलेशन ॲक्ट अन्वये वारसाचे प्रमाण पत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ एम. एम. भारुका यांचे मार्फत मा. न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार १ ची पत्नी व अर्जदार २ ते ५ चे वडील नामे पोपटराव परभत शिंदे यांचा दिनांक २३/०५/२०२४ रोजी शिवराई ता. कन्नड येथे मृत्यु झालेला असून त्यांच्या पश्चात अर्जदार १ ते ५ हेच केवळ वारस असून अर्जदारां व्यतीरिक्त मयतास ईतर कोणतेही वारस नाही.

अर्जदार यांना मयत पोपटराव शिंदे यांच्या मृत्यु पश्चात वारसा हक्काने मिळणारे सर्व हक्क व अधिकार तसेच शासकीय व निमशासकीय फायदे व अभिलेखात नोंदी घेण्या करीता वारस प्रमाण पत्र आवश्यक आहे. सदरील शासकीय कामकाजात सक्षम न्यायालयाच्या वारसा प्रमाण पत्रा शिवाय अर्जदाराचे हक्क व अधिकार बजावण्या करीता अडचण निर्माण झालेली असल्यामुळे प्रस्तुतच्या अर्जास दि. १२/०५/२०२५ रोजी कारण घडले आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर, आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर, आक्षेप सादर करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास, अर्जदारांचे हक्कात वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.

सबब हे जाहीर प्रगटन.

दिनांक १९/०८/२०२४

आदेशावरुन

क. लिपिक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय, क. स्तर, कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा. व्ही. डी. पाटील साहेब, दिवाणी न्यायाधिश, कनिष्ठ स्तर, कन्नड यांच्या न्यायालयात.**

दि.कि.अर्ज क्र.३२४/२०२५

अर्जदार : १- इसाक सिराज उर्फ सिराजभाई सय्यद, वय ५७ वर्षे धंदा- शेती, रा.टाकळी (ल) पो. जैतापुर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद २- मुस्ताक सिराजभाई सय्यद, वय- ५५ वर्षे, धंदा- शेती, रा. टाकळी (ल) पो. जैतापुर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद ३) आशियाबी समदखॉ पठाण, वय- ५३ वर्षे, धंदा- घरकाम, रा. अंधानेर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद ४) सिराजभाई अमिरभाई सय्यद, वय ८६ वर्षे, धंदा- शेती, रा. टाकळी (ल) पो. जैतापुर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार :- महाराष्ट्र शासन तर्फे (निरंक)

अर्ज :-वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ आर. एम. नरोटे यांचे मार्फत मा. न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्र. १ ते ४ हे वरील ठिकाणचे रहीवाशी असुन, अर्जदार क्र. १ ते २ हे आपसात सख्ख्ये भाऊ असुन अर्जदार क्र. ३ ही त्यांची बहीनी आहे, तसेच अर्जदार क्र. ४ हे अर्जदार क्र. १ ते ३ यांचे वडील आहे. अर्जदार क्र. १ ते ३ यांची आई व अर्जदार क्र. ४ यांच्या पत्नी नामे बेगमबाई सिरजभाई सय्यद या होत्या त्या दिनांक ०४/०३/२०२५ रोजी मौजे टाकळी (ल) ता. कन्नड येथे राहत्या घरी मयत झालेल्या आहे, सोबत ग्राम पंचायत टाकळी (ल) यांनी दिलेले मृत्यु प्रमाणपत्र दाखल करीत आहे.

अर्जदार यांना मयत बेगमबाई सिरजभाई सय्यद यांचे वारस प्रमाणपत्र हे शासकिय तसेच निमशासकिय कार्यालयात देण्यासाठी तसेच महसुल दप्तरी वारसाची नोंद करण्यासाठी तसेच तहसिल कार्यालयात, तसेच ग्रामपंचायत टाकळी (ल) येथे वारस असल्याची नोंद करण्यासाठी, जिल्हाधिकारी कार्यालयात नोंद करण्यासाठी, तसेच शासकिय, निमशासकिय योजनेचा लाभ घेण्यासाठी सदरील वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. वरील अधिकाऱ्यांनी न्यायालयाचे वारस प्रमाणपत्र घेवुन येणे असे दिनांक २३/०६/२०२५ रोजी तोंडी सांगीतल्यावरुन सदरील अर्जास कारण घडले आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर, आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर, आक्षेप सादर करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास, अर्जदारांचे हक्कात वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.

सबब हे जाहीर प्रगटन.

दिनांक १/०७/२०२५

आदेशावरुन

क. लिपिक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय, क. स्तर, कन्नड

## अग्रलेख...

# 'सर्वोच्च' निर्णयाचा बोध

रस्ते अपघातात होणारे मृत्यू ही देशातील सर्वांत मोठी आणि गंभीर अशी समस्या म्हणायला पाहिजे. युद्धात आणि नैसर्गिक आपत्तीत आपल्या देशात दरवर्षी जेवढे मृत्यू होत नाहीत, त्यापेक्षा जास्त लोकांचे मृत्यू हे रस्त्यावरील अपघातात होत असतात. अधिकृत सरकारी आकडेवारीनुसार, दरवर्षी आपल्या देशात पाच लाख रस्ते अपघात होतात आणि त्यात दरवर्षी दीड लाखावर लोकांचे मृत्यू होतात, तर तीन लाखांवर लोक जखमी होतात. अपघातामुळे कायमस्वरूपी अपंगत्व येणाऱ्या लोकांची संख्याही कमी नाही. विशेष म्हणजे रस्ते अपघातात मृत्युमुखी पडणाऱ्यांमध्ये तरुणांची संख्या खूप मोठी आहे. रस्ते अपघातात एखाद्या व्यक्तीचा मृत्यू होणे म्हणजे एक कुटुंब पूर्णपणे उद्ध्वस्त होण्यासारखे असते. पत्नी आपला पती, लहान मुले आपले वडील, बहीण आपला भाऊ तर वृद्ध आई-वडील आपला म्हातारपणाचा आधार गमवत असतात. त्यामुळेच रस्त्यांवरील अपघातात होणाऱ्या या प्राणहानीबाबत केंद्रीय भूपृष्ठ परिवहन आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी आपल्या सगळ्या भाषणांमध्ये सातत्याने चिंता व्यक्त करीत असतात. रस्ते अपघातात होणारी प्राणहानी कमी करण्यासाठी येत असलेल्या अपयशाबाबत शासकीय यंत्रणांना दोष देत असतात. येत्या पाच वर्षांत रस्ते अपघातात बळी पडणाऱ्यांची संख्या ५० टक्क्यांवर आणण्याचा महत्त्वाकांक्षी संकल्पही गडकरी यांनी सोडला आहे.

कोणत्याही रस्ते अपघाताचे कारण एक नसते, तर रस्ते अपघाताची कारणे एकापेक्षा जास्त म्हणजे अनेक असतात. सदोष रस्ते बांधणी तसेच धोकादायक वळण हे रस्ते अपघाताचे एक प्रमुख कारण मानले जाते. गडकरी आपल्या भाषणात या कारणाचा सतत उल्लेख करीत असतात. रस्त्यावरील अपघात प्रवण क्षेत्र चिन्हीत करून त्या ठिकाणी असलेले अपघाताचे कारण दूर करण्याचे निर्देश गडकरी हे महाराष्ट्रात आधी सार्वजनिक बांधकाम मंत्री तसेच नंतर गेल्या ११ वर्षांपासून केंद्रात याच खात्याचे मंत्री असताना सातत्याने देत आहेत. त्याचा बऱ्यापैकी परिणाम झालेलाही दिसून येत आहे.

दारू पिऊन वाहन चालवणे हे आपल्या देशातील रस्ते अपघाताचे दुसरे प्रमुख कारण म्हटले पाहिजे. आपल्या देशात दारू पिणे ही फॅशन झाली आहे आणि दारू पिऊन वाहन चालवणे ही सवय असे म्हटले तर ते चूक ठरू नये. ट्रकसारखे अवजड वाहन चालवणारे बहुतांश चालक दारू पिऊन असतात, असे म्हटले जाते. याचा अर्थ सगळेच ट्रकचालक दारू पिऊन असतात, असे नाही, पण बहुतांश ट्रकचालक दारू पिऊन वाहन चालवतात, हे कोणालाच नाकारता येणार नाही. त्यामुळे बहुतांश अपघात हे ट्रकचेच वा ट्रकमुळे झालेले असतात.

याचा अर्थ खाजगी वाहनचालक दारू पिऊन आपली गाडी चालवत नाहीत, असे नाही. आजकाल तर दारू पिऊन वाहन चालवणे ही फॅशन झाली आहे. जो दारू पीत नाही त्याला गावंढळ समजले जाते. काही जण दारू पिऊनही अतिशय सावधपणे वाहन चालवत असतात, अशांची संख्या खूप कमी आहे. तर काही जण दारू न पिताही बेदरकारपणे वाहन चालवत असतात. हे सगळे रामायण सांगण्याचे कारण म्हणजे सर्वोच्च न्यायालयाचा ताजा निर्णय. बेदरकारपणे वाहन चालवताना झालेल्या अपघातात चालकाचा मृत्यू झाला, तर त्याच्या कुटुंबीयांना विम्याची राशी देणे विमा कंपन्यांना बंधनकारक नसल्याचा महत्त्वपूर्ण निकाल सर्वोच्च न्यायालयाने नुकताच दिला आहे. २०१४ मध्ये कर्नाटकातील मल्लासांद्रा येथे एका अपघातात एका व्यक्तीचा मृत्यू झाला होता. एन. एस. रवीश नावाची व्यक्ती कार चालवत होती, कारमध्ये त्याचे पालक आणि मुलेही होती. रवीश बेदरकारपणे कार चालवत होता, तसेच वाहतुकीचे नियमही पाळत नव्हता, वेगात असलेली कार नियंत्रण सुटल्यामुळे उलटली आणि त्यात त्याचाच मृत्यू झाला. रवीशच्या कुटुंबीयांनी केलेला अपघात विम्याचा ८० लाखांचा दावा विमा कंपनीने फेटाळला. त्या निर्णयाला कुटुंबीयांनी कर्नाटक उच्च न्यायालयात आव्हान दिले. उच्च न्यायालयानेही कुटुंबीयांचा दावा फेटाळत विमा कंपन्यांच्या बाजूने निर्णय दिला. याला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले असता, न्यायालयाने उच्च न्यायालयाच्या निर्णयात हस्तक्षेप करण्यास नकार दिला. रवीश बेदरकारपणे वाहन चालवत होता, असे दोन्ही न्यायालयांनी आपल्या निकालात म्हटले आणि त्याच्या कुटुंबाचा विम्याचा दावा फेटाळला. रवीश हा दारू पिऊन होता, असे चौकशीत आढळले नाही. मात्र बेजबाबदारपणे वाहन चालवत होता, असा ठपका त्याच्यावर न्यायालयाने ठेवला आहे. कर्नाटक उच्च न्यायालयाचा तसेच सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय हा दूरगामी परिणाम करणारा तसेच लोकांच्या डोळ्यात अंजन घालणारा आहे, असे म्हटले पाहिजे. या निर्णयापासून लोकांनी काही बोध घ्यायला, धडा शिकायला पाहिजे. दारू पिऊन गाडी चालवू नये आणि गाडी चालवताना वाहतुकीच्या नियमांचे पालन केले पाहिजे, हा तो बोध म्हटला पाहिजे. यातील कोणताही एक नियम पाळणे पुरेसे नाही, तर दोन्ही नियम एकाच वेळी पाळले पाहिजेत, हे या प्रकरणात दिसून आले आहे. असे न झाल्यामुळे रवीशच्या कुटुंबीयांनी आपल्या घरातील कर्ता पुरुष तर गमावला आणि सोबत विमा कंपनीकडून आर्थिक मदत मिळण्यासही ते अपात्र ठरले, म्हणजेच त्यांचे दुहेरी नुकसान झाले. आपल्या देशात वाहतुकीचे नियम पाळले जात नाहीत. वाहतुकीचे नियम हे पाळण्यासाठी नाही तर उल्लंघन करण्यासाठीच असतात, अशी आपल्या देशातील लोकांची धारणा झालेली दिसते. अनेकवेळा लाल दिवा लागला असतानाही वाहनचालक भरधाव निघून जातात. ही देशातील कोणत्याही एका शहरातील गोष्ट नाही, तर सगळ्याच शहरात कमी-अधिक प्रमाणात हे घडत असते. लाल दिवा असताना न थांबता तुम्ही भरधाव निघून जात असाल तर तुमचा अपघात होऊ शकतो वा तुमच्यामुळे वाहतुकीचे नियम पाळणाऱ्या दुसऱ्या व्यक्तीचाही अपघात होऊ शकतो. आजकाल वाहतुकीच्या नियमांचे सर्रास उल्लंघन केले जाते. ज्या चौकात वाहतूक पोलिस असतात, त्या चौकात वाहतुकीला थोडीफार तरी शिस्त असते. लोक आपण नियम पाळत असल्याचे दाखवत असतात. मात्र ज्या चौकात वाहतूक पोलिस नसतात, त्या चौकात लाल दिवा असतानाही भरधाव निघून जाणाऱ्यांची संख्या जास्त असते. मुळात वाहतुकीचे नियम हे तुम्हाला रोखण्यासाठी, तुमचा वेळ घेण्यासाठी नाही तर तुमचा जीव वाचवण्यासाठी आहे, तसेच तुमच्या घरात असलेल्या तुमच्या जीवलगांच्या भवितव्यासाठी आहेत, हे सगळ्यांनी समजून घेतले पाहिजे.

रस्त्यावरील अपघात आपल्याला पूर्णपणे संपवता येणार नसले तरी त्याची संख्या आपण कमी मात्र नक्कीच करू शकतो. त्यासाठी जनजागृती करणे आवश्यक आहे. यासाठी सरकारसोबत स्वयंसेवी संस्थांनीही पुढाकार घेण्याची गरज आहे. देशात आणि काही शहरांत अशा स्वयंसेवी संस्था आणि व्यक्ती काम करीत आहेत. मात्र अशा संस्थांची आणि लोकांची संख्या वाढली पाहिजे. आजार झाल्यानंतर उपचार घेण्यापेक्षा आजारच होणार नाही, याची काळजी घेणे जसे फायदेशीर असते, तसेच अपघात होऊ नये म्हणून प्रयत्न करणे, आवश्यक आहे. यासाठी वाहतुकीचे नियम पाळण्याची सवय आम्ही आपल्याला लावून घेतली पाहिजे. मुळात चौकात वाहतूक पोलिस आहे, म्हणून आम्ही वाहतुकीचे नियम पाळू ही वृत्ती सोडून दिली पाहिजे.

शाळा आणि महाविद्यालयांतून यासाठी जगजागृतीचे कार्यक्रम घेतले पाहिजेत. एवढेच नाही तर शालेय आणि महाविद्यालयीन अभ्यासक्रमात एक विषय म्हणून याचा समावेश करण्याची गरज आहे. पहिल्या वर्गापासून नाही तर किमान पाचव्या वर्गापासून वाहतुकीच्या नियमांचा शाळेच्या अभ्यासक्रमात समावेश केला पाहिजे. म्हणजे जेव्हा हे विद्यार्थी मोठे होऊन गाडी चालवायला लागतील, तेव्हा त्यांना वाहतुकीच्या नियमांचे पालन करायला सांगण्याची वेळ येणार नाही. देशातील रस्ते अपघातांची तसेच त्यातील बळींची संख्या कमी करण्याचे स्वप्न नितीन गडकरी यांनी पाहिले असले तरी ते स्वप्न पूर्ण करणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयातून एवढा तरी बोध आपण सर्वांनी घेतला पाहिजे.

---

## यंगिस्तान

# पण मराठी माणसाचा जीव जातो!

जयेश शत्रुघ्न मेस्त्री

माझा मुलगा मराठी माध्यमात शिकतो, मी स्वतः मराठी भाषा आणि मराठी शाळा टिकवण्यासाठी माझ्या परीने प्रयत्न करत आहे, या वाक्याने लेखाची सुरुवात करत आहे. हे सांगण्याचं कारण मराठीचा साधा गंधही नसलेले लोक, आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमात घालणारे लोक, घरात मुलांना आई-बाबा, आजी-आजोबा असं बोलायला न शिकवता मम्मी-पप्पा, मम्मा, मॉड, डॅड्डा-फॅड्डा म्हणायला शिकवणारे लोक मराठीचे कैवारी असल्याचा आव आणतात. त्यांचा समाचार आधीच घेतलेला बरा! आता लेखाला सुरुवात. महानगरपालिकेची निवडणूक आता जवळ आली आहे. बीएमसी ही सोन्याचं अंड देणारी कोंबडी आहे आणि सर्वांचेच डोळे त्याकडे लागले आहेत. अनेक वर्षे पालिकेवर शिवसेनेची सत्ता होती. आता ही सत्ता भाजपाकडे जाण्याची चिन्हे दिसत आहेत. कारण मागच्या वेळी देवेंद्र फडणवीसांनी जुन्या मैत्रीला जागून पालिकेची सत्ता मिळवली नाही. निवडणूक जवळ आल्यामुळे नेहमीप्रमाणे महाराष्ट्राचं वातावरण गढूळ करण्याचं काम राजकीय पक्षांकडून केलं जात आहे. सर्वप्रथम मी एक गोष्ट स्पष्ट करू इच्छितो की, महाराष्ट्रात मराठीला प्राधान्य दिलं पाहिजे. महाराष्ट्रात राहणाऱ्या, किमान १ वर्ष वास्तव्य करणाऱ्या माणसाला तोडकं मोडकं का होईना, पण मराठी आलीच पाहिजे. ''हम मराठी नहीं बोलेंगे, जो करना है करो'' हा माज चालणारच नाही. आणि सरकारनेच यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. महाराष्ट्रात मराठीला प्राधान्य मिळालेच पाहिजे. त्यासाठी विविध ठिकाणी वाचनालये, मराठी शिकवणी, साहित्य सभा, वाचन कट्टा इत्यादी कार्यक्रम राबवून लोकांमध्ये विशेषतः तरुण व लहान मुलांमध्ये मराठीची गोडी वाढवली पाहिजे. अशी अनेक चांगली कामे करता येऊ शकतात. परंतु उपद्रव माजवणाऱ्यांना केवळ सत्ता हवी आहे. कोणतेही चांगले व सुसंस्कृत काम करायचे नाही.

आता आपण खळ्ळखट्याकवर चर्चा करूया. राजराव ठाकरे (साहेब हा शब्द फारसी आहे, परकीय आहे, मराठी नाही, भारतीय नाही आणि राज ठाकरे हे मराठीसाठी आग्रही आहेत. म्हणून त्यांच्या सन्मानार्थ साहेब या शब्दाला अलगद उचलून बाजूला काढले आणि राव हा आदरार्थी शब्द वापरला आहे. मराठीच्या कैवाऱ्यांना हे माहीत नसावे म्हणून हे स्पष्टीकरण.) आणि मनसे निवडणूक आली की जोमात असतात. सध्या मनसेचं मराठीविषयीचं आंदोलन सुरू झालेलं आहे. अर्थात त्यांच्यापैकी बहुतेकांची मुलं इंग्रजी माध्यमात शिकत असणार व घरी मम्मी-डॅड्डीचं खुळही सुरू असणार. ते असो, ते चालायचंच! मी वर स्पष्ट केल्यानुसार महाराष्ट्रात मराठीला प्राधान्य दिलेच पाहिजे. मात्र नितेश राणे यांनी एक शंका व्यक्त केली आहे. त्यांचं असं म्हणणं आहे



की ही दादागिरी केवळ हिंदूंवरच होते. पण डोंगरी, भेंडीबाजार, कुर्ला, वांद्रे, मालवणी, मानखुर्द-गोवंडी, मुंब्रा येथे ही मंडळी मराठीचा आग्रह का धरत नाही? त्यांना मुसलमानांची भीती वाटते का? हिंदू व्यापारी फार फार तर सनदशीर व लोकशाही मार्गाने प्रतिकार करतील. पण वरील क्षेत्राचे रहिवासी खळखट्याक करणाऱ्यांवरच विपरीत-खळखट्याक करतील ही भीती त्यांना वाटते का? असा प्रश्न नितेश राणे यांनी उपस्थित केला आहे. यामध्ये तथ्य देखील आहे. कारण तिथे जाऊन मराठीचा आग्रह करण्याची धमक या शूरवीरांनी अजून तरी दाखवलेली नाही. दुसरी गोष्ट स्वतः राजराव यांनीही उत्तर भारतीयांविरोधात हाणामारीची भाषा केली असली तरी हुतात्मा चौकावर दंगल करणाऱ्यांविरुद्ध, मराठी माणसाला, पोलिसांना, महिलांना व महिला पोलिसांना मारहाण करणाऱ्यांविरुद्ध मोर्चा काढला. तेव्हा खळखट्याकची भाषा केली नाही. त्यामुळे नितेश राणे यांच्या बोलण्यात तथ्य असावे असा प्रश्न मराठी माणसाला पडू लागला आहे. दुसरी गोष्ट राज ठाकरे यांच्यावर टीका केली तरी हे लोक मराठी माणसालाच मारायला कमी करत नाही. तिथे हे लोक भव्य सूट देत नाहीत. म्हणजे मराठी माणसाने टीका केली (कोणावरही खालच्या दर्जाची, वैयक्तिक, त्यांच्या कुटुंबाला शिव्या देणारी टीका करूच नये, या मतांचा मी आहे. इथेही ''च''चा आग्रह आहे मंडळींनो. पण तुम्ही फडणवीस, मोदी अशांवर कितीही खालच्या दर्जाची टीका करू शकता, असा समज या लोकांनी करून घेतलेला आहे. असो, चालायचेच!) तर फक्त समजूत काढायची किंवा त्यांच्या घराबाहेर मोर्चा काढायचा, असं ते करत नाहीत. ते मराठीचं नाव घेतात आणि मराठी माणसालाच मारतात. मग यांना नेमके काय सिद्ध करायचे आहे? याविषयी आपण पुढे बोलू आता चर्चा करूया राजराव-उद्धवराव मनोमिलनावर.

राजराव आणि उद्धवराव एकत्र येण्याची चर्चा सगळीकडे सुरू झाली आहे. बॅनरही लागले आहेत. ''मोर्चात कोणताही झेंडा नसेल. फक्त मराठीचा अझेंडा असेल.'' आता ''अझेंडा'' काय असतं हे मराठीच्या कैवारींनी सांगावं. तर दोन भाऊ एकत्र येत आहेत. ही खरोखर आनंदाची बातमी आहे. मी तर म्हणतो जगाच्या सर्वच भावंडांमधील, भावकीमधील भांडणं मिटून सगळे एकत्र आले पाहिजेत. त्या दोघांनाही या कट्टर मराठी माणसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा. मात्र हे दोघं मराठीसाठी एकत्र येत आहेत, असा भ्रामक प्रचार होताना दिसतो. दोघं वेगळे झाले ते सत्तासंघर्षामुळे आणि आता एकत्र येण्याच्या योजना आखल्या जात आहेत ते सत्ता हस्तगत करण्यासाठी. अर्थात त्यांनी एकत्र यावं, प्रचार करावा, निवडणूक लढवावी याबाबत कोणाला काहीच देणं घेणं नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तर म्हणतात, ''त्यांनी जरूर एकत्र यावे. क्रिकेट - टेनिस खेळावे; जेवण करावे आमची काहीच हरकत नाही. ते दोघे एकत्र येणार असतील तर आनंदच आहे.'' तसा आम्हालाही आनंदच आहे. पण ते मराठीसाठी एकत्र येत आहेत असं नका ना बोलू. दोघांची मुले इंग्रजी माध्यमात शिकलेली आहेत. हे पाहा मराठी वाचकहो, मराठी माणसाला प्रगतिपथावर घेऊन जाणारा, दूरदृष्टी असलेला नेता हवा आहे.

आपण मराठी म्हणून विचार करायला हवा की छत्रपती शिवाजी महाराजांनी भारताला विश्वास दिला की या परकीय जिहादी आक्रमकांना आपण पळवून लावू शकतो. शिवराय अखंड हिंदुस्थानाचे छत्रपती झाले. पुढे मराठी माणसाने भारतावर राज्य केलं. पण नंतर मराठी माणसाची पकड हळूहळू कमी होऊ लागली. ती का झाली, याचं विश्लेषण आपण मराठी माणसाने केलं पाहिजे. त्यास काही घटक कारणीभूत आहेत. एकतर आपल्याकडे पुरोगामी हा शब्द वापरत प्रचंड जातीयवाद पसरवला गेला, इंग्रजीचं इतकं आक्रमण झालं की आताच्या मराठी मुलांना धड मराठी वाचताही येत नाही, तिसरं कारण मराठीच्या नावाने राजकारण करणाऱ्या नेत्यांनी आपल्या हातात धोंडा दिला. आपण त्वेषाने धोंडा फेकून मारत राहिलो, आपली परिस्थितीही धोंड्यासारखी झाली. पण ज्यांनी आपल्या हातात धोंडा दिला ते गर्भश्रीमंत झाले. हे कसे? हे कोडे ज्या दिवशी मराठी माणूस सोडवू शकेल त्या दिवशी मराठी माणूस जगावर राज्य करेल. तूर्तास धोंडा देणाऱ्यांना एवढंच सांगावसं वाटतं की 'तुमचा खेळ होतो, पण मराठी माणसाचा जीव जातो!'

writerjayeshmestry@gmail.com

---

## वेध

अनिल फेकरीकर

# नरखेडचा केजीचा प्रयोग स्वागतार्ह!

परिवर्तन हाच संसाराचा नियम आहे, असे भगवद्‌गीतेत भगवान श्रीकृष्णाने सांगितले होते. अगदी तसेच परिवर्तन आता शिक्षणात सुरू झाले आहे. महाराष्ट्र शासनाने पहिल्या वर्गापासून सीबीएसईचा अभ्यासक्रम लागू करण्याचे घोषित केले आहे. आता सीबीएसई म्हटले तर त्यानुसार नर्सरी, केजी १, केजी २ यांचाही अभ्यासक्रम पूर्ण करावा लागेल. तेव्हाच मुलांचा शैक्षणिक पाया मजबूत होईल अन् ते भविष्यातील स्पर्धेत टिकतील. अशा स्थितीत पारंपरिक बालवाड्या कुचकामी ठरतात. मग करायचे काय? चर्चा करायची, सरकारवर टीका करायची की यातून मार्ग काढायचा याचा विचार संबंधितांनी नक्कीच करायला हवा. अगदी अशीच वेळ नरखेड नगर परिषद प्रशासनासमोर उभी झाली होती. त्यांनी सकारात्मक विचार केला आणि त्यांच्या अखत्यारीतील ६ बालवाड्या बंद न करता त्यांचे रूपांतर केजी १, केजी २ मध्ये केले. याच केजीचा शुभारंभ बुधवार २ जुलै २०२५ रोजी होऊन नरखेड शहरात नवीन अध्याय सुरू झाला. नरखेड शहर म्हणताच डोळ्यासमोर येते ती प्रत्येक बाबतीत असलेली उदासीनता. पण यावेळी नरखेडने महाभारतातील अर्जुनरूपी मुख्याधिकारी अक्षय परदेशी यांच्या नेतृत्वात उदासीनतेचा चक्रव्यूह भेदला. परिणामी नरखेडला नवीन अध्याय सुरू झाला.

वर्तमान मुख्याधिकारी अक्षय परदेशी, सुनील शिंदे, रवींद्र पडवे, प्रशांत शेंडे यांच्या पुढाकारातून नरखेड नगर परिषद अंतर्गत असलेल्या ६ जुन्या बालवाड्यांना प्रथमतः रंगरंगोटी करण्यात आली. तिथेच केजी १, २ चे वर्ग सुरू करण्यात आले. आता त्यानुसार शिक्षकांचीही गरज भासणार होती. त्याकरिता अधिक आढेवेढे न घेता झटपट निर्णय घेत १० शिक्षिका आणि ५ मदतनीसांची पदे कंत्राटी स्वरूपात भरण्यात आली. नगर परिषदेच्या शाळेत आपल्याला शिकवायला मिळणार ही संधी पाहता सुशिक्षित युवतींच्या शिक्षिका बनण्यासाठी रांगा लागल्या. आज केजी १ मध्ये १०० आणि केजी २ मध्ये १५० विद्यार्थी आहेत. या सर्वांना गणवेश, पाठ्यपुस्तके, आकर्षक दप्तर, बुट नगर परिषदेने चक्क मोफत स्वरूपात पहिल्याच दिवशी उपलब्ध करून दिले. परिणामी पालक सुखावले व त्यांनी खाजगीकडे न जाता आपल्या मुला-मुलींना नगर परिषदेच्या केजीत टाकले.

तसे पाहता नरखेड शहरात इंग्रजी माध्यमातील शाळा सुरू व्हावी याकरिता पहिले पाऊल तत्कालीन मुख्याधिकारी माधुरी मडावी यांनी २०१८ मध्ये उचलले होते. मात्र चीननिर्मित कोरोनामुळे तो प्रयोग रखडला. पण अक्षय परदेशी मुख्याधिकारी म्हणून आल्यावर त्यांनी नवीन प्रयोग करण्याचे धाडस केले. याबद्दल त्यांचे आणि त्यांना साथ देणाऱ्या सर्वांचे मनापासून अभिनंदन केलेच पाहिजे. अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांचे काय, त्यांनी काम केले अथवा चालढकल करून टाईमपास केला तरी त्यांना पगार मिळणारच असतो. अशावेळी सकारात्मक विचार करून हटके संकल्पनेवर आधारित काम करणाऱ्यांचे कौतुक समाजाने करायला हवे. आज नरखेड येथील केजीचा प्रयोग छोटा वाटत असला तरी नागपूर जिल्ह्यासाठी हा गौरवपूर्ण प्रयोग आहे. विशेष म्हणजे केजीचा प्रयोग सुरू झाला तरी यात कुठेही मराठीवर अन्याय झालेला नाही. मराठी हा विषय येथे असल्याने मुलांवर त्याचा कुठलाही प्रतिकूल परिणाम होणार नाही. आनंद शोधू नका तर निर्माण करा, असा एक सुविचार आहे. अगदी तसेच काम मुख्याधिकारी अक्षय परदेशी यांनी केले. याकरिता त्यांना सहकार्य करणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांविषयी कृतज्ञता व्यक्त करायला हवी. कारण चांगले काम करणारे आता दुर्मिळ होत आहेत. अशा दुर्मिळ लोकांना जपणे समाजाचे कर्तव्य आहे. केजीचा प्रयोग काळानुरूप टाकलेले पाऊल म्हणायला हवे. आजचे शिक्षण हे जागतिक पातळीवर उभे राहायला शिकवणारे असावे. तेव्हाच आपण जगात कुठेही उभे राहू शकतो. आपण एकाच गोष्टीचे तुणतुणे लावले तर आपला टिकाव लागणार कुठे? याचाही विचार सुज्ञपणे व्हायला हवा. मराठी, हिंदी आणि इंग्रजी या काळानुरूप भाषा सर्वांना येणे आज अनिवार्य झाले आहे. याकरिता मनातील भेद बाजूला सारीत यावर अभ्यास व्हायला हवा. चिमुकल्यांचाही पाया मजबूत होईल असे अभ्यासक्रम शिकवायला हवेत. तेव्हाच येणारी पिढी सक्षम होईल अन् खऱ्या अर्थाने भारत एकविसाव्या शतकात जागतिक महासत्ता बनेल. सरकारी शाळा, सरकारी दवाखाने, सरकारी उपक्रम टिकलेच पाहिजेत. अन्यथा खाजगीवाले लोकांना गुलाम बनवतील, हे सदैव लक्षात ठेवा.

९८८१७१७८५९

---

## मुंबई वार्तापत्र

नागेश दाचेवार

# केम छो वरली...

उद्धव ठाकरे यांनी आपल्या लाडक्या युवराजाला वरळीतून निवडून आणण्यासाठी गुजराती मतदारांना ''केम छो वरली'' म्हणत साद घातली होती. यावेळी ''कम टू वरळी'' अशी हाक ठाकरेंनी मराठी माणसांना दिली आहे. २०१९ ला सत्तेच्या लोभापोटी भाजपाची साथ सोडली आणि काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेससोबत गेले. आता मुंबईत आपल्यासमोर काँग्रेस-राष्ट्रवादीची ताकद नाही याचा अंदाज येताच, काँग्रेसचा विरोध असूनही, महापालिकेतील सत्तेसाठी उद्धव ठाकरे हे राज ठाकरेंना टाळी द्यायला निघाले आहेत. कधी अमराठी मतदारांची मत मिळविण्यासाठी गुजराती, उर्दू, कन्नड, तेलुगू अशा आठ भाषांमधून आवाहन करायचं आणि काम झाल्यानंतर भाषाद्वेष पसरवायचा. हिंदुत्वाचा पुरस्कार करता करता जनाब होऊन मुस्लिम मतदारांचा अर्थात उर्दू, हिंदी भाषी लोकांचा लोकसभेत फायदा घेतला आणि आता मराठी मराठीचा गजर महापालिका निवडणुकीच्या तोंडावर सुरू झाला. उद्धव ठाकरेंच्या २० वर्षांच्या सक्रिय राजकारणातील त्यांच्या क्षणात बदलत्या भूमिका बघितल्यास सरडासुद्धा आत्महत्या करेल, यात शंका नाही.

पुण्याच्या बाजीराव पेशवा स्मारकाच्या उद्‌घाटनाच्या कार्यक्रमाप्रसंगी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जय हिंदी, जय महाराष्ट्र आणि जय गुजरात अशी घोषणा केली. यावरून शिंदेंवर आरोप केले जात आहे. केम छो शिंदे म्हणायचे का असा सवाल विचारला जात आहे. जे लोक शिंदेंना प्रश्न विचारत आहेत, त्यांनी पहिले वरळीतून मुलाला निवडून आणण्यासाठी गुजराती मतदारांसमोर लोटांगण घालून उद्धव ठाकरेंनी ''मुंबई मा जलेबी ने फाफडा, उद्धव ठाकरे आपडा...'' आणि ''केम छो वरली'' असं का म्हटलं होतं? असा प्रश्न उद्धव ठाकरेंना विचारायला हवा. ठाकरेंनी ''कसे आहात वरळीकर'' असे मराठीत संबोधले नाही. त्यांनीही यापूर्वी 'जय गुजरात' म्हटले आहे. त्यांना प्रश्न कोणी विचारणार नाही. पण जय हिंद, जय महाराष्ट्र म्हणत जर जय गुजरात म्हटलं तर मात्र, शिंदे महाराष्ट्रद्रोही ठरविले जातील. आता उद्योजक सुशील केडिया यांनी हिंदी भाषी एका छोट्या हॉकरला मारहाणीचा विरोध करत, मला मराठी शिकायची नाही, काय करायचं ते करा असे आव्हान राज ठाकरेंना दिले. याचा अर्थ आता त्यांना धमक्या देणार हे लोक. का, त्यांना त्यांच्या मातृभाषेचा अभिमान बाळगण्याचा अधिकार नाही? तो केवळ तुम्हालाच दिलाय का? यांची पोरं इंग्रजी माध्यमांच्या मोठ्या शाळांमध्ये शिकून, विदेशात फिरायला जातात. कारण यांच्या पोरांचा पोटापाण्याचा प्रश्न नाही. पण गोरगरीब मराठी माणसांच्या मुलांना यूपी, बिहार, झारखंड, छत्तीसगड, प. बंगाल, तामिळनाडू अशा देशाच्या इतर राज्यांत जाऊन पोटाची खळगी भरावी लागते. आणि मग हे भाषावादाचं लोण जर त्या राज्यात पसरलं आणि तेथील परप्रांतीय असलेल्या मराठी युवकांना, त्यांच्या कुटुंबांना त्या राज्यात मारहाण झाली तर याची जबाबदारी कोणाची असेल? परराज्यातील मराठी लोकांना तेथील भाषा बोलण्याचा आग्रह केला गेला तर काय करतील ते बिचारे... यांना महाराष्ट्राबाहेर कोणी कुत्रं विचारत नाही. सॉरी मुंबई बाहेर महाराष्ट्रात तरी कोण विचारतं? डबक्यात राजकारण करायचं असल्यानं गल्ली बोळापर्यंत हे विचार करतात. पण याचा विपरीत परिणाम महाराष्ट्राबाहेर गेलेल्या किंवा आता भविष्यात जाणाऱ्या मुलांवर होईल. याचे थोडेही भान या संधिसाधू लोकांना नसावे, यापेक्षा दुर्दैव नाही.

आता पुन्हा नवा हास्यास्पद प्रकार बघा. बीसीसीआयने सांगावं भारतीय संघ पाकड्यांसोबत खेळणार आहे की नाही. खेळला तर, या संस्थेला सरकार देशद्रोही ठरवणार आहे का? असा प्रश्न आजच्या तारखेत युवराज आदित्य ठाकरे यांनी उपस्थित केला. आता खेळात देशद्रोह कुठून येतो, हे कळण्यापलीकडे आहेत. पण आदित्य ज्याप्रमाणे बोलले त्याच न्यायानं जर घेतलं तर, जावेद मियादादला घरी दावत देणाऱ्यावर देशद्रोहाचा खटला दाखल झाला पाहिजे की नाही? यावर युवराज प्रतिक्रिया देतील का? नाही देणार ना. मग कशाला उगाच ''आपलं ठेवायचं झाकून, लोकांचं पाहायचं वाकून...'' चे धंदे करायचे. हेच ते लोक आहेत जे आज मराठीच्या मुद्यावरून इतर भाषिकांच्याविरोधात गरळ ओकत, द्वेष निर्माण करताना दिसत आहेत. तिसरी भाषा म्हणून भारतीय भाषा शिकता कामा नये, केवळ इंग्रजी शिकलं पाहिजे असा त्यांचा आग्रह आहे. मराठी अभिमान असायला पाहिजेच, यात वादच नाही. मुळात तो प्रत्येक मराठी माणसाला आहेच. पण मराठीचा अभिमान बाळगण्याचा अर्थ इतर भाषांचा द्वेष करणे असा होत नाही. हा प्रकार म्हणजे महाराष्ट्राचा तामिळनाडू करण्याचा प्रकार आहे. असा प्रकार करून महाराष्ट्राच्या भावी पिढ्यांचं नुकसान होईल. मग काय मराठी मुलांनी येथेच आयुष्यभर निव्वळ वडापावच विकत बसायचं की काय?

बरं २४ जुलै २०२४ ला मनसे नेते संदीप देशपांडे यांनी एका वृत्तवाहिनीला मुलाखत दिली होती. त्यात मराठी माणूस आणि महाराष्ट्राबद्दलचं प्रेम या फालतू लोकांकडून शिकण्याची गरज नाही. लोकांना संजय राऊतांची घाणेरडी, शिवराळ भाषा नको आहे. यांचे घाणेरडे चेहरे देखील बघायला नको आहे, अशा शब्दांत संजय राऊत आणि उद्धव ठाकरेंची अब्रू काढली होती. मुंबई महानगर पालिकेत २५ वर्षे सत्तेत राहून काय केलं यांनी? किती मराठी लोकांना कामं दिली यांनी?, किती मराठी माणसांची घरं वाचविली?, अख्खं गिरगाव रिकामं करून मराठी माणसाला मुंबई बाहेर दूरवर पाठवलं. २०१९ ला भाजपाच्या मांडीवर बसून निवडणूक लढविली आणि मग पंधरा दिवसांत अचानक भाजपा महाराष्ट्रद्वेषी असल्याचा साक्षात्कार झाला का? मग लगेच जाऊन पवारांच्या मांडीवर जाऊन बसलात. हे जे उबाठाचं राजकारण आहे ना ते संधिसाधूपणाचं आहे. यांना केवळ सत्ता पाहिजे. असा आरोप अवघ्या वर्षभराआधी केला होता. वर्षभर कशाला, आत्ता आत्ता महिनाभरापूर्वी देखील हे एकमेकांची कपडे फाडताना दिसत होते. मात्र, आता अचानक लाचारी पत्करून दोघेही वरळी डोम येथे एकत्र सभा घेत आहेत. आणि सभादेखील कोणती तर विजयी सभा. कसला विजय. परिपत्रक तात्पुरतं रद्द करून नवं काढलं जाणार आहे. यासंदर्भातला निर्णय घेण्यासाठी समिती नेमली आहे. याचा अर्थ याविषयाबाबतचा अद्याप कुठलाही निर्णय झालेला नाही. मग जेव्हा निर्णयच झालेला नसेल तर, विजय कसा आणि कोणाचा झाला? मग कुठली आली विजयी सभा? पण हिंदी सक्ती नसताना सक्ती असल्याची टिमकी वाजवायची, मग विचाराधीन विषयावर विजयी झाल्याचं तुणतुणं देखील आपणच वाजवायचं, असा हास्यास्पद प्रकार चालला आहे. असो आता ''केम छो वरली''वाल्यांना ज्या भाषेत कळते त्याच भाषेत ''भगवान ए बधाने सद्‌बुद्धी आपे...!''

९२७०३३३८८६

---

### परंपरा पुनरुज्जीवित करण्याची वेळ

गुरू-शिष्य परंपरा हाच महान हिंदू संस्कृतीचा पाया आहे. भारतावर आक्रमण करणाऱ्या प्रत्येक आक्रमणकर्त्याने याच पायावर घाला घातला आणि भारताची आजची स्थिती आपल्या समक्ष आहे. इंग्रजांनी स्वार्थापोटी भारताच्या संस्कृतीवर आक्रमण करून तिला नष्ट-भ्रष्ट करण्याचा प्रयत्न केला. या दुष्कृत्याचे परिणाम आपण स्वातंत्र्यानंतरही कित्येक दशके भोगत आहोत.

आज भारतात पाश्चात्त्यांचे अंधानुकरण, बीभत्सपणा आणि संस्कृतिहीन आचरण आदींचे काहूर माजले आहे. राजसत्तेवर धर्मसत्तेचा अंकुश नसल्याने स्वैराचारी आणि दुराचारी राजाला शिक्षा देण्याची व्यवस्था नाही. त्यामुळे आज गुरू-शिष्य परंपरेला पुनरुज्जीवित करण्याची वेळ आली आहे. समाजामध्ये काही प्रमाणात राष्ट्राविषयी अभिमान असला, तरी धर्मप्रेम असणेही तितकेच आवश्यक आहे. गुरू-शिष्य परंपरा पुनरुज्जीवित करण्यासाठी भारत पुनश्च हिंदू राष्ट्र बनणे आवश्यक आहे.

**अपर्णा जगताप**/नागपूर

### पावसाळ्यात स्वच्छतेचे नियोजन आवश्यक

पावसाळा हा ऋतू निसर्गाची अनेक रूपे घेऊन येतो. मात्र त्याचबरोबर अनेक प्रकारचे संसर्गजन्य आजारही बळावण्याचा धोका वाढतो.

ग्रामीण भागांमध्ये, जिथे पायाभूत सुविधा अद्याप अपुऱ्या आहेत, तिथे स्वच्छतेकडे केले जाणारे दुर्लक्ष आरोग्याच्या मोठ्या संकटाचे कारण ठरू शकते.

त्यामुळे पावसाळ्यात स्वच्छतेसाठी योग्य नियोजन करणे ही गावपातळीवरची अत्यंत गरजेची बाब आहे. स्वच्छतेचे महत्त्व आणि नियोजनाची गरज पावसात रस्त्यावर पाणी साचणे, नाल्यांचा वेळेवर उपसा न होणे, कचऱ्याचे व्यवस्थापन न करणे, सार्वजनिक ठिकाणी चिखल व घाण होणे अशा समस्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण करतात. डेंग्यू, मलेरिया, टायफॉईड, पोटाचे विकार, पाण्याने होणारे आजार आणि त्वचेचे विकार हे पावसाळ्यात वाढतात. यासाठी ग्रामीण, शहरी भागात पावसाळ्यातील स्वच्छतेकडे प्रशासनाने आवर्जून लक्ष दिले पाहिजे.

**मुनीश्वर मलेवार**/९४०५५१३३२४

## वाचक पत्रे

### आला पावसाळा, तब्येती सांभाळा!

उन्हाळ्यानंतर येणारा पाऊस हा सुखावून जातो. हवेतला गारवा पण छान वाटतो. पण पावसाचे प्रमाण जस जसे वाढत जाते तसे नद्या, नाले, ओढे तुडुंब वाहतात. त्यांचे घाण पाणी, मलमूत्र व गटारीचा दुर्गंध वातावरणात मिसळले जाण्याची शक्यता जास्त असते. त्यात राहण्याची जागा, परिसर कोंदट, अस्वच्छ असेल तर वायू दूषित होऊन श्वसन मार्गाने शरीरात प्रविष्ट होऊन सर्दी, खोकला, डोकेदुखी, मळमळणे, ताप इत्यादी तक्रारींचा प्रकोप होतो. हे टाळण्यासाठी वायू शुद्ध होणे महत्त्वाचे असते. त्यासाठी कापूर, देवदार, धूप, चंदन, राळ, कडूनिंबाची पाने, मोहरी इत्यादी वनस्पतींचा धूर केल्यास वायूतील जंतूंचा नाश होऊन तो शुद्ध होईल.

काही जुन्या घरांमध्ये पावसाळ्यात प्रचंड ओलावा होत असतो आणि हा प्रकृतीस बाधक ठरतो. तसेच सोसाट्याचा वारा अंगावर जास्त घेतला तर अवयव जखडून जातात. वातविकार वाढतात. अशा अवस्थेत आहारामध्ये भोजन कोरडे, हलके, स्निग्ध, उष्ण आणि आम्ल असावे. दिवसा झोपणे टाळावे, द्रव पदार्थांचे अति सेवन करू नये. भोजनामध्ये वेली वरच्या भाज्यांचा म्हणजे चवळ, गिलके, गवार, तोंडली, परवर, कारले, लाल भोपळा, दुधी भोपळा जास्त प्रमाणात असावे. कांदा, बटाटा, मुळे, गाजर, बीट या मूळवर्गीय भाज्यांचा प्रयोग एकदम कमी करावा. तसेच गुणाने गुरू म्हणजे पचायला जड जसे, बेसन, मैदा, कडधान्य, आंबवलेले पदार्थ यांचा आहारामध्ये समावेश कमी करावा. या दिवसात अपचन होण्याची शक्यता जास्त असते. ते झाल्यास आम्ल पित्त, डोकेदुखी, मळमळायला होणे, खोकला, ताप, अंग मोडून येणे इत्यादी लक्षणे आढळतात. हे होऊ नये म्हणून आहार-विहार यावर नियंत्रण ठेवल्याने पावसाळ्यात देखील तब्येत चांगली राहू शकते.

**संजय पाठक**/नागपूर

### नागपूर रेल्वे स्थानकावर नगदी व्यवहार बंद!

दिनांक २३ जून रोजी रात्री सवा बारा वाजता मी नागपूर रेल्वे स्थानकात आमच्या स्नेहींना घ्यायला गेलो असता नगदीद्वारे प्लॅटफॉर्म तिकीट घेतले. परंतु २८ जून रोजी सकाळी ७.५० वाजता पुन्हा रेल्वे स्थानकावर गेलो असता मुख्य प्रवेशद्वाराच्या आत जी तिकीट खिडकी आहे तिथे प्लॅटफॉर्म तिकीट घ्यायला गेलो तेव्हा तेथील महिला कर्मचाऱ्याने मला नगदी पैशांचे व्यवहार बंद केले असून ऑनलाईन व्यवहाराद्वारेच तिकीट विक्री सुरू आहे असे सांगितले व मला नगदीद्वारे प्लॅटफॉर्म तिकीट देण्यास नकार दिला. हे कितपत योग्य आहे?

सगळेच लोक ऑनलाईन व्यवहार करत नाहीत. मध्य रेल्वे नागपूर येथील संबंधित अधिकाऱ्यांना विनंती आहे की त्यांनी दखल घेऊन या खिडकीवर नगदी व्यवहार लवकरात लवकर सुरू करावा व विशेषतः ज्येष्ठ नागरिकांना दिलासा द्यावा.

**मिलिंद गोखले**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## संक्षिप्त वृत्त...

### मॉडीफाइड सायलंन्सर बुलेटवर कारवाई

**१० बुलेट गाडया ताब्यात घेऊन सायलेन्सर केले जप्त**

**परभणी,/प्रतिनिधी :** शहरातील मॉडीफाइड सायलंन्सर, बनावर मॉडीफाइड सायलंन्सर वापरून स्टंटबाजी करणाऱ्या बुलेट गाड्यांविरुध्द वाहतुक पोलिसांनी गुरूवारी (दि.०३) कारवाई करून सायलंन्सर जप्त करत दंडात्मक कारवाई केली.

शहरातील कर्नकर्कश आवाज करणाऱ्या बुलेट गाड्यांवर शहर वाहतुक शाखेतर्फे कारवाई करण्यात येत असून शहरातील वसमत रस्ता, दर्गा रोड, महात्मा फुले पुतळा परिसर या ठिकाणी सर्व प्रकारच्या बुलेट गाडया तपासणी करून मॉडीफाइड केलेले सायलंन्सर लावण्यात आलेल्या १० बुलेट गाडया ताब्यात घेऊन त्यांचे सायलंन्सर काढून घेण्यात आले आहे.

शहर वाहतुक शाखेतर्फे सर्व नागरीकांनी बुलेट गाडयांवरील मॉडीफाइड सायलंन्सर काढण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### अवैध रेती वाहतुकीच्या वाहनासह चालकावर कारवाई

**परभणी,/प्रतिनिधी :** ताडकळस पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आलापूर पांढरी येथे अवैध रेतीची राजरोसपणे वाहतूक करणाऱ्या वाहनांची गुप्त माहिती ताडकळस पोलीसांना लागताच गुरूवारी (दि.०३) जायमोक्यावर जाऊन अवैध रेती वाहतूक करणाऱ्या वाहनासह चालकाविरुध्द कारवाई करण्यात आली.

बोलोरो पिकअप क्रमांक.एमएच २२ एन १३४५ अल्लापुर पांढरी गावातील सिमेंट पांदन रस्त्यावरअवैध वाळू वाहतूक करीत असताना मिळाला. पांढऱ्या रंगाची बोलोरो पिकअप क्र. एमएच २२ एन १३४५ ज्याची अंदाजी किंमत ३ लाख व एक ब्रास रेती (वाळु) असा एकुण ३ लाख १० हजार रुपयेचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. बेलोरो पिकअप क्रमांक एमएच २२ एन १३४५ च्या चालक यांने त्याचे ताब्यातील बोलोरो पिकअप मध्ये विनापरवाना व अवैध रेती वाहतूक केल्या प्रकरणी रामकिशन काळे यांच्या फिर्यादीवरून ताडकळस पोलिसात चालकासह बोलोरो पिकअप वाहनावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ताडकळसचे ठाणेदार गजानन मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस जमादार संतोष चाटे हे पुढील तपास करीत आहेत.

### अक्षदा मंगल कार्यालयासमोरील उड्डाण पूल वाहतुकीसाठी सुरू करा

**भारतीय जनता युवा मोर्चाची मागणी : जिल्हा प्रशासनास निवेदन**

**परभणी,/प्रतिनिधी :** अक्षदा मंगल कार्यालया समोरील वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठमध्ये जाणारा उड्डाण पूल वाहतुकीसाठी सुरू करावा, अशी मागणी भारतीय जनता युवा मोर्चाने जिल्हा प्रशासनास सादर केलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अक्षय डहाळे, विधानसभा विस्तारक रामदास पवार, युवा मोर्चा सरचिटणीस, अभिषेक वाकोडकर, अनिल रेंगे, नगरसेवक रितेश जैन, ओम मुदीराज, स्वप्नील कीटे, अक्षय जुकटे, विनोद भालेराव, अनंता गिरी, गणेश भांगे आदींच्या शिष्टमंडळाने गुरुवार ३ जूलै रोजी जिल्हा प्रशासनास एक निवेदन सादर केले. त्याद्वारे, अक्षदा मंगल कार्यालया समोरील वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठमध्ये जाणारा उड्डाण पूल हा तात्पुरती बॅरिकेटिंग लावून बंद करण्यात आला आहे. त्यामुळे विद्यापीठामधील विद्यार्थी आणि विद्यार्थिनींना महाविद्यालयामध्ये जाण्याकरीता वेगळा मार्ग जो ४-५ किमी दूरचा आहे, तो मार्ग वापरावा लागत आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष नेमकेच चालू झाले आहे, त्यामुळे विद्यार्थ्यांची ही गैरसोय टाळण्यासाठी, ही बॅरिकेटिंग काढून रस्ता वाहतुकीसाठी खुला करावा, अशी मागणी या शिष्टमंडळाने केली आहे.

### जिल्हा शिक्षण संवर्धन मंडळाद्वारे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**परभणी,/प्रतिनिधी :** जिल्हा शिक्षण संवर्धन मंडळाच्या वतीने आज गुरुवार ३ जूलै रोजी शहरातील श्री मंगल कार्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा व सेवानिवृत मुख्याध्यापकांचा सेवा गौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा शिक्षण संवर्धन मंडळाचे अध्यक्ष गणेश शिंदे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षणाधिकारी (योजना) तेजराव काळे, दत्तात्रय राऊत, मनोज भातलवंडे, देवीदास उमाटे, बालासाहेब भांगे आदींची उपस्थिती होती. या सत्कार सोहळ्यात परभणी जिल्ह्यातील सेलू, मानवत, पाथरी, जिंतूर, पालम, पूर्णा, गंगाखेड, परभणी येथील शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच जिल्ह्यातील खेळाडूंचाही सत्कार करण्यात आला.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी जिल्हा शिक्षण संवर्धन मंडळाचे शिवाजी पाचकोर, दुर्गा देशमुख, जया जाधव, सदाशिव मुंढे, देवानंद आंभुरे, दिगंबर मोरे, लिंबाजी पौळ, शेख सगिर, राजकुमार धबडे व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

### जिल्ह्यात लाडकी बहिण योजनेतंर्गत लाभार्थी महिलांची नागरी सहकारी पतसंस्था स्थापन होणार

**परभणी,/प्रतिनिधी :** महिला सक्षमीकरणासाठी शासनातर्फे राबविण्यात येणाऱ्या लाडकी बहिण योजनेतंर्गत लाभार्थी महिलांची नागरी सहकारी पतसंस्था स्थापन करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाच्या वतीने देण्यात आली.

लाडकी बहिण योजने अंतर्गत लाभार्थी महिलांची पतसंस्था स्थापन करण्यासंबंधि जिल्हास्तरावर उपनिबंधक कार्यालयाकडून मायक्रो प्लॅन तयार करून तालुका स्तरावर सहाय्यक निबंधकांना महिलांसाठी सहकारी पतसंस्था स्थापन करण्याकरिता सूचना देण्यात आल्या आहेत. पतसंस्थेच्या माध्यमातून लाडक्या बहिणींना छोटा-मोठा उद्योग सुरू करता यावा या दृष्टीकोनातुन नावीन्यपूर्ण व महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे.

सोलापूर तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५. ९२८४६६४४३०. ९२८४६९५५८३

# सोनपेठ पशुवैद्यकीय विभागाचा कारभार रामभरोसे

## तालुका पशुवैद्यकीय अधिकारी पद रिक्त तर काही दवाखाने विना डॉक्टर

## डिघोळ येतील पशुवैद्यकीय दवाखान्यावर तळीरामांच कब्जा

**बाबासाहेब गर्जे**

**सोनपेठ,/प्रतिनिधी-** सोनपेठ- पशु प्राण्यांच्या आरोग्य सेवेत असलेले आणि पशुसंवर्धन विभागाअंतर्गत चालवले जाणारे सोनपेठ तालुक्यातील बहुतांश पशुवैद्यकीय दवाखाने सध्या वाऱ्यावर असून डॉक्टर नसल्यामुळे पशु पालकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. तसेच तालुका पशुवैद्यकीय अधिकारी यांची बदली झाल्याने महिनाभरापासून या कार्यालयालाही कुलूप आहे. त्यामुळे सोनपेठ तालुक्यातील पशुवैद्यकीय डॉक्टरांचे पदे रिक्त असल्यामुळे अखेर या दवाखान्यांना वाली कोण? असा सवाल पशुपालक वर्गातून उपस्थित केला जात आहे.

शेतकऱ्यांसह तालुक्यातील पशुपालकांकडील गाय, म्हैस,बैल,शेळी, मेंढी, कुत्रे, कोंबडी, घोडा,गाढव आदी पशू पक्ष्यांच्या आरोग्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागाअंतर्गत पशुवैद्यकीय दवाखाने कार्यरत आहेत. या सर्व दवाखान्यांवर देखरेख ठेवण्यासाठी एक तालुका पशुवैद्यकीय अधिकारी आहे.परंतू गेली महिनाभरापासून तालुका पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. गोविंद राठोड यांची बदली झाल्यापासून हे कार्यालय रिकामेच राहिले आहे. तसेच तालुक्यातील डिघोळ, सोनपेठ यासह अनेक ठिकाणी डॉक्टरांची बदली झाल्यामुळे ही पदं रिक्त आहेत तर काही ठिकाणी ईतर डॉक्टरकडे दुसऱ्या ठिकाणचा पदभार सोपवला आहे. त्यामुळे अतिरिक्त पदभार घेतलेल्या ठिकाणी डॉक्टर फिरकत नसल्यामुळे पशुपालकांची अडचण निर्माण झाली आहे.यांच्यावर नियंत्रण ठेवणारे तालुका पशुवैद्यकीय अधिकारीच नसल्यामुळे सध्या सोनपेठ तालुक्यातील पशुवैद्यकीय दवाखान्याचा कारभार राम भरोसे बनला आहे.

डिघोळ येथील दवाखान्याचे अपुर्ण बांधकाम गेली दहा वर्षांपूर्वी तालुक्यातील डिघोळ ई येथे पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ च्या इमारतीचे बांधकाम करण्यात आले. परंतु तत्कालीन गुत्तेदाराने संबंधित अभियंता हाताशी धरून अपूर्ण बांधकाम करुन सर्व बिल उचलून घेतल्याचे सांगण्यात येते. सदरील दवाखान्याच्या समोर सुरक्षा गेट बसवलेले नाही व आतील अनेक खोल्यांना दारे खिडक्या, फरशी बसवलेली नाही. त्यामुळे रात्रीच्या वेळी दारु पिणारे लोकं आत घुसून धुडगूस घालत आहेत.

दवाखान्याला डॉक्टर नाही संबंधित दवाखान्यातील डॉ.गोविंद राठोड यांची बदली झाल्याने डिघोळ येथील दवाखान्यात डॉक्टर चे पद रिक्त आहे. दवाखान्यात आजही डॉक्टर नसल्यामुळे कंपाउंडर येऊन दिवसभर दवाखाना उघडून बसतात व संध्याकाळी दवाखाना बंद करून परत जातात. या ठिकाणी डॉक्टरांसाठी निवासस्थाने बांधलेली आहेत परंतु निवासी कोणीच थांबत नसल्यामुळे दारू पिणाऱ्या लोकांना याचा वाव मिळतो.

दवाखान्याच्या मुख्य प्रवेशद्वारावर गेट बसवले नसल्यामुळे मोकळ्या जागेतून नागरीक आत प्रवेश करतात. रात्री बारा वाजेपर्यंत अनेक जण येथे दारू पिऊन लोळत असतात तर कोणी किंचाळत असतात. अशावेळी दारूच्या नशेत येऊन वाटेल तिकडे दगड भिरकावतात. त्यातून दवाखान्याच्या खिडक्यांची व काचांची मोठ्या प्रमाणात नासधूस केलेली दिसून येत आहे. याबाबतीत किमान जिल्हाधिकारी तरी लक्ष घालतील का? असा सवाल आता परिसरातील नागरिकांतून उपस्थित केला जात आहे.

### तळिरामांनी केली नासधूस

**संध्याकाळच्या वेळेस परिसरातील अनेक तळीराम या ठिकाणी दारूच्या बाटल्या व पाण्याचे ग्लास घेऊन बसत असतात. दारूच्या नशेत तराट झालेल्या अनेक तळीरामांनी दवाखान्याची तावदाने, खिडक्या, काचा फोडून टाकलेल्या आहेत. दवाखान्याच्या आत मध्ये दारूच्या बाटल्या पाण्याच्या बॉटल व काचाच्या गिलासांचा खच पडलेला आहे.तर काही ठिकाणी चक्क संडास करुन घाण केली आहे आशा प्रकारचे कृत्य आजही बिनदिक्कतपणे सुरू आहे.अखेर असे दुष्कृत्य करणाऱ्यांवर वचक तरी कोण ठेवणार? हा एक संशोधनाचा विषय बनलेला आहे.**





येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात डॉक्टरांसाठी निवासस्थाने बांधलेली आहेत परंतू येथे डॉक्टर मुक्कामी राहत नाहीत. त्यामुळे रात्रीच्या वेळी आंधाराचा फायदा घेत दारु पिणारे लोकं आत जावून बसतात.यासाठी नवीन डॉक्टर ची नियुक्ती करण्यात यावी व शिपाई सह सर्वांना निवासस्थानी रहाण्यासाठी सक्ती करावी.वित्त आयोगातून मुख्य प्रवेशद्वारावर गेट बसवण्याची तरतूद केली आहे.लवकरच समोरून गेट बसवून कुलूप लावले जाईल. ज्यामुळे आतमध्ये कोणालाही प्रवेश करता येणार नाही. तसेच प्रवेशद्वारावर सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात येतील.

**-अजयकुमार देशमुख, उपसरपंच डिघोळ ई.**



**परभणी- १ जुलै महाराष्ट्र राज्याचे भूतपूर्व मुख्यमंत्री महानायक वसंतरावजी नाईक साहेब यांच्या जयंतीनिमित्त आणि राज्य मंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघनादीदी बोर्डीकर यांच्या संकल्पनेतून जिल्हा परिषद शाळा जांब बु ,जांब तांडा ,आणि भागूनाईक तांडा येथे इंद्रजित भैया घाटुळ मित्र मंडळाच्या वतीने व सचिन आढे यांच्या वतीने शालेय साहित्य वाटप करण्यात आले व वृक्षारोपण करण्यात आले त्यावेळी संजीवनी अर्बन बँकेचे संचालक किरण चव्हाण सर, उपाध्यक्ष अमर्जीत राठोड सर गावचे सरपंच योगेशभाऊ बुधवंत, मुख्याध्यापक सानप सर ,सचिन आढे ,राजेश चव्हाण सर, शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष शिवशंकर आघाव ,विजय आढे, मंगेश बुधवंत ,दराडे मामा, दिगंबर बुधवंत, सुरेश भाऊ, लखन आढे , निलेश राठोड आणि कर्मचारी दिसत आहेत.**

### शैक्षणिक प्रमाणपत्रासह प्राविण्य प्राप्त करा- डॉ.राजेश मंत्री यांचे प्रतिपादन

**सेलू,/प्रतिनिधी :** अभ्यास, परिश्रमातून गुणवत्तापूर्ण शैक्षणिक प्रमाणपत्र तर मिळवाच, परंतु त्यासोबतच जीवन सर्वार्थाने सक्षम करण्यासाठी प्राविण्य प्राप्त करावे, तसेच पुस्तक वाचनातून व्यक्तीमत्व विकास करावा, असे आवाहन नूतन विद्यालय शिक्षण संस्थेचे माजी विद्यार्थी तथा नेत्रतज्ज्ञ डॉ. राजेश मंत्री यांनी केले.

येथील नूतन विद्यालय शिक्षण संस्थेचा ८६ वा वर्धापनदिन व श्रीरामजी भांगडिया स्मृतिदिनानिमित्त गुरूवारी (दि. ०३) नूतन विद्यालयाच्या कै. रा. ब. गिल्डा सभागृहात संस्थेतील प्राथमिक, माध्यमिक, उच्चमाध्यमिक, पदवी, विविध शिष्यवृत्ती परीक्षेत प्रथम क्रमांक पटकाविलेले गुणवंत विद्यार्थी, खेळाडूंचा सत्कार उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमात संस्थेतील गुणवंत विद्यार्थ्यांसह पुरस्कार, पी.एचडी पदवी प्राप्त प्राध्यापक, शिक्षकांचा सत्कारही करण्यात आला. याप्रसंगी ते बोलत होते.

समारंभाच्या अध्यक्षस्थानी नूतन विद्यालय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. एस. एम. लोया होते. तर निवृत्त वनाधिकारी टी. के. कुलकर्णी ( सेलू ) यांची विशेष उपस्थिती होती.व्यासपीठावर संस्थेचे उपाध्यक्ष डी. के. देशपांडे, सचिव प्राचार्य डॉ. विनायकराव कोठेकर, सहसचिव जयप्रकाश बिहाणी, कार्यकारिणी सदस्य सिताराम मंत्री, प्राचार्य डॉ. उत्तम राठोड, प्रभारी मुख्याध्यापक रोहिदास मोगल, मुख्याध्यापिका निशा पाटील, सुखानंद बेंडसुरे यांची उपस्थिती होती. गुणवंत विद्यार्थी स्वराजचे पालक लक्ष्मण जाधव, विद्यार्थीनी स्वरा लाटकर यांनी या प्रसंगी मनोगत व्यक्त केले. आपल्या मनोगतात टि. के. कुलकर्णी यांनी, विद्यार्थ्यांनी एक चांगला माणूस व्हावे. माणूसकीने वागावे. प्रगतीपुस्तकावरील गुणांबरोबर सद्गुण संपादन करावेत, असे म्हटले. प्रास्ताविक संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ. विनायकराव कोठेकर यांनी केले. संस्थेचा वार्षिक अहवाल सहसचिव जयप्रकाश बिहाणी यांनी सादर केला. पाहुण्यांचा परिचय कार्यकारिणी सदस्य प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी यांनी दिला.

## सेलूतील उपजिल्हा रूग्णालयात रूग्णांची हेळसांड आरोग्य राज्यमंत्र्यांच्या मतदार संघातील स्थिती

**शिवाजी आकात**

**सेलू,/प्रतिनिधी-** शहरतील उपजिल्हा रूग्णालयात रूग्णांची उपचाराअभावी हेळसांड होत असल्याचा प्रकार समोर येत असून प्रस्तूतीसाठी आलेल्या रूग्णावर उपचार नाकारल्याचा प्रकार घडल्याने रूग्णाच्या नातेवाईकांनी डाँक्टरवर कारवाही करण्याची मागणी केली आहे.

शहरातील उपजिल्हा रूग्णालयात सूरय्या आरबाज खान यांना प्रस्तूतीसाठी सकाळी ८ वाजता दाखल करण्यात आले.दरम्यान कर्तव्यावरील असलेल्या डाँक्टरांनी तपासणी न करता प्रस्तूतीची पहिली वेळ आहे.प्रस्तूतीसाठी वेळ लागेल असे म्हटले मात्र परत तीन चार तासांनी डाँक्टरांनी रूग्णास तपासणी करण्याची नातेवाईकांनी केली असता अजून वेळ लागेल असेच डाँक्टरांनी नातेवाईकांना सांगीतले.तर कर्तव्यावरील असलेल्या डाँक्टर यांनी गाडीची वेळ झाली असल्याने उपजिल्हा रूग्णालयातून सुटटी करून निघून गेले.तर रात्री ८ वाजेच्या सूमारास रूग्णास अती त्रास होवून रूग्ण अत्यवस्थ झाला असल्याने रात्रीच्या वेळी कर्तव्यावर असलेल्या डाँक्टरांनी रूग्णा दूस-या रूग्णालयात हालविण्यास नातेवाईकांना सांगीतले.बारा तासाचा कालावधी उलटून गेला तरी उपजिल्हा रूग्णालयातील कर्तव्यावर असणा-या डाँक्टरांनी रूग्णास न तपासता केवळ रूग्णास उपचार दिले नाहीत. सदरिल रूग्णास खाजगी रूग्णालयात नातेवाईक घेवू गेले असता रूग्णावर सिझेरियन शस्त्रक्रिया करून रूग्ण व बाळाचे प्राण वाचविले.

दरम्यान बारा तास उपजिल्हा रूग्णालयात रूग्णांची केवळ हेळसांड करण्यात आली असल्याने सदरिल रूग्णालय प्रशासन व संबधीत डाँक्टर यांच्यावर योग्य कारवाही करण्याची मागणी रूग्णाचे नातेवाईक शेख अय्यूब यांनी पोलीस प्रशासनाकडे केली आहे.



### रूग्णाच्या जिवाशी खेळ

**उपजिल्हा रूग्णालयात मागील अनेक दिवसापासून रूग्णांना परभणी येथे उपचारासाठी पाठविण्यात येते आहे.मतदार संघाच्या आमदार तथा पालकममंत्री मेघना साकोरे बोर्डीकर या सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री आहेत.यांच्या मतदार संघात महिला रूग्णास वेळेवर उपचार मिळत नाहीत ही गंभीरबाब असून उपचारास विलंब करणा-या वैद्यकिय अधिकारी,वैद्यकिय अधिक्षक यांच्यावर योग्य कारवाही होणे गरजेचे आहे.सदरिल अधिकारी,कर्मचारी यांच्या निष्काळजीपणामूळे रूग्णास जिव गमवावा लागला असता तरी सूद्धा या उपजिल्हा रूग्णालय प्रशासनास रूग्णाच्या उपचाराचे काहि एक देणे घेणे नसल्याचा प्रकार दिसत आहे.सदरिल निष्काळजी करणा-यावर कारवाही करण्यात यावी.**

**- शेख रहिम**
**माजी नगरसेवक**

### सेलू शहरातील मोकळया जागांचा श्वास गुदमरला

**सेलू,/प्रतिनिधी:** शहरातील अनेक भागातील पालिकेच्या मोकळ्या जागा पालिका प्रशासनाने विक्री करून शहरात गर्दी केली असल्याने पालिकेच्या आरक्षीत मोकळ्या जागांचा श्वास गूदमरला असेच म्हणावे लागेल.

शहरात ९६ आरक्षीत मोकळ्या जागा असल्याची नोंद आहे. शहरात अनेक वसाहती आहेत त्या ठिकाणच्या नागरीकांना मैदान,उद्यान,मंदिरे सह इतरही उपयोगासाठी वसाहत निर्माण करतांना पालिकेकडून आरक्षीत मोकळ्या जागा ठेवल्या जातात.मात्र शहरातील सदरिल मोकळ्या जागा तात्कालीन मूख्याधिकारी व माजी नगराध्यक्ष यांनी संगनमत करून विक्री केल्याचा प्रकार समोर येत आहे.शहरातील अनेक वसाहतीमध्ये मूलांना खेळण्यासाठी मैदान नाहीत तर उद्यानांसाठी आरक्षीत असलेल्या जागा दलालांच्या घशात पालिका प्रशासनाने घातल्याने शहरातील वसाहतीमध्ये मोकळ्या जागा उपलब्ध नाहीत.शहरातील मोकळ्या जागा पालिकेने बोगस पद्धतीने नावे केल्याचा प्रकार समोर येत असून मोकळ्या जागा कसासाठी असतात हाच प्रश्न या निमित्ताते समोर येत असून शहरात सर्वे नंबर २२७ मध्ये सर्वाधीक मोकळी जागा आरक्षीत असून सदरिल जागा १९हजार २६४ चौ.मी.एवढी आहे.तसेच सर्वे. नं.२२९,२५३,२५४ मध्ये १६हजार १२७ चौ.मी,सर्वे नं.२४२ मध्ये ९हजार २५ चौ.मी.,सर्वे नं.१०/२ मध्ये ६हजार २५३,सर्वे.नं.१०/१ ५हजार १६९,सर्वे नं.२३० मध्ये ८हजार २५०,सर्वे नं.२४९/१ ३ हजार ७८२ असे एकूण ९७ मोकळ्या जागा पालिकेने आरक्षीत केल्या असल्याची नोंद पालिकेकडे असली तरी मात्र प्रत्यक्षात केवळ दहा जागाच मोकळ्या असतील हे वास्तव चित्र आहे.सदरिल आरक्षित असलेल्या मोकळ्या जागेवर बांधकामे करण्यात आली आहेत.मग पालिकेकडे मोकळ्या जागांची नोंद कशी हा प्रश्न नागरीकांना पडला आहे. मोकळ्या जागेच्या बाबत तक्रारी प्राप्त होत आहेत.

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## गांधीनगर भागातील सुविधांची बकाल अवस्था; आरोग्य धोक्यात

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.५ जुलै -**

शहरातील गांधी नगर भागातील स्वच्छतेसाठी लक्ष द्यायला न.प. प्रशासनाला वेळ नाही, त्या मुळे या नगराची बकाल अवस्था झाली असून, तात्काळ स्वच्छता न केल्यास आंदोलन करण्याचा इशारा,युवा सेना व या भागातील रहिवासी यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, या भागाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे, नाल्यांची साफसफाई न केल्याने, साथीचे रोग पसरले आहेत. पावसाळा सुरू होण्या पूर्वी साफसफाई होणे आवश्यक असून, फवारणी करण्यात यावी, या भागात अंधाराचे साम्राज्य असून, विद्युत दिवे तत्काळ बसवण्यात यावेत, नाल्या तुडुंब भरल्याने सगळीकडे दुर्गंधी पसरली आहे, यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.



तत्काळ या भागातील स्वच्छता न केल्यास युवा सेनेच्या वतीने आंदोलन करण्याचा इशारा युवा सेनेचे शहर प्रमुख कृष्णा हूरगट, माजी नगरसेवक सतीश टोणगे आदी नागरिकांनी दिला आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### पाथर्डी शाळेतील विद्यार्थ्यांची विठ्ठलनामात रंगलेली दिंडी

**कळंब, दि.५ जुलै -**

तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पाथर्डी येथे आषाढी एकादशीच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी वारकरी संप्रदायाची परंपरा जपताना विठ्ठलनामाच्या भक्तिमय दिंडीत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांनी विठ्ठल, रुक्मिणी, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत मुक्ताबाई, संत नामदेव, संत जनाबाई आदी संतांच्या वेशभूषा परिधान करून दिंडी सजवली. गावातून काढलेल्या या भव्य दिंडीचे ग्रामस्थ माता-माऊलींनी औक्षण करून स्वागत केले. विठ्ठल-रुक्मिणी मंदिराजवळ पालखीचे पूजन, दर्शन व पुष्पहार अर्पण करून भक्तीमय वातावरणात दिंडीचे स्वागत करण्यात आले. दिंडीच्या अखेरीस सर्वांना केळी व चहा वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन मुख्याध्यापक राजेंद्र बिक्कड व सहशिक्षक धनंजय गव्हाणे, सरोजिनी पोते, मनीषा पवार, सुरेखा भावले यांनी केले. दिंडीत पालक, महिला, ग्रामस्थ, तरुण मंडळांनीही सहभाग नोंदवून विद्यार्थ्यांच्या उपक्रमाचे कौतुक केले.



### जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांची लोहगाव येथे सदिच्छा भेट

**नळदुर्ग, दि.५ जुलै -**

धाराशिव जिल्ह्याचे जिल्हाधिकारी कीर्ती कुमार पुजार यांनी लोहगाव येथील अहिल्यावती नगरमध्ये सदिच्छा भेट देऊन खाजगी जागेतील भोगवटदार घरकुल लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देण्यासाठी प्रत्यक्ष पाहणी केली. त्यांनी शेतकरी, सरपंच व ग्रामस्थांशी संवाद साधत घरकुल बांधकामास परवानगी देण्याचे आश्वासन दिले. तसेच ग्रामपंचायत व पंचायत समितीने जिल्हा परिषदेकडे प्रस्ताव पाठवावा, असे निर्देश दिले. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मैनांक घोष, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक विलास जाधव, गटविकास अधिकारी हेमंत भिंगारदेवे, मेघराज पवार आदी उपस्थित होते. ग्रामपंचायत कार्यालयास देखील त्यांनी भेट दिली व सरपंच प्रवीण पाटील यांच्या हस्ते त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. या भेटीने लोहगाव ग्रामस्थांमध्ये आशा निर्माण झाली असून घरकुल लाभार्थ्यांना दिलासा मिळणार आहे.



### तेरणा अभियांत्रिकीच्या १५ विद्यार्थ्यांची कॅम्पस प्लेसमेंटमधून निवड

**धाराशिव, दि.५ जुलै -**

येथील तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मॅकॅनिकल व इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलीकॉम विभागातील १५ विद्यार्थ्यांची पुण्यातील जयहिंद मोटर्स, सेडमक व वेलमेड युरोपलॉकर्स या नामांकित कंपन्यांत कॅम्पस प्लेसमेंटमधून निवड झाली. या प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन प्रा. अशोक जगताप, प्रा. रणजित दंडनाईक, प्रा. अनिरुद्ध देशपांडे व रामेश्वर मुंढे यांनी केले होते. प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांसाठी आणखी रोजगार संधी उपलब्ध करून देण्यासाठी अनेक कंपन्यांशी संपर्क सुरू आहे.



### सेवानिवृत्तीनिमित्त जाधव यांना निरोप

**तुळजापूर, दि.५ जुलै -**

तालुका कृषी अधिकारी संजय जाधव यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त तुळजापूर येथे भव्य निरोप व सत्कार समारंभ पार पडला. १९९१ पासून शासकीय सेवेत कार्यरत राहिलेल्या जाधव यांनी मृदा व जलसंधारण, फळबाग लागवड, जलयुक्त शिवार, पाणलोट व्यवस्थापन आदी शेतकरी हिताच्या योजना प्रभावीपणे राबवल्या. समारंभात सपत्नीक सत्कार व तुळजाभवानी मातेची प्रतिमा देऊन सन्मान करण्यात आला. तालुका कृषी अधिकारी आबासाहेब देशमुख, कृषी अधिकारी, कर्मचारी व शेतकरी उपस्थित होते. सूत्रसंचालन रामानंद बर्डे, प्रास्ताविक धन्यकुमार बिराजदार तर आभार प्रदर्शन सत्यजित देशमुख, नवनाथ अलमले यांनी केले.

## मुख्यमंत्र्यांकडून अनिल जगताप यांच्या निवेदनाची दखल

### लोहारा तालुक्यातील शेतकऱ्यांना न्यायाचा दिलासा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ जुलै -**

लोहारा तालुक्यातील होळी येथील शेतकरी तुकाराम बिराजदार यांच्या जमिनीचा मोबदला न देता सौर व पवन ऊर्जा प्रकल्प उभारणाऱ्या कंपनीविरोधात अखेर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लक्ष घातले आहे. सामाजिक कार्यकर्ते आणि शेतकरी नेते अनिल जगताप यांनी दिलेल्या ई-मेल निवेदनाची गंभीर दखल घेत मुख्यमंत्री कार्यालयाने मंत्रालयातील ऊर्जा विभागाकडे चौकशीचे आदेश दिले आहेत.



शेतकरी बिराजदार यांनी यापूर्वी तालुका व जिल्हा प्रशासनाकडे तक्रारी केली होती, मात्र त्याला प्रतिसाद न मिळाल्याने त्यांनी लोहारा तहसील कार्यालयासमोर उपोषण सुरू केले.

यावेळी त्यांना पाठिंबा देत अनिल जगताप यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे थेट ई-मेलद्वारे तक्रार दाखल केली होती. धाराशिव जिल्ह्यात सध्या मोठ्या प्रमाणात सौर व पवन ऊर्जा प्रकल्पांचे काम सुरू असून, अनेक शेतकऱ्यांना नाममात्र मोबदला देऊन ३० वर्षांचे करारपत्र घेतले जात असल्याचा आरोप आहे. तसेच सामाजिक वनीकरण आणि पाटबंधारे विभागाच्या जमिनींवरही टॉवर व विद्युत वाहिन्या उभारल्या जात आहेत, स्थानिकांना रोजगार मिळत नाही ही गंभीर बाबही जगताप यांनी निवेदनात नमूद केली होती.

मुख्यमंत्री कार्यालयाकडून निवेदन ऊर्जा विभागाकडे पाठवण्यात आले असून चौकशीचे आदेशही दिले आहेत. त्यासोबतच संबंधित विभागाशी संपर्क करण्याची सूचना जगताप यांना करण्यात आली आहे. त्यामुळे संबंधित शेतकऱ्याला मावेजा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

जगताप यांच्या सक्रिय हस्तक्षेपामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण असून, त्यांच्या कार्यकर्तृत्वाचे शेतकरी वर्गातून कौतुक होत आहे.

### जमीनीचा योग्य मोबदला मिळाला पाहिजे...

या संपूर्ण प्रकरणावर प्रतिक्रिया देताना अनिल जगताप म्हणाले, विकासाला आमचा विरोध नाही, मात्र शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा योग्य मोबदला मिळाला पाहिजे. शासकीय नियमांचा भंग होऊ नये, आणि ज्या वेळेस कंपन्यांकडून अन्याय होईल, त्या वेळेस शेतकऱ्यांची बाजू घेऊन मी न्याय मिळवून देणारच, असे जगताप यांनी सांगितले.

## २३ वर्षीय तरुणीवर लैंगिक अत्याचार; गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ जुलै -**

तालुक्यातील एका गावातील २३ वर्षीय तरुणीवर दोन वेळा लैंगिक अत्याचार केल्याची गंभीर घटना उघडकीस आली आहे. पीडितेच्या तक्रारीवरून वाशी पोलीस ठाण्यात संबंधित आरोपीविरुद्ध बलात्कार व धमकीसह अनुसूचित जाती आणि जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घटनेबाबत माहिती अशी की, दि.२९ जून रोजी दुपारी १२ वाजता पीडिता घरी असताना गावातीलच एका तरुणाने तिच्या घरी येऊन जबरदस्तीने तिच्यावर अत्याचार केला. त्यानंतर पुन्हा दि.२ जुलै रोजी सकाळी ११ वा. तिचा दुसऱ्या गावी नेऊन पुन्हा अत्याचार केला. तसेच कोणाला काही सांगितले तर जीवे ठार मारीन, अशी धमकी देण्यात आली.



त्यानुसार आरोपीवर दि.४ जुलै रोजी वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

## व्हॉट्सॲप लिंकद्वारे मोबाईल हॅक करून १.५० लाखांची फसवणूक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ जुलै -**

शहरातील गोवर्धनवाडी येथील रहिवासी आदित्य पांडुरंग भालेराव (वय २३) यांची मोबाईल हॅक करून १,५०,००० रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे. या प्रकरणी आनंदनगर पोलीस ठाण्यात सायबर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी आदित्य भालेराव यांनी दिलेल्या माहितीनुसार, दि.१९ एप्रिल २०२५ रोजी सकाळी १०.३० ते ११ वाजेदरम्यान व दि.२० एप्रिल २०२५ रोजी सकाळी ८ वाजेच्या दरम्यान त्यांच्या मोबाईलवर रघुवीर बजाज शोरूम, धाराशिवच्या नावाने व्हॉट्सॲप क्रमांकावरून ८७१४३६३६५७ या नंबरवरून एक लिंक पाठवण्यात आली. सदर लिंकवर क्लिक केल्यानंतर त्यांचा मोबाईल हॅक करण्यात आला.



या हॅकिंगनंतर फिर्यादीच्या महाराष्ट्र बँकेत असलेल्या खात्यातून एकूण १,५०,००० रुपये विड्रॉल करून त्यांची आर्थिक फसवणूक करण्यात आली.

या घटनेची गंभीर दखल घेत आनंदनगर पोलीस ठाण्यात दि.४ जुलै गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

या प्रकरणाचा तपास आनंदनगर पोलिसांकडून सुरू असून, सायबर तज्ज्ञांच्या मदतीने आरोपीचा माग काढण्यात येत आहे. नागरिकांनी अनोळखी लिंक किंवा व्हॉट्सॲप मेसेजवर क्लिक करताना सावधगिरी बाळगण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## कानडे यांना कोलंबो विद्यापीठाचा मानद डॉक्टरेट सन्मान

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ जुलै -**

शिक्षण क्षेत्रात प्रदीर्घ सेवा, ग्रामीण भागातील गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी केलेले योगदान आणि सामाजिक व साहित्य क्षेत्रात केलेल्या उत्कृष्ट कार्याची आंतरराष्ट्रीय स्तरावर दखल घेत श्रीलंकेतील नामवंत कोलंबो विद्यापीठाची शैक्षणिक क्षेत्रातील मानद डॉक्टरेट हा सन्मान तुळजापूर तालुक्यातील चिकुंद्रा येथील श्री भैरवनाथ माध्यमिक विद्यालयाचे सहशिक्षक भैरवनाथ खंडू कानडे यांना प्रदान करण्यात आला.



आळंदी पुणे येथे नुकत्याच संपन्न झालेल्या विशेष सोहळ्यात ईगल ग्रुपचे मुख्य कार्यकारी अधिकारी भागवत काटकर, कोलंबो विद्यापीठाचे महाराष्ट्र राज्य संयोजक मदन रेंगडे, सहाय्यक धर्मादाय कार्यालयाच्या उपायुक्त मनीषा आवटे, संयोजक ॲड. आकाश पुजारी यांच्या हस्ते त्यांना हा मानाचा पुरस्कार देण्यात आला.

विद्यार्थ्यांविषयी असलेली तळमळ, शिक्षणातील सातत्यपूर्ण प्रयोगशीलता आणि सामाजिक परिवर्तनासाठी शिक्षणाच्या माध्यमातून उभारलेले योगदान या सर्व बाबींचा गौरव करत हा सन्मान देण्यात आला.

## जिजामाता प्राथमिक कन्या शाळेत आषाढी वारी सोहळा उत्साहात संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.५ जुलै -**

येथील जिजामाता कन्या प्राथमिक शाळा, येथे दि.५ जुलै रोजी आषाढी वारीचा कार्यक्रम उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात संपन्न झाला. महाराष्ट्राची समृद्ध सांस्कृतिक परंपरा आणि संत परंपरेची महती विद्यार्थ्यांना समजावून देण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

दिंडी सोहळ्याचे मुख्य आकर्षण या कार्यक्रमात शाळेतील विद्यार्थिनींनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला. चिमकल्या वारकरीणींनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. डोक्यावर तुळशी वृंदावन, हातात टाळ-मृदंग आणि भगव्या पताका घेऊन त्यांनी विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल चा जयघोष करत एक भव्य दिंडी काढली. शाळेच्या आवारातच काढलेल्या या दिंडीने संपूर्ण परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण केले. अनेक विद्यार्थिनींनी वेशभूषा करून अभंग गायले, ज्यामुळे कार्यक्रमाला एक वेगळीच शोभा आली.

या सोहळ्याला शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. माधुरी विश्वनाथ माने तसेच सर्व शिक्षकवृंद, कर्मचारी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थिनींच्या प्रयत्नांचे कौतुक केले आणि कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

या कार्यक्रमामुळे विद्यार्थिनींना एक अविस्मरणीय अनुभव मिळाला आणि त्यांना आपल्या संस्कृतीबद्दल अभिमान वाटला.

## आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्यांवर सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ जुलै -**

आष्टाकासार तांडा येथे राहणाऱ्या रमणाबाई दासु चव्हाण (वय ७५) यांनी दि. ३० जून २०२५ रोजी संध्याकाळी पाच वाजता विषारी औषध सेवन करून आत्महत्या केली. या प्रकरणी मुरुम पोलीस ठाण्यात सात जणांविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी सोमनाथ दासु राठोड (वय ३५) रा. आष्टाकासार तांडा, सध्या रा. गुलमोहर सिटी, वाघोली, पुणे यांनी पोलिसांत दिलेल्या फिर्यादीनुसार, आरोपी भोजु विठोबा चव्हाण, ताराचंद विठोबा चव्हाण, लुकेश बाबुराव चव्हाण, शांताबाई ताराचंद चव्हाण, संगीता लुकेश चव्हाण, सचिन ताराचंद चव्हाण व सुमन बाबुराव चव्हाण (सर्व रा. आष्टाकासार तांडा) यांनी फिर्यादी व त्यांच्या पत्नी, भाऊ धोंडीराम, वहिणी शालुबाई आणि पुतण्या श्रीरुप यांना शिवीगाळ केली. तसेच लाथाबुक्क्यांनी, काठी व लोखंडी रॉडने मारहाण करून मानसिक व शारीरिक छळ केला.

सततच्या जाचास कंटाळून वृद्ध रमणाबाई चव्हाण यांनी आत्महत्येचा टोकाचा निर्णय घेतल्याची माहिती फिर्यादीने दिली. त्यानुसार मुरुम पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केलाआहे.

## शिक्षक परिषदेच्या वतीने ८ व ९ जुलै रोजी शाळा बंद आंदोलन

### राज्य कार्याध्यक्ष उमाकांत कुलकर्णी यांची माहिती...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ जुलै -**

अंशतः अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना व वर्ग तुकड्यांना देय असलेले २० टक्के वाढीव टप्पा अनुदान न दिल्याच्या निषेधार्थ महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद व शिक्षक समन्वय संघ यांच्या वतीने दि.८ व ९ जुलै रोजी जिल्ह्यात शाळाबंद आंदोलन करणार असल्याची माहिती शिक्षक परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष उमाकांत कुलकर्णी यांनी दिली.

यासंदर्भात शुक्रवारी (ता.४) महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने जिल्हाधिकारी व शिक्षणाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, राज्यातील अंशतः अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना व वर्ग तुकड्यांना २० टक्के वाढीव टप्पावाढ अनुदान देण्यासंदर्भात तत्कालीन राज्य सरकारने १४ ऑक्टोबर, २०२४ रोजी शासन निर्णय काढला. मात्र मागील दोन अधिवेशनात व चालू पावसाळी अधिवेशनात देखील शासनाने वाढीव अनुदानासाठी आर्थिक तरतूद केलेली नाही.



शासनाने वारंवार शब्द देऊनही शिक्षकांची फसवणूक केल्याच्या निषेधार्थ महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद व शिक्षक समन्वय संघ यांनी दि.८ व ९ जुलै रोजी शाळाबंद आंदोलनाची हाक दिली आहे.

या आंदोलनात जिल्ह्यातील शिक्षक, प्राध्यापक, मुख्याध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच शिक्षण संस्था चालक व शिक्षण प्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष उमाकांत कुलकर्णी यांनी केले आहे.

## नॅचरल शुगरकडून भाडेतत्त्वावर अनुदान स्वरूपात ड्रोनद्वारे ऊस फवारणी सुविधा



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ जुलै -**

सद्यस्थितीत ऊस पिकाचे कीड रोग अन्नद्रव्य व्यवस्थापन करून उसाची चांगली वाढ होण्यासाठी व जाडी वाढवण्याच्या अनुषंगाने नॅचरल शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीज लि. रांजणीचे चेअरमन व कार्यकारी संचालक कृषिरत्न बी.बी. ठोंबरे यांच्या संकल्पनेतून कारखान्याने सभासद आणि बिगर सभासद शेतकऱ्यांसाठी ऊस पिकाची ड्रोनद्वारे फवारणी करण्याची योजना आखण्यात आली आहे.

या योजनेअंतर्गत नॅचरल शुगर मार्फत नोंदणीकृत शेतकऱ्यांचा ऊस फवारण्याकरिता भाडेतत्त्वावरील ड्रोन फवारणीसाठी ५० टक्के अनुदान देण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत चेअरमन बी बी ठोंबरे, संचालक पांडुरंग आवाड, केन मॅनेजर मदन सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली हिंगणगाव, टाकळगाव, तांदूळजा परिसरातील शेतकऱ्यांसाठी ड्रोनद्वारे ऊस फवारणीचे प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले.

नॅचरल शुगरचे ऊस विकास अधिकारी शिवप्रसाद येळकर यांनी ड्रोन फवारणी करीत असताना त्याचा उडण्याचा वेग साधारणतः ४.५ ते ५.० मीटर प्रति सेकंद एवढा असतो त्यामुळे कमी वेळेत जास्त फवारणी क्षेत्र होते.

पाऊस असताना फवारणी करू नये या तांत्रिक बाबींची माहिती देऊन वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटचे वसंत ऊर्जा, सूक्ष्म अन्नद्रव्य फवारणीचे फायदे समजावून सांगून फवारणीसाठी तयार करावयाचे द्रावण याचे प्रात्यक्षिक प्रशिक्षण येळकर यांनी करून दाखवले.

यावेळी नॅचरल शुगरचे कृषी पर्यवेक्षक लहू काळदाते, हनुमंत पालकर, भास्कर वाघमोडे, कृषी सहाय्यक मेघनाथ माळी, आरेफ शेख, वैभव भिसे, स्वप्निल खोसे, शिवदास फुटाणे, शिवानंद बिडवे, इस्माईल शेख, गोविंद गायकवाड व शेतकरी उपस्थित होते.

ऊस पीक ८ ते १५ फूट उंचीचे झाले आहे. पाठीवर फवारणी पंप घेऊन शेतात फवारणी करणे शक्य नाही. ड्रोनद्वारे फवारणी केल्यामुळे विंचू, काटा, सापांची भीती दूर झाली आहे. वेळ, पैसा व शारीरिक कष्ट वाचले आहेत. **- तुकाराम कस्पटे,** शेतकरी, हिंगणगाव.

पारंपरिक पद्धतीने पाठीवर पंप घेऊन प्रतिबंधात्मक औषध फवारणीसाठी एक एकर क्षेत्रासाठी पाच ते सहा टाक्या लागतात. तब्बल सव्वा तास वेळ लागतो. हेच काम ड्रोनद्वारे सात ते आठ मिनिटांमध्ये पूर्ण होते. ड्रोनद्वारे फवारणीसाठी एकरी ७०० ते ८०० रुपये फवारणीचा खर्च येतो. मात्र नॅचरल शुगरने अनुदानित स्वरूपात ड्रोन फवारणीसाठी उपलब्ध केल्यामुळे अवघ्या २५० रुपयांमध्ये एक एकर क्षेत्राची फवारणी झाली त्यामुळे खर्चामध्ये बचत झाली. **- विश्वंभर घवले,** शेतकरी, टाकळगाव.

# योजनेत उपचार करुन रुग्णाकडून पैसे उकळण्याऱ्या लोटस हॉस्पीटलला जिल्हाधिकाऱ्यांकडून पाठीशी घालण्याचा प्रयत्न

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.०५ जुलै -**

महात्मा फुले जन आरोग्य योजनेत उपचार घेत असताना बेकायदेशीरित्या रक्कम वसूल केल्याचे सिद्ध झाल्यानंतर केवळ रक्कम परत करण्याचे निर्देश देत जिल्हाधिकाऱ्यांनी लोटस हॉस्पीटलला पाठीशी घालण्याचा प्रयत्न केला असल्याची तक्रार रुग्ण आबेद उल्लाखान इनायत उल्लाखान यांनी एका निवेदनाद्वारे मुख्यमंत्री व आरोग्यमंत्र्याकडे केली आहे. दरम्यान असे निर्देश देण्यासाठी जिल्हा सनियंत्रण समितीने या प्रकरणात जिल्हाधिकाऱ्यांची दिशाभूल केली की काय अशी चर्चा सुरू आहे.

शहरातील लेबर कॉलनी येथीलआबेद उल्लाखान इनायत उल्लाखान हे दि. ७ मे रोजी शहरातील प्रसिद्ध असलेल्या लोटस हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल झाले होते. महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत उपचाराची त्यांना मंजुरी मिळाली होती. परंतू लोटस हॉस्पीटलच्या डॉक्रांनी उपचाराची मंजुरी मिळाल्यानंतरही त्यांच्याकडून विविध तपासण्या तसेच औषधांचे रक्कम वसुल केली. दि. ७ मे रोजी ८ हजार तसेच औषधींचे २ हजार ८५३, दि. १० मे रोजी पुन्हा औषधींचे १ हजार ५००, त्यानंतर दि. २६ मे रोजी २ हजार ६१४ अशा रक्कमा वसुल केल्याचे त्यांनी निवेदनात नमुद केले आहे. याप्रकरणी त्यांनी दि. १५ व २८ मे रोजी जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार केली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी झाल्यानंतर लोटस हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी योजनेत उपचार करुन त्यांच्याकडून रक्कम वसूल केल्याचे सिद्ध झाले दरम्यान दि. १५ मे रोजी तक्रार केल्यानंतर लोटस रुग्णालयाचे डॉक्टर संजय पडलवार यांनी दि. १६ मे रोजी रुग्ण आबेद उल्लाखान इनायत उल्लाखान यांना १८ हजार ४२२ ही रक्कम मनी ऑर्डर केली. परंतु आबेद उल्लाखान इनायत उल्लाखान यांनी ही रक्कम घेण्यास नकार दिला. त्यांनतर पुन्हा दि. ५ जून रोजी उल्ला खान इनायत उल्ला खान यांना डॉ. संजय पडलवार यांनी फोन पे द्वारे १८ हजार ८४४ रुपये पाठवले परंतु ती रक्कम देखील आबेद उल्लाखान इनायत उल्लाखान यांनी डॉ. संजय पडलवार यांना परत केली. तर दि. १७ जुन रोजी जिल्हा सनियंत्रण समितीच्या बैठकित लोटस हॉस्पीटलचे वैद्यकिय समन्वयक डॉ. संजय पडलवार यांना रुग्णाकडून घेतलेली रक्कम परत देण्याचे निर्देश देण्यात आले.


दरम्यान महात्मा फुले जन आरोग्य योजनेत उपचार सुरू असताना रक्कम वुसल केल्याचे सिद्ध झाल्यानंतर लोटस हॉस्पिटल विरुद्ध कठोर कारवाई करणे आवश्यक असताना, जिल्हाधिकाऱ्यांनी केवळ लोटस हॉस्पिटलचे डॉ. संजय पडेलवार यांना केवळ रक्कम परत करण्याचे निर्देश देत लोटस रुग्णालयाला पाठीशी घालण्याचा प्रयत्न केला असल्याची तक्रार आबेद उल्लाखान इनायत उल्लाखान एका निवेदनाद्वारे मुख्यमंत्री, आरोग्यमंत्र्यांकडे केली आहे.

# माहूर नगरपंचायतीच्या बेजबाबदारपणामुळे अपघातात एका वळूचा गेला जीव

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि.०५ जुलै -**

राज्यात स्वच्छतेच्या बाबतीत अग्रगण्य ठरलेली माहूर नगरपंचायत सध्या मोकाट महामार्गावरील जनावरांचा बंदोबस्त करण्यासाठी कमालीचे दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येत असून, नगरपंचायत प्रशासनाच्या बेजबाबदारपणा व हलगर्जीपणामुळे शुक्रवारी रात्री १०:३० च्या सुमारास शहरातील इंडियन ऑईल पेट्रोल पंप (त्रिमूर्ती फिलींग सेंटर) समोर राष्ट्रीय महामार्गावरुन भरधाव वेगाने येणाऱ्या एका स्विफ्ट डिझायर कारने दिलेल्या जबर धडकेत रस्त्याच्या मधोमध ठाण मांडून बसलेल्या एका निष्पाप वळूचा जीव गेला तर कारचालकाचा जीव थोडक्यात वाचला.

शहरातील नागरिकांनी वारंवार सूचना व तक्रारी करूनही तसेच युवासेना शहर प्रमुख विजयसिंह हजारी यांनी यासंदर्भात दि. २५ जून रोजी लेखी निवेदन देऊनही शहरातील मुख्य महामार्गावरील मुक्त संचारासह ऐण रस्त्याच्या मधोमध ठाण मांडून बसणाऱ्या मोकाट जनावरांचा नगरपंचायत



प्रशासनाकडून कोणत्याही प्रकारचा बंदोबस्त करण्यात न आल्याने शुक्रवारी रात्री १०:३० वाजताच्या सुमारास इंडियन ऑईल पेट्रोल पंप (त्रिमूर्ती फिलींग सेंटर) समोर पुसदच्यादिशेने माहूर शहराकडे भरधाव वेगाने येणाऱ्या चक २४ त ११२१ या क्रमांकाच्या एका स्विफ्ट डिझायर कारने रस्त्याच्या मधोमध ठाण मांडून बसलेल्या एका वळूस जोरदार धडक देऊन जवळपास शंभर फूट फरफट नेल्याने गंभीर जखमी अवस्थेत तडफडून त्याचा जागीच मृत्यू झाला.

माहूर शहरातील मुख्य महामार्गावर ठाण मांडून बसणाऱ्या मोकाट जनावरांमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन गंभीर अपघाताची शक्यता वर्तविण्यात येऊन या मोकाट जनावरांचा महामार्गावरील मुक्त संचार व ठाण मांडून बसण्यावर त्वरित कडक उपाययोजना करुन बंदोबस्त करण्याची मागणी युवासेना शहर प्रमुख विजयसिंह हजारी यांनी माहूर नगरपंचायत येथे मुख्याधिकारी विवेक कांदे यांना एका लेखी निवेदनाद्वारे केली होती. या संदर्भात विविध प्रसारमाध्यमांतून वृत्त सुद्धा प्रकाशित झाले.

परंतु, या गंभीर बाबीकडे नगरपंचायत प्रशासनाने साफ दुर्लक्ष केल्याने शुक्रवारी एका निष्पाप वळूला भरधाव वेगाने येणाऱ्या कारने जोरदार धडक देऊन दूरपर्यंत फरफटत नेल्याने गंभीर जखमी अवस्थेत तडफडून जागेवरच जीव गमावावा लागला.

राष्ट्रीय महामार्गावर ठाण मांडून बसणाऱ्या मोकाट जनावरांमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन आजवर अनेक अपघाताच्या घटना घडल्या असून, या मार्गावर आणखी एखादी गंभीर अपघाताची घटना घडून मोठी जीवीतहानी होण्याआधी नगरपंचायत प्रशासनाने तातडीने या महामार्गावरील मोकाट जनावरांचा मुक्त संचार व ठाण मांडून बसण्यावर उचित बंदोबस्त करावा अशी मागणी जोर धरू लागली आहे.

## संक्षिप्त वृत्त

### ईस्लापूर येथील सावरकरनगर येथील प्राथमिक शाळेत एक पेड माँ के नाम` कार्यक्रम

**इस्लापूर-** एक पेड माँ के नाम या कार्यक्रमांतर्गत ता .४ जुलै रोजी जि .प .प्रा. शाळा सावरकरनगर येथे वृक्षारोपण करण्यात आले व



तसेच मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थी, पालकांना पन्नास वृक्ष वाटप करण्यात आले. याप्रसंगी ईस्लापूर येथील वनपरीक्षेत्र अधिकारी सचिन धनगे, यांच्या मार्गदर्शना नुसार येथील कार्यक्रमात कर्मचारी यांनी सहभाग नोंदवत पर्यावरणाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले.... झाड आई प्रमाणे असून माय व लेकराच्या संबंधासारखे आहे. आजच्या काळात वनाची मोठ्या प्रमाणात तोड होत आहे आशात पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षाचे संवर्धन करणे संतुलन राखणे वृक्षाची जोपासना करणे हे आज प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य बनले आहे. असे मत याप्रसंगी वन विभागाच्या कर्मचारी शीला केंद्रे यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमास वनपाल व्ही ,एस . गुद्दे ,आर. बी .कोलते. दिपाली सोनाळे, फिरते पथक चे वनपाल एन एस काजे ,वनरक्षक नागरगोजे ' केंद्रेमॅडम , कुडमते मॅडम,खंनपट्टे मॅडम ,वनरक्षक मुंडे , डोईफोडे ,'वनमजूर उत्तम पवार, वनमजूर उत्तम जाधव , झडगे वनरक्षक वनविभागातील अन्य वनरक्षकांची उपस्थिती होती. इस्लापूर येथील माजी सरपंच देविदास पळसपुरे ' शाळेचे मुख्याध्यापक अडबलवार मॅडम इर्शाद पांडे, पत्रकार परमेश्वर पेशवे, प्रमोद जाधव, सुगाजी हाडे, गोपनीय शाखेचे मडावी , जगदीश हनवते, त्यांच्यासह विद्यार्थी व पालक यांनी या कार्यक्रमांमध्ये सहभाग नोंदवला होता.

### डॉ. सुरेश सावंत यांची नांदेड आकाशवाणीवर मुलाखत

**नांदेड -** ज्येष्ठ साहित्यिक तथा शिक्षणतज्ज्ञ डॉ. सुरेश सावंत यांच्या 'आभाळमाया' ह्या बालकवितासंग्रहाला साहित्य अकादमीचा पुरस्कार नुकताच जाहीर झाला आहे. त्या निमित्ताने त्यांची



नांदेड आकाशवाणी केंद्रावर एक दीर्घ मुलाखत ध्वनिमुद्रित करण्यात आली आहे. ही मुलाखत प्रसिद्ध निवेदक तथा पत्रकार राम तरटे यांनी घेतली आहे. या मुलाखतीत जडणघडण, संस्कार, बालसाहित्य आणि बालशिक्षणाच्या क्षेत्रातील अनुभव, वाचनसंस्कृतीच्या आणि लेखनसंस्कृतीच्या विकासासाठी केलेले विविध उपक्रम, आजची शिक्षणव्यवस्था, चांगल्या बालसाहित्याचे निकष, बालसाहित्याचे महत्त्व, आजच्या काळात बालसाहित्याची प्रस्तुतता इ. विविध विषयांवरील प्रश्नांना डॉ. सुरेश सावंत यांनी मनमोकळी उत्तरे दिली आहेत. ही. मुलाखत मंगळवार, दि. ८ आणि बुधवार, दि. ९ जुलै रोजी सकाळी ८. ४० वाजता दोन भागांत प्रसारित होणार आहे. या मुलाखतीचा लाभ घेण्याचे आवाहन आकाशवाणीने केले आहे.

### बेवारस वाहनांचा लिलाव

**कुंडलवाडी -**कुंडलवाडी पोलीस स्टेशन येथे चार मोटार सायकल बऱ्याच दिवसा पासून बेवारस म्हणून लावण्यात आलेल्या असून त्या मोटार सायकली कोणाची असतील त्यांनी त्या वाहनाची ओळख पटवून कागदपत्रे दाखवून ती वाहने दि.७ जुलै पर्यंत घेऊन जावे अन्यथा आपली हया वाहनावर आपला काही मालकी हक्क नाही असे समजून दि.८ जुलै रोजी सकाळीं १० वा.बेवारस समजून लिलावाची प्रक्रिया सुरु करण्यात येईल असे अहवान कुंडलवाडी पोलीस स्टेशनचे स. पो. नी. ज्ञानेश्वर शिंदे यांनी केले आहे.

### डॉ.फेरोज मुहम्मद खान यांना पीएच.डी. पदवी जाहीर

**नांदेड -** फेरोज मुहम्मद खान यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड तर्फे वाणिज्य विषयात शिक्षण क्षेत्रातील सर्वोच्च



विद्यावाचस्पती (झह.ऊ) ही पदवी जाहीर करण्यात आली. विद्यापीठा द्वारे आयोजित पदवीदान समारंभात मान्यवरांच्या हस्ते त्यांना विद्यावाचस्पती पदवी प्रदान करण्यात येणार आहे. त्यांनी आपले संशोधन कार्य पीपल्स महाविद्यालयातील प्रा. डॉ. रेश्मा डी. डोईफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली 'मराठवाडा प्रदेशाच्या संदर्भात राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाच्या आर्थिक विश्लेषणाचा अभ्यास' या शीर्षकावर आपला संशोधन प्रबंध पूर्ण केला. फेरोज खान यांनी शिक्षण क्षेत्रातील सर्वोच्च पदवी मिळवल्याबद्दल त्यांचे मोहम्मद खान,रशिदा बेगम, गुलाम शाहींदर, डॉ.फर्जाना एम.खान, मंजूर खान,फरहत एम.खान, फिरोज पटेल, नुसरत पटेल,अमजद खान यांनी कौतुक आणि अभिनंदन केले आहे आणि भविष्य काळातील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

### कै. मोहन गोविंद सुर्यवंशी यांचे निधन

**नायगाव -** नरसी येथील लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नगरातील जेष्ठ नागरिक मोहन गोविंद सुर्यवंशी यांचे दि. ५ जुलै २०२५ रोजी



(शनिवार) दुपारी ३ वाजता निधन झाले. ते ६० वर्षांचे होते. मोहन सुर्यवंशी हे काही दिवसांपासून आजारी होते.उपचारासाठी त्यांना शिर्डी येथील श्री साईबाबा संस्थानच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र प्रकृतीत सुधारणा न झाल्याने त्यांना ५ जुलैच्या पहाटे नरसी येथे त्यांच्या निवासस्थानी आणण्यात आले. घरी आल्यानंतर काही तासांतच त्यांची तब्येत खालावली आणि दुपारी तीन वाजता त्यांनी अखेरचा श्वास घेतला. दि. ६ जुलै २०२५ (रविवार) रोजी नरसी येथील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली आणि एक मुलगा असा परिवार आहे. विजय सुर्यवंशी यांचे ते वडील होत.

# विठ्ठल भक्तीच्या गितांचा अनोखा आविष्कार, कुसूम सभागृहात रंगला 'गजर हरिनामाचा'

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.०५ जुलै -**

कलांगण प्रतिष्ठाण, श्री स्वामी समर्थ मंदिर अन्नछत्र यांच्या संयुक्त सहकार्यातून काल राज्यातील व शहरातील दिग्गज कलावंतांनी आषाढी एकादशीनिमित्त एकापेक्षा एक सरस भक्तीगिते सादर करुन विठ्ठल भक्तीत रसिकांना मंत्रमुग्ध केले.

आषाढी एकादशीचे निमित्त साधून कलांगण प्रतिष्ठाण, श्री स्वामी समर्थ मंदिर व अन्नछत्र यांच्या सहकार्यातून कुसूम सभागृहात ॲड.गजानन पिंपरखेडे यांच्या संकल्पना, निर्मिती व निवेदनातून गजर हरिनामाचा हा कार्यक्रम सादर करण्यात आला. या कार्यक्रमात पुण्याच्या चैतन्य कुलकर्णीने, मुंबईच्या आसावरी जोशी (बोधनकर) या प्रख्यात गायकांनी दर्जेदार रचना सादर करुन रसिकांना विठ्ठल भक्तीत मंत्रमुग्ध केले. सोबतच मराठवाड्याचा प्रख्यात गायक विलास गारोळे, गायिका सौ.रागिनी जोशी, उमेश मेगदे आणि विजय जोशी यांनी देखील जुन्या व दुर्मिळ विठ्ठल भक्तीच्या रचना सादर करुन कार्यक्रमात रंगत आणली.



या कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सुनील वेदपाठक यांच्या हस्ते झाले. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार हे होते. तर प्रजावाणीचे संपादक शंतनू डोईफोड, ऱ्हदयरोग तज्ज्ञ डॉ. राहुल पटणे, उपप्राचार्य प्रा.प्रभाकर उदगीरे, श्रीराम मंदिरचे अध्यक्ष रमेश मिरजकर, प्रसिध्द उद्योजक अनिल शेटकार, धनमुद्राचे बालाजी पांडागळे, राजेंद्र हुरणे आदींची यावेळी उपस्थिती होती.

विठ्ठलाचा महिमा आणि त्याची महती सांगताना ॲड. गजानन पिंपरखेडे यांनी ऐतिहासिक संदर्भ व धार्मिक संदर्भाचा उल्लेख करुन आपल्या आगळ्यावेगळ्या निवेदनाची छाप पाडली. या सर्व गायक कलावंतांनी विठूचा गजर हरिनाम, सुंदर ते ध्यान, सेवा धर्मी पुण्य आहे, इंद्रायणी काठी, पांडूरंग कांती, काळ देहाशी, मला दादला नको गं, येथे का रे उभा श्रीरामा, स्वामी समर्थ नामाचा, रात्र काळी घागर काळी, अरे कृष्णा अरे कान्हा, ताटी उघडा ज्ञानेश्वरा, अवघे गर्जे पंढरपूर, खेळ मांडीयला, नाम तुझे घेता देवा, वृंदावनी वेणू, सुंदर माझे जाते, कधी लागेल रे वेड्या, देरे कान्हा, वैवल्याच्या चांदण्याला, विठ्ठलाच्या पायी थरारली, अवघा रंग एक झाला या रचना सादर करुन नांदेडच्या कुसूम सभागृहात तुंडूब भरलेल्या रसिकांना भक्तीलीन केले. कार्यक्रमाची संगतसाथ प्रमोद देशपांडे, पंकज शिरभाते, राजू जगदने, स्वप्नील धुळे, निखिल प्रधान, विश्वेश्वर जोशी आदींने केले. चैतन्य कुलकर्णी यांनी सुधीर फडके यांच्या विठ्ठल भक्तीच्या गितांची मेलडी सादर करुन कार्यक्रमात वेगळीच रंगत आणली. कार्यक्रमाचे निर्मिती सहाय्य रमेश मेगदे, संगीत संयोजन डॉ.प्रमोद देशपांडे, दिग्दर्शन विजय जोशी, ध्वनी व्यवस्था संतोष गट्टाणी यांची होती.

## भगर खाताना काळजी घेण्याचे आवाहन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.०५ जुलै -**

उपवासाला मोठ्या प्रमाणात भगरीचे सेवन केले जाते. भगर खाल्लूयामुळे अन्न विषबाधा झाल्याच्या अनेक घटना महाराष्ट्रात व नांदेड जिल्ह्यात यापूर्वी घडल्या आहेत. भगरीवर मोठ्या प्रमाणात अस्परजिलस प्रजातीच्या बूरशीचा प्रादुर्भाव होतो. ज्यामुळे फ्युमिगाक्लेविन यासारखी विषद्रव्ये तयार होतात. पावसाळयातील वातावरण बूरशीच्य वाढीसाठी अनूकुल असते, अशी बूरशीचा प्रादुर्भाव झालेली भगर खाण्यात आल्यास अन्न विषबाधा होऊ शकते. त्यामुळे नागरिकांनी उपवासाला भगर खाताना काळजी घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे

# अवैधरित्या देशी दारू विक्री करताना एकास रंगेहात पकडले

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि.०५ जुलै -**

नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप,पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांच्या आदेशाने नांदेड जिल्ह्यात सुरू असलेल्या ऑपरेशन फ्लॅश आउट अंतर्गत पोलीस निरीक्षक गणेश कराड यांनी माहूर तालुक्यातील मौजे रूई येथे देशी दारूच्या बाटल्या अवैधरित्या विक्री करत असलेल्या आरोपीस रंगेहात पकडून अटक केल्याची घटना दि. ५ जुलै रोजी सकाळी १० वाजताच्या सुमारास घडली आहे.

याच अनुषंगाने मौजे रुई येथे दि.४ जुलै रोजी पोलीस निरीक्षक गणेश कराड यांनी शांतता समितीची बैठक घेऊन नागरिकांना अवैध धंदे करू नका,व्यसनापासून दूर राहा, असे सविस्तर मार्गदर्शन केले होते. परंतु दुसऱ्याच दिवशी येथील संजू लोट नावाच्या व्यक्तीने देशी दारूचे ४२ बॉटल घेऊन विक्री करत असताना त्यास रंगे हात पकडण्यात आले.

या कारवाईत पोहेका आशिष डगवाल, पोहेका चालक प्रशांत भोपळे, पोका ज्ञानेश्वर खंदाडे, पोका पवन राऊत,शिल्पा राठोड, क्रांती राठोड, गजानन जाधव, होमगार्ड सलमान मजीद खान यांनी परिश्रम घेतले.

# किनवट शहरातील नागरिकांचा जीवघेणा प्रवास

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि.०५ जुलै -**

सध्या किनवट शहरातून स.वि.म. परिसराकडे जाणाऱ्या रेल्वे अंडरब्रिजचे काम सुरू असल्याने या मार्गाने वाहतूक पूर्णतः बंद आहे. प्रशासनाने पर्यायी मार्ग म्हणून सुभाष नगर मार्गे अंडरब्रिज मार्ग उपलब्ध करून दिला असला, तरी तो अतिशय लांबचा फेरा असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या मोठ्या फेऱ्यामुळे काही नागरिक बसस्थानकाजवळील असलेल्या मोठ्या नाल्यामधूनच रेल्वे ट्रॅक ओलांडण्याचा धोका पत्करत असल्याचे निदर्शनास आले आहे. उन्हाळ्यात या नाल्यांमध्ये पाणी नसल्यामुळे काही अंशी ही कसर भरून निघाली होती. मात्र मागील आठवड्यापासून किनवट तालुक्यात सुरू असलेल्या संततधार व मुसळधार पावसामुळे नदी, नाले आणि ओढे वाहू लागले आहेत. त्यामुळे आता हा मार्ग पूर्णतः धोकादायक व जीवघेणा बनला आहे.



वाहत्या नाल्यामधून प्रवास करणे केवळ अडचणीचेच नव्हे, तर जीवघेणेदेखील आहे. या मार्गावर चिखल, पाण्याचा वेग, आणि अनपेक्षित पुरामुळे कधीही गंभीर घटना घडू शकते. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी प्रशासनाचे लक्ष वेधले असून, त्यांनी विनंती केली आहे की प्रशासनाने हा असुरक्षित मार्ग पूर्णतः बंद करावा, धोका असलेल्या मार्गावर सुरक्षेचे दृष्टीने बॅरिकेड्स बसवावेत, दिशादर्शक फलक आणि रस्ता बंद आहे, धोकादायक मार्ग असे सूचनाफलक लावावेत, नागरिकांना पर्यायी मार्गाचा वापर करण्याचे आवाहन करावे, संभाव्य अपघात टाळण्यासाठी स्थानिक पातळीवर गस्त ठेवावी अशा उपाय योजना करण्याची मागणी होत आहे.

## खंडोबाचीवाडी येथे वसंतराव नाईक यांची जयंती साजरी



**तभा वृतसेवा**
**लोहा, दि.०५ जुलै -**

हरीत क्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांच्या जंयती निमित्य वृक्षारोपण करून कृषी महाविद्यालयात खंडोबाची वाडी येथे विविध कार्यक्रमाचे आयोजित करण्यात आले होते या कार्यक्रमात ग्रामीण शेतकरी जागरुता शेतकऱ्यांना मार्गदर्शन आधुनिक शेती, बदलते हवामान,पिकावरील किड , कृषी योजना संबंधात माहिती देण्यात आली.वृक्षाचे महत्त्व विशद करुन वृक्षारोपण केले ,जनावरांचे लसीकरण, शेतकरी दिंडी असे विविध कार्यक्रम घेण्यात आले. वसंतराव नाईक महाविद्यालयाचे डि.जी सोरे व पि.सी बंडेवार यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी खंडोबावाडीचे सरपंच ज्ञानोबा मुंडे , पोलिस पाटील महाजन मुंडे, माजी सरपंच काशीनाथ मुंडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते मान्यवरांचे मोलाचे मार्गदर्शन कुणाल कदम, अजय खोकले, आदित्य खेडेकर, रोहित लांडगे अभिषेक लाड यानी परिश्रम घेऊन कार्यक्रम यशस्वी पार पाडला.

## काँग्रेसकडून प्रभाग निहाय आढावा बैठकीला प्रारंभ



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.०५ जुलै -**

आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने शहर काँग्रेसकडून व्यापक नियोजन आखण्यात आले असून, प्रभाग निहाय आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. दरम्यान काँग्रेस जिल्हाध्यक्ष तथा माजी आ. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार यांच्या विशेष उपस्थितीत सिडको वाघाळा प्रभाग क्र. विसची आढावा बैठक शुक्रवार (दि.४) रोजी हडको येथे घेण्यात आली. यावेळी मनपा निवडणूकीच्या अनुषंगाने सखोल चर्चा करत संघटनात्मक कार्यक्रमाची आखणी करण्यात आली.

आगामी महानगरपालिका निवडणूकीच्या अनुषंगाने काँग्रेस कडून सुक्ष्म नियोजन केले जात आहे. शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने आता प्रभाग निहाय आढावा बैठकीचे आयोजित करण्यात आले आहे. दरम्यान काँग्रेस जिल्हाध्यक्ष हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार यांच्या मार्गदर्शनात, सिडको वाघाळा प्रभाग क्र. २० ची आढावा बैठक शुक्रवार (ता.४) रोजी हडको येथे घेण्यात आली. यावेळी स्थानिक पदाधिकारी व वरिष्ठांमध्ये नियोजना संदर्भात सखोल चर्चा करण्यात आली. यावेळी संघटनात्मक कार्यक्रमाची आखणी करण्यात आली. यावेळी प्रदेश सरचिटणीस राजेश पावडे, श्याम दरक, ज्येष्ठ नेते सुरेशदादा गायकवाड, मसुद खान, आनंद चव्हाण, बालाजी चव्हाण, शमीम अब्दुला, महेश देशमुख तरोडेकर, जे. पी. पाटील, मुंन्तजीब, शेर अली खान, अजीज कुरेशी, बापूसाहेब पाटील, सुरेश हटकर, सत्यपाल सावंत, गगन यादव, वाजीद अन्सारी, दीपक सिंग हुजिरिया, नसीमा खान, डॉ. करुणा जमदाडे, पी.एस.गवळी, भारती रणवाडे, वंदना मगरे, महेश शिंदे, ज्योती कदम, प्रसेनजित वाघमारे, डॉ. अशोक कलंत्री, लतिफ शेख, देविदास कदम, संजय कदम, शेख मोईन लाठकर, शंकर गव्हाणे, किशन रावनगावकर, माणिक श्रोते, देविदास कहाळेकर, अजय गालेवाड, भुजंग स्वामी, नरुद्दीन शेख, भगवान जोगदंड, आनंदा गायकवाड, शशिकांत जोंधळे, तुकाराम झडते, चित्ते मावशी, ढवळे मावशी आदीसह प्रभागातील सर्व प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

# माळकौठ्याचे व्यंकटराव जाधव यांची चार पिढ्यांची वारी परंपरा; पांडुरंगाच्या भक्तीतून जोपासला लोकसेवेचा वसा

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि.०५ जुलै -**

माळकौठा येथील व्यंकटराव जाधव यांनी माझ्या वडिलांचा मिराशी गा देवा, तुझी चरण सेवा पांडुरंगाया संत वचनाप्रमाणे चार पिढ्या पासून चालत असलेली पंढरीच्या वारीची परंपरा कायम चालू ठेवत वयाच्या १९ व्या वर्षापासून पांडुरंगाच्या भक्तीतून लोकसेवेचा वसा जोपासला आहे .दोन वर्षाच्या कोरोना काळात गावातच पंढरीची वारी काढून खंड पडू न देता गावकऱ्यांनाही भक्तीचा मार्ग दाखविला आहे .

गेल्या चार पिढ्यांपासून जाधव यांची कुटुंबीय वारकरी संप्रदायास जुडलेले आहे. प्रपितामह कै. गणपती पाटील जाधव यांनी सन १९७० पासून पंढरपूरच्या पायी वारीत सहभागी झाले होते. सुरुवातीस दळणवळण सुविधा नसल्याने माळकौठा गावातून पायी मुदखेड रेल्वे स्टेशन यावे लागत होते. यानंतर रेल्वेने पुण्याला जाऊन आळंदी वारीत सहभाग घ्यावा लागत असे. आजोबा कै. व्यंकटराव पाटील जाधव यांचा अल्पशा सहवास लाभला असून यांनीही पंढरीची वारी केली आहे. यानंतर वडील तातेराव पाटील जाधव यांनी नित्य नेम दरवर्षी वारिस सहभाग घेतला आहे.



कुटुंबाचा वारसा जोपासत व्यंकट पाटील जाधव यांनी सन २००२ पासून पायी पंढरपूर वारी सुरू केली आहे. वारकरी संप्रदायातील बाळकडू धडे मिळाल्याने भक्ती मार्गातून लोकसेवा जोपासली आहे. देह जावो अथवा राहो ,पांडुरंगीं द्रड भावोया संत वचनाप्रमाणे पांडुरंगाच्या दिशेने वारकरी मार्गक्रमण केले आहे. सातत्याने संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम महाराजांच्या संतवाणीने प्रेरित होऊन पंधरवाडा भागवत एकादशीचा नित्यनेम करत गावात हरीपाठीच्या माध्यमातून भक्तिमय ज्योत कायम तेवत ठेवली आहे .

कोरोना काळातील कडक शासन निर्बंधामुळे पंढरीच्या वारीची परवानगी नाकारण्यात आली होती. पंढरपूरची वारी खंड पडू नये यासाठी गावात प्रति पंढरपूर वारी करण्याचा निर्णय घेतला. गावातील भजनी संच तसेच वारकरी संप्रदायातील ५० वारकऱ्यांना सोबत घेऊन आषाढ शुद्ध दशमीला पंढरपूर वारी काढली वारकऱ्यांच्या वेशभूषेत फडशी बांधून गावातील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात तळ ठोकला.

माझ्या जीवीची आवडी, पंढरपूर नेईन गुढी माऊली ज्ञानेश्वरांच्या वचनाप्रमाणे आज पर्यंत पंढरीची वारी सुरूच ठेवली आहे. संपूर्ण महाराष्ट्रात त्यांनी साडेनऊ हजार मोफत ज्ञानेश्वरी ग्रंथ वाटप केले आहे. गावातील लोकांना पांडुरंगाच्या दारी निवासाची व्यवस्था व्हावी यासाठी पंढरपूर या ठिकाणी प्लॉट खरेदी केला आहे. आजपर्यंत जाधव कुटुंबीयांनी वारकरी संप्रदायात केलेली कार्य खरोखरच उल्लेखनीय व कौतुकास्पद आहे.

# किल्ले धारूर नगरपरिषद आणि नागरिक: एक सुशासनासाठी सक्रिय सहभाग

**सुर्यकांत जगताप**

**किल्लेधारूर दि.५ जुलै**

स्थानिक स्वराज्य संस्था, मग ती ग्रामपंचायत असो वा नगरपरिषद, कोणत्याही शहराच्या किंवा गावाच्या विकासात आणि तेथील नागरिकांच्या जीवनात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावते. धारूर नगरपरिषद देखील याला अपवाद नाही. धारूर शहराच्या विकासाची दिशा ठरवण्यात, नागरिकांना मूलभूत सुविधा पुरवण्यात आणि एक शांततामय व सुव्यवस्थित समाज घडवण्यात नगरपरिषदेचा वाटा मोठा आहे. मात्र, केवळ नगरपरिषदेच्या एकहाती प्रयत्नांनी शहर प्रगती करू शकत नाही. खरी प्रगती तेव्हाच साधली जाते, जेव्हा नगरपरिषद आणि धारूरचे नागरिक यांच्यात सक्रिय, जबाबदार आणि परिणामकारक सहभाग असतो. नागरिकांचा सहभाग केवळ मतांपुरता मर्यादित न राहता, तो धारूरच्या विकासाचा आणि सुशासनाचा आधारस्तंभ कसा बनू शकतो, याचे सखोल विश्लेषण या लेखात आपण करणार आहोत.

नागरिकांची भूमिका: धारूरच्या विकासाचे सक्रिय भागीदार

धारूरच्या नागरिकांनी स्वतःला नगरपरिषदेकडे केवळ सुविधांची मागणी करणारे किंवा प्रश्न विचारणारे घटक मानण्याऐवजी, शहराच्या विकासाचे सक्रिय भागीदार म्हणून पाहिले पाहिजे. ही भूमिका अनेक स्तरांवर महत्त्वपूर्ण ठरते:

* सक्रिय सहभाग आणि निर्णय प्रक्रिया: लोकशाहीमध्ये नागरिकांचा सहभाग हा केवळ निवडणुकीत मतदान करण्यापुरता मर्यादित नसतो. धारूरचे नागरिक हे स्थानिक प्रशासनाचे सक्रिय भागधारक आहेत. नगरपरिषदेच्या कामकाजावर लक्ष ठेवणे, वार्ड समित्यांच्या बैठकांमध्ये उपस्थित राहून आपले मत मांडणे, सार्वजनिक चर्चांमध्ये सहभाग घेणे आणि नगरपरिषदेच्या धोरणात्मक निर्णयांवर प्रभाव टाकणे, हे त्यांच्या सक्रिय सहभागाचे द्योतक आहे. यामुळे प्रशासनात पारदर्शकता येते आणि नागरिकांच्या गरजांनुसार निर्णय घेतले जातात.

* देखरेख आणि लेखापरीक्षण : नगरपरिषदेद्वारे राबवल्या जाणाऱ्या विविध विकास योजना, प्रकल्प आणि त्यासाठी होणाऱ्या खर्चाची देखरेख करणे ही नागरिकांची नैतिक आणि कायदेशीर जबाबदारी आहे. माहितीच्या अधिकाराचा (RTI) प्रभावी वापर करून ते नगरपरिषदेच्या कामकाजाची माहिती मिळवू शकतात आणि कामातील पारदर्शकता सुनिश्चित करण्यास मदत करू शकतात. यामुळे पैशाचा योग्य वापर होतो, भ्रष्टाचाराला आळा बसतो आणि विकास प्रकल्पांची गुणवत्ता राखली जाते. ही एक प्रकारची 'नागरिक लेखापरीक्षण' प्रणालीच आहे.

* सुधारक आणि सल्लागार: धारूरमधील प्रत्येक नागरिकाला आपल्या परिसरातील नेमक्या समस्यांची आणि गरजांची सखोल माहिती असते. उदा. कोणत्या रस्त्यावर खड्डे आहेत, कुठे पाण्याची समस्या आहे, कोणत्या भागात कचरा व्यवस्थापन योग्य नाही. या स्थानिक ज्ञानाचा उपयोग करून नागरिकांनी नगरपरिषदेला विधायक सूचना द्याव्यात, समस्यांवर उपाय सुचवावेत आणि शहराच्या सुधारणेसाठी सक्रिय योगदान द्यावे. नागरिकांकडून येणारे हे रचनात्मक सल्ले प्रशासनासाठी मौल्यवान मार्गदर्शक ठरतात आणि ज्यामुळे अधिक प्रभावी धोरणे आखता येतात.

* नियम आणि कायद्यांचे पालनकर्ता: कोणत्याही सुव्यवस्थित शहरासाठी नियम आणि कायद्यांचे पालन करणे अनिवार्य असते. नगरपरिषदेने धारूरच्या सुव्यवस्थेसाठी आणि विकासासाठी बनवलेले नियम व उपनियम (उदा. स्वच्छताविषयक नियम, बांधकाम परवानग्या, पाणी वापराचे नियम) पाळणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. या नियमांचे प्रामाणिकपणे पालन केल्याने शहरात शिस्त येते, सार्वजनिक हिताचे रक्षण होते आणि प्रशासनावरचा ताण कमी होतो. बेजबाबदार वर्तन हे केवळ वैयक्तिक समस्याच निर्माण करत नाही, तर ते संपूर्ण शहराच्या विकासाला बाधक ठरते.

* जबाबदार करदाता: नगरपरिषदेच्या कामकाजासाठी आवश्यक असलेला निधी मुख्यतः धारूरच्या नागरिकांनी भरलेल्या करातून (उदा. मालमत्ता कर, पाणीपट्टी, व्यावसायिक कर) येतो. धारूरच्या विकासाची चाके फिरती ठेवण्यासाठी आणि नागरिकांना




मूलभूत सुविधा (रस्ते, पाणी, वीज, स्वच्छता, आरोग्य केंद्रे) पुरवण्यासाठी हे कर अत्यंत महत्त्वाचे आहेत. त्यामुळे सर्व नागरिकांनी आपले कर आणि इतर शुल्क वेळेवर आणि प्रामाणिकपणे भरणे ही त्यांची प्राथमिक जबाबदारी आहे. वेळेवर कर भरणा केल्यास नगरपरिषदेला विकास कामांसाठी पुरेसा निधी उपलब्ध होतो.

कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या: धारूरची प्रगती साधण्याचे मार्ग

नागरिकांची केवळ भूमिकाच नव्हे, तर त्यांच्या काही ठोस जबाबदाऱ्याही आहेत, ज्या धारूरच्या प्रगतीसाठी आवश्यक आहेत:

* मतदान करणे: स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये प्रत्येक पात्र नागरिकांनी न चुकता मतदान केले पाहिजे. योग्य आणि दूरदृष्टी असलेला, कार्यक्षम आणि प्रामाणिक प्रतिनिधी निवडल्यानेच नगरपरिषदेचे कामकाज अधिक कार्यक्षम होते आणि शहराला योग्य दिशा मिळते.

* स्वच्छता राखणे: धारूर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी प्रत्येक नागरिकाची आहे. सार्वजनिक ठिकाणी कचरा न टाकणे, ओला व सुका कचरा वेगळा करून घंटागाडीत टाकणे, आणि आपल्या परिसराची स्वच्छता राखणे हे आवश्यक आहे. स्वच्छ धारूर हेच निरोगी धारूर.

* अनधिकृत बांधकामाला आळा: नगरपरिषदेची अधिकृत परवानगी घेतल्याशिवाय कोणतेही बांधकाम न करणे. यामुळे शहरातील नियोजित विकासाला चालना मिळते आणि बेकायदेशीर बांधकामामुळे उद्भवणाऱ्या समस्या (उदा. गटार तुंबणे, रस्ते अरुंद होणे) टाळता येतात.

* पाण्याचा जपून वापर: धारूरला पाणीपुरवठा हा एक महत्त्वाचा विषय आहे. पाण्याची बचत करणे, पाण्याचा अपव्यय टाळणे आणि पाण्याचा योग्य व काटकसरीने वापर करणे ही प्रत्येक धारूरकराची जबाबदारी आहे. जलसंवर्धन हे भविष्यासाठी अत्यंत आवश्यक आहे.

* सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण: उद्याने, पथदिवे, रस्ते, सरकारी इमारती, पाणीपुरवठा यंत्रणा अशा धारूरच्या सार्वजनिक मालमत्तेची निगा राखणे आणि त्यांची तोडफोड न करणे. ही मालमत्ता आपल्याच पैशातून तयार झाली आहे, याची जाणीव नागरिकांनी ठेवली पाहिजे.

* समस्या नोंदवणे आणि सूचना देणे: आपल्या परिसरातील समस्या (उदा. खराब रस्ते, पाण्याची समस्या, कचरा, पथदिवे बंद असणे, गटार तुंबणे) नगरपरिषदेकडे अधिकृतपणे नोंदवणे. त्याचबरोबर शहर विकासासाठी किंवा प्रशासकीय सुधारणांसाठी विधायक सूचना देणे. धारूर नगरपरिषदेच्या नागरिक तक्रार निवारण प्रणालीचा प्रभावी वापर करणे.

* जागरूकता वाढवणे: इतर धारूरवासीयांना त्यांच्या हक्कांबद्दल आणि जबाबदाऱ्यांबद्दल जागरूक करणे. माहितीचे आदानप्रदान करून सामुदायिक विकासाला प्रोत्साहन देणे आणि एक जागरूक नागरिक समाज घडवणे.

विविध वयोगटातील नागरिकांच्या भूमिका आणि जबाबदाऱ्या:

धारूर शहरातील प्रत्येक वयोगटातील नागरिकांचा सहभाग महत्त्वाचा असतो.

* महिला: घरातील स्वच्छता, कचरा व्यवस्थापन आणि पाण्याच्या योग्य वापराची जबाबदारी महिलांनी घ्यावी. महिला बचत गटांच्या माध्यमातून स्वच्छतेचे आणि आरोग्याचे उपक्रम राबवून समाजात जागरूकता निर्माण करावी. मुलांच्या शिक्षणावर लक्ष देऊन आणि स्त्रियांच्या आरोग्याबद्दल व हक्कांबद्दल जागरूकता निर्माण करण्यात त्यांनी पुढाकार घ्यावा. स्थानिक निवडणुकांमध्ये सक्रियपणे मतदान करणे आणि महिलांशी संबंधित समस्या नगरपरिषदेकडे प्रभावीपणे मांडणे हे त्यांचे कर्तव्य आहे.

* युवक (तरुण): धारूरच्या युवकांनी नवीन तंत्रज्ञान आणि कल्पना वापरून नगरपरिषदेला विकासासाठी मदत करावी (उदा. सोशल मीडियाचा वापर करून समस्या मांडणे). स्वच्छता मोहिम, वृक्षारोपण, रक्तदान शिबिर यांसारख्या स्वयंसेवा उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेऊन सामाजिक बांधिलकी जपावी. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामकाजाची माहिती घेऊन विचारपूर्वक मतदान करावे आणि नगरपरिषदेच्या माध्यमातून राबवल्या जाणाऱ्या कौशल्य विकास कार्यक्रमांमध्ये सहभागी होऊन स्वतःला आणि शहराला सक्षम करावे.


* वृद्ध (ज्येष्ठ नागरिक): त्यांच्या आयुष्यातील अनुभवाचा आणि ज्ञानाचा उपयोग धारूर नगरपरिषदेला योग्य निर्णय घेण्यासाठी मार्गदर्शन म्हणून करावा. त्यांनी शांतता आणि सलोखा राखण्यास मदत करावी. तरुण पिढीसाठी आदर्श वर्तन आणि नागरिक म्हणून जबाबदारीचे उदाहरण घालून द्यावे. नगरपरिषदेच्या कामकाजावर शांतपणे लक्ष ठेवून आवश्यक तिथे सूचना द्याव्यात आणि प्रशासनाला योग्य दिशेने काम करण्यास प्रोत्साहित करावे. ज्येष्ठ नागरिकांसाठी असलेल्या योजनांची माहिती घेऊन इतरांना मदत करावी आणि सार्वजनिक जागांवर त्यांच्या सोयीनुसार सुविधा आहेत की नाही यावर लक्ष द्यावे.किल्ले धारूर नगरपरिषद आणि धारूरचे नागरिक हे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. धारूरच्या खऱ्या अर्थाने विकासासाठी आणि सुशासनासाठी या दोन्ही घटकांनी एकत्र येऊन काम करणे आवश्यक आहे. नागरिकांनी केवळ टीकाकार न राहता, सक्रिय सहभागी, जबाबदार करदाता, समस्या सोडवणारे भागीदार आणि शहराच्या विकासाचे आधारस्तंभ म्हणून काम केले पाहिजे. जेव्हा धारूरमधील प्रत्येक नागरिक आपले कर्तव्य ओळखून आणि जबाबदारीने वागून नगरपरिषदेशी सहकार्य करेल, तेव्हाच एक स्वच्छ, सुंदर, सुरक्षित आणि प्रगतीशील धारूर शहर नक्कीच निर्माण होऊ शकते. नागरिकांचा सक्रिय सहभाग हेच धारूरच्या उज्ज्वल भविष्याचे खरे गमक आहे.

# खा.बजरंग सोनवणेंच्या वाढदिवसानिमीत्त जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची होणार आरोग्य तपासणी

## राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम, जिल्हा शल्यचिकित्सक यांचे वैद्यकिय अधिक्षकांना पत्र

**तभा वृत्तसेवा**

**बीड दि.५ जुलै**



बीडचे खा.बजरंग सोनवणे यांचा वाढदिवस दि.६ जुलै रोजी जिल्हाभरात विविध कार्यक्रमांनी साजरा केला जात आहे. तालुकास्तरावर राष्ट्रवादी पक्षाच्या वतीने रक्तदान शिबीरांचे आयोजन केले आहे. दरम्यान, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत अंगणवाडी ते बारावीपर्यंत विद्यार्थ्यांची मोफत आरोग्य तपासणी केली जाणार आहे.

खा.बजरंग सोनवणे यांच्या वाढदिवसानिमित्त बीड जिल्ह्यात राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम अंतर्गत मोफत आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्याबाबत डॉ.संजय राऊत, जिल्हा शल्य चिकीत्सक, जिल्हा रूग्णालय बीड यांनी सर्व वैद्यकिय अधिक्षकांना याबाबत पत्र दिले आहे.

राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम अंतर्गत ० ते १८ वर्षे वयोगटातील बालकांची आरोग्य तपासणी करयात येते. यामध्ये ० ते ६ वर्षे वयोगटातील अंगणवाडीमध्ये जाणाऱ्या बालकांची वर्षातून २ वेळा तर शासकीय आणि निमशासकीय शाळांमधील ६ ते १८ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांची वर्षातून एकदा आरोग्य तपासणी करण्यात येते. दरम्यान, दि.६ जुलै रोजी खा.बजरंग सोनवणे यांच्या वाढदिवसानिमीत्त संपूर्ण बीड जिल्ह्यातील प्रत्येक तालुका स्तरावर विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणीने वाढदिवस साजरा करण्यात येणार आहे. त्यासाठी शिक्षण विभागाशी संपर्क करण्यात येत असून संबंधीत शाळेतील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना उपस्थित राहण्याबाबत जनजागृती करावी, असेही डॉ.संजय राऊत, जिल्हा शल्य चिकित्सक जिल्हा रुग्णालय, यांनी म्हटले आहे. दरम्यान, यासाठी तालुकास्तरावर नोडल अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. वैद्यकिय अधिक्षक, सर्व जिल्हा/ उप जिल्हा/ ग्रामिण रुग्णालय, यांना पत्र पाठवून आपल्या अधिनस्त आरबीएसके अंतर्गत सर्व वैद्यकिय पथकांना सज्ज ठेवून आरोग्य तपासणी करावी, असे आदेश दिले आहेत.

# बीड जिल्ह्यात काँग्रेसकडून नविन तालुका अध्यक्षांच्या निवडी जाहीर

**तभा वृत्तसेवा**

**केज दि.५ जुलै**

बीड जिल्हा काँग्रेसच्या वतीने सर्वच तालुका अध्यक्षांच्या नियुक्त्या करण्यात आल्या असून बीड जिल्हा काँग्रेसने आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवून तयारी सुरू केली असल्याचे यावेळी सांगितले. या नियुक्त्या काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या खा. रजनीताई पाटील यांच्या सूचनेवरून व काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री अशोक पाटील, आदित्य पाटील, जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष राहुल सोनवणे, पशुपतीनाथ दांगट, प्रवीनकुमार शेप, गणेश राऊत आदींच्या प्रमुख उपस्थितीत नियुक्ती पत्र देण्यात आले.



केज तालुका अध्यक्ष पदी श्री. प्रविण लक्ष्मण खोडसे,बीड ग्रामीणश्री. गणेश आसाराम बजगुडे, परळी वैजनाथ ग्रामीण,अॅड. प्रकाश बापूराव मुंडे,परळी वैजनाथ शहर,श्री. हानिफ करीम सय्यद,अंबेजोगाई ग्रामीण श्री.अभिजीत व्यंकटराव लोमटे,आष्टी श्री. फारोक मोहम्मद सय्यद, पाटोदा श्री. राहुल शाहुराव जाधव, माजलगांव श्री. नारायण लक्ष्मण होके पाटील, धारूर श्री. सिध्देश्वर देवराव रणदिवे, गेवराई श्री. महेश गणेश बेद्रे, अंबाजोगाई शहर श्री. मोहमद असिफोद्दीन सइदोद्दीन खतीब बीड शहर श्री. परवेज अहमद बशिरोद्दीन कुरेशी, शिरूर कासार भास्कर बुवासाहेब केदार, माजलगाव शहर अफरोज मुसा तांबोळी, वडवणी ज्ञानेश्वर आबासाहेब आंधळे याप्रमाणे निवडी जाहीर करून नियुक्तीपत्र देण्यात आले.राज्यात काही दिवसांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार असल्याने आता प्रत्येक पक्ष बांधणी करत असल्याचे दिसत आहे. काँग्रेसने देखील जिल्ह्यात सर्वच तालुका अध्यक्षांच्या व काही ठिकाणी शहर अध्यक्षांच्या नियुक्त्या जाहीर केल्या आहेत. काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या खा.सौ. रजनीताई पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली काम करणारा प्रत्येक कार्यकर्ता हा एकनिष्ठ व पक्षाच्या विचारधारेचा आहे. आमच्यावर दिलेली जबाबदारी आम्ही चोखपणे पार पाडू व काँग्रेसला जिल्ह्यात पुन्हा चांगले दिवस आणू अस मत यावेळी सर्वच तालुका अध्यक्ष यांनी बोलताना व्यक्त केले.

यावेळी माजी मंत्री अशोक पाटील यांनी जिल्ह्यातील सर्व नवनियुक्त पदाधिकारी यांना शुभेच्छा देऊन पदाचा वापर पक्ष वाढवण्यासाठी व पक्षाची भूमिका सर्वसामान्य जनतेला समजावून सांगा आजही प्रत्येक गावातील मोठा वर्ग काँग्रेस विचाराचा आहे. आपण त्या लोकांशी संपर्क करा आणि संघटन वाढवा, सर्वसामान्य जनतेच्या कामाला, वेळेला उभे रहा लोकांचा विश्वास आपल्यावर आहे आपण मोठ्या ताकतीने काम करा व आगामी नगर पालिका, नगर परिषदा, तसेच जिल्हा परिषद, पंचायत समिती मध्ये आपल्याला उतरायचं आहे त्या अनुषंगाने कामाला लागण्याच्या सूचना देखील यावेळी माजी मंत्री अशोक पाटील यांनी दिल्या.यावेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांनी देखील सर्व तालुका अध्यक्षांना आप आपली मरगळ झटकून मोठ्या ताकतीने येणाऱ्या निवडणुका लढवण्यासाठी कामाला लागण्याचे आदेश दिले तसेच पक्ष संघटनाच्या बाबतीत काहीही अडचण असेल तर आम्हाला कळवा प्रत्येक कामात जिल्हाध्यक्ष तुमच्या सोबत राहील अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली. या कार्यक्रमाला जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणात प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

# शालेय सुब्रतो मुखर्जी चषक फुटबॉल स्पर्धेला १७ जुलैपासून सुरवात

**तभा वृत्तसेवा**

**बीड दि.५ जुलै**

आंतरराष्ट्रीय सुब्रतो कप फुटबॉल स्पर्धेत आशियातील विविध देशांतील विद्यार्थी भाग घेतात, ज्यामुळे ही स्पर्धा शालेय स्तरावरील सर्वात उल्लेखनीय फुटबॉल स्पर्धा आहे. सन २०२५-२६ या वर्षात जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय बीड मार्फत जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथे १७ ते १८ जुलै २०२५ या कालावधीत जिल्हास्तर शालेय सुब्रतो मुखर्जी चषक फुटबॉल स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेने २०२५-२६ मधील शालेय क्रीडा स्पर्धांची सुरुवात होणार आहे.

सदर स्पर्धा १५ वर्षा खालील मुले व १७ वर्षाखालील मुले व मुली या वयोगटात होत आहेत.१७ जुलै २०२५ रोजी १७ वर्षाखालील मुले व मुली तर १८ जुलै २०२५ रोजी १५ वर्षाखालील मुले या वयोगटातील स्पर्धा होतील. १७ वर्षाखालील वयोगटातील खेळाडूचा जन्म ०१ जानेवारी २००९ रोजी किंवा त्यानंतर जन्मलेला असावा व १५ वर्षाखालील वयोगटातील खेळाडूचा जन्म ०१ जानेवारी २०११ रोजी किंवा त्यानंतर जन्मलेला असावा. स्पर्धेचे प्रवेश आणि प्रवेश शुल्क ऑफलाईन पद्धतीने १६ जुलै २०२५ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत स्वीकारले जाणार आहेत. स्पर्धेतील सामने जिल्हा क्रीडा संकुल, बीडच्या मैदानावर घेण्यात येणार आहेत. जिल्हास्तर स्पर्धेनंतर विभागस्तर आणि राज्यस्तर सुब्रतो मुखर्जी चषक फुटबॉल स्पर्धा घेण्यात येणार आहेत. विभागस्तर शालेय सुब्रतो कप फुटबॉल स्पर्धा ह्या बीड येथे दि. २२ ते २४ जुलै २०२५ रोजी जिल्हा क्रीडा संकुल मैदान, बीड येथे होणार आहेत. विभागस्तर स्पर्धेतील वयोगटनिहाय विजयी संघांना राज्यस्तर स्पर्धेत प्रवेश मिळणार आहे.

जिल्हास्तरीय स्पर्धेत सहभागापूर्वीच www.subrotocup.in या संकेतस्थळावर खेळाडू व संघाची नोंदणी करणे अनिवार्य आहे. तसेच प्रत्येक सहभागी संघानी रू. २०००/- प्रवेश फी भरलेल्या नोंदणीकृत संघांनाच या स्पर्धेत सहभागी करून घेण्यात येईल. राज्यस्तर स्पर्धेतील विजेत्या संघाला सुब्रतो मुखर्जी स्पोर्टस एज्युकेशन सोसायटीतर्फे आयोजित राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होण्याची संधी मिळणार आहे.

शालेय सुब्रतो मुखर्जी चषक फुटबॉल स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी क्रीडा अधिकारी कालिदास होसूरकर ( मो.क्र.९४२१५९५५१५) यांच्याशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांनी केले आहे.

# पाटागंणावर चातुर्मास सेवेची सुरुवात

**तभा वृत्तसेवा**

**बीड दि.५ जुलै**



श्री संत जनार्दन यांच्या संस्थान थोरले पाटागंण येथे ४२५ वर्ष पासून चालत आलेल्या चातुर्मास सेवेचा आज प्रारंभ झाला.सकाळी श्री अभिषेक वैदिकांच्या उपस्थितीत संपन्न झाला नंतर ब्रह्मश्री कृष्णा महाराज रामदासी यांच्या मधुर वाणीतून श्रीमदभागवत ग्रंथ निरूपणास सुरुवात झाली, शेवटी खिचडी प्रसाद वाटप करण्यात आला. श्री विनायक महाराज व प्रसाद शिवनीकर यांनी भागवत संहिते चे पारायण सुरु केले व भिक्षा मागून दिवसभरातील सत्राची सुरुवात केली.वेदमूर्ती श्रीकांत विडेकर, वेदमूर्ती श्रीपाद विडेकर व वेदमूर्ती प्रल्हाद जवळेकर यांच्या उपस्थिती अभिषेक झाला,अनिल कुलकर्णी मंगरूळकर पुरानिकसह अनेक भक्त या वेळी उपस्थित होते. भागवत श्रावणलाभ मिळवण्यासाठी सकाळी नऊ ते दहा या वेळेत उपस्थिती देण्याचं आवाहन थोरले पाटागंण संस्थान च्या वतीने करण्यात येत आहे.

# दर्जेदार शैक्षणिक साहित्य वाटप करणारी एकमेव शाळा-बेडसकर

**तभा वृत्तसेवा**

**केज दि.५ जुलै**

विद्यार्थ्यांना दर्जेदार शैक्षणिक साहित्य वाटप करणारे जिल्ह्यातील एकमेव शाळा म्हणून बीड जिल्ह्यात सानेगुरुजी निवासी विद्यालय केज ने शिक्षण क्षेत्रात एक आदर्श निर्माण केला आहे.

आज नवीन शैक्षणिक वर्षाच्या पूर्वसंध्येला विद्यार्थ्यांना वह्या पुस्तके शालेय दप्तर चे वाटप करण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून केज तालुका गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर हे होते तर कार्यक्रमाचे अध्यक्ष साने गुरुजी निवासी विद्यालयाच्या प्राचार्य / मुख्याध्यापिका डॉ कविता गित्ते हरिभाऊ पाटोळे , उत्तम मोती, बाबासाहेब चाटे, यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटपाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.




यावेळी शाळेतील प्रवेशित सर्व निवासी विद्यार्थ्यांना वह्या , पुस्तकं, दप्तर ,इत्यादी शैक्षणिक साहित्याचे वाटप केज तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर यांच्या हस्ते करण्यात आले. या शैक्षणिक साहित्यांचे वाटप कार्यक्रमात मनोगत व्यक्त करताना बेडसकर म्हणाले की विद्यार्थ्यांना दिलेले शैक्षणिक साहित्य अतिशय दर्जेदार व चांगल्या प्रतीचे आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणात साडेसातशे मुलांचं निवासी वसतिगृह चालवणं व त्यांना दर्जेदार सुविधा देणे हे सोपे काम नाही. खरंच सदर शाळा व वसतिगृह हे अतिशय वंचित घटकातील विद्यार्थ्यांसाठी चालतं याचा केज तालुक्याला अभिमान आहे. फक्त वस्तीग्रह व शाळा चालवायची म्हणून सदर शाळा चालत नसून एक मॉडेल स्कूल सध्या बीड जिल्ह्यात साने गुरुजी आहे असाही मत त्यांनी व्यक्त केलं. त्याबद्दल संस्था आणि शाळा प्रशासनाचे कौतुकही केले तसेच मुलांना या नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती सुवर्णा सिरसाट यांनी केले तर आभार शाळेचे ज्येष्ठ शिक्षक हरिभाऊ पाटोळे यांनी आभार मानले आणि विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. संपूर्ण कार्यक्रम अतिशय शिस्तबद्ध व आनंददायी वातावरणात पार पडला.

# पायी दिंडी , मुखी विठ्ठल : आषाढी एकादशीचा अनुपम सोहळा


## भक्ती , एकोपा आणि संस्कृतीचा संगम : आषाढी एकादशी

**तभा वृत्तसेवा**

**बीड दि.५ जुलै**

आषाढी एकादशी , ज्याला ' देवशयनी एकादशी ' असेही म्हणतात , हा हिंदू धर्मातील एक अत्यंत महत्त्वाचा सण आहे . आषाढ महिन्यातील शुक्ल पक्षातील एकादशीला हा दिवस साजरा केला जातो . विशेषतः महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायासाठी हा दिवस दिवाळीइतकाच मोठा मानला जातो .

आषाढी एकादशीचे महत्त्व : भगवान विष्णूंची योगनिद्रा - धार्मिक मान्यतेनुसार , या दिवशी भगवान विष्णू क्षीरसागरात शेषनागावर चार महिन्यांसाठी योगनिद्रेत जातात . त्यामुळे या एकादशीला ' देवशयनी एकादशी ' असेही म्हणतात . या चार महिन्यांच्या कालावधीला 'चातुर्मास' म्हणतात आणि या काळात शुभ कार्ये ( उदा. विवाह , गृहप्रवेश ) केली जात नाहीत .पुण्य आणि मोक्ष : या दिवशी उपवास आणि भगवान विष्णूंची पूजा केल्याने अक्षय फळ मिळते , सर्व मनोकामना पूर्ण होतात आणि पापमुक्ती मिळून मोक्ष प्राप्त होतो अशी श्रद्धा आहे . वारीचे महत्त्व : आषाढी एकादशी वारकरी संप्रदायाचा सर्वात मोठा उत्सव आहे . महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लाखो



वारकरी पायी चालत पंढरपूरला विठ्ठलाच्या दर्शनासाठी येतात . या वारीतून भक्ती , एकता आणि समर्पणाचे महत्त्व अधोरेखित होते .पौराणिक कथा : मृदुमान्य नावाच्या राक्षसाने देवांना त्रास दिला होता . त्यावेळी भगवान शंकर , ब्रह्मा आणि विष्णू यांच्या श्वासातून एका देवीची निर्मिती झाली , जिने मृदुमान्य राक्षसाचा वध केला . हा दिवस आषाढ शुद्ध एकादशीचा होता आणि त्या देवीला ' एकादशी ' असे नाव दिले गेले . तेव्हापासून एकादशीचे व्रत करण्याचे महत्त्व सांगितले जाते.आषाढी एकादशी कशी साजरी करतात ? : व्रत आणि उपवास - आषाढी एकादशीच्या आदल्या दिवशी ( दशमीला ) एकभुक्त राहावे लागते . एकादशीला पहाटे उठून स्नान करून विष्णूची पूजा केली जाते . संपूर्ण दिवस उपवास केला जातो आणि रात्री हरिभजन करत जागरण केले जाते . दुसऱ्या दिवशी ( द्वादशीला ) वामनाची पूजा करून पारणे सोडले जाते . विष्णूपूजन : या दिवशी भगवान विष्णूची पूजा करताना तुळशीची पाने अर्पण केली जातात ( तुळशीची पाने आदल्या दिवशी तोडावीत ). पिवळे चंदन आणि पिवळी फुले विष्णूंना अर्पण केली जातात . तुपाचा दिवा लावून श्री विष्णू चालीसाचे पठण केले जाते आणि आरती केली जाते .